◆ डिसेंबर २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक बारावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील
शिल्पा कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **प्रेमाचा रेणू** : डॉ. संजय ढोले | ३४ |
| **दृष्टिभ्रम** : डॉ. बाळ फोंडके | ४० |
| **महाभारतातील पितृवंदना** | |
| : अनु. सुषमा शाळिग्राम | ५४ |
| **महाभारतातील मातृवंदना** | |
| : अनु. सुषमा शाळिग्राम | ६१ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ७२ |
| **पुरस्कार** | ८७ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९५ |
| **श्रद्धांजली** | ९७ |
| **बालनगरी** | ९८ |


मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-२४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## ग्रंथप्रदर्शनांची उत्साहवर्धक मांदियाळी

पुस्तक प्रदर्शनाचे माध्यम मराठी रसिक वाचकांना आकृष्ट करण्यात यशस्वी ठरले आहे आणि नामवंत प्रकाशकांची हजारो पुस्तके एकत्र पहायला मिळत असल्याने आपल्या आवडीची पुस्तके मनसोक्त हाताळण्याची आणि खरेदी करण्याची एक पर्वणीच, अशा भावनेने मराठी रसिक या प्रदर्शनांना भेट देत आहेत.

मराठी मध्यमवर्गीय तरुणांना सध्या आर्थिकदृष्ट्या वरच्या श्रेणीत जाण्याचे चांगले योग लाभलेले आहेत आणि नव्याने शिक्षित झालेल्या कनिष्ठ वर्गालाही ज्ञानाचे मोल जाणवू लागलेले आहे. शिक्षणाने,पदवीने, ज्ञानाने, उज्ज्वल भवितव्याचे, अर्थपूर्ण रोजगाराचे आणि संपन्न जीवनशैलीचे दरवाजे सहजपणे खुले होतात आणि पिढ्यानुपिढ्यांच्या अभावग्रस्त अवस्थेतून बाहेर पडणे शक्य होते हे पदोपदी जाणवत असल्याने दलित व ग्रामीण भागातही आता वृत्तपत्रांचा आणि पुस्तकांचा अधिक उठाव होऊ लागला आहे. दूरदर्शनच्या माध्यमातून संपन्न जीवनाची स्वप्ने सर्वांनाच आटोक्यातली वाटू लागली आहेत आणि 'ज्ञान' हाच त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणारा मंत्र आहे याची खात्री पटत चालली आहे. ज्ञान मिळवण्याचे बहुश्रुत होण्याचे, तीव्र स्पर्धेतही आपले स्थान व महत्त्व टिकवून धरण्यासाठी आपल्या क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत ठेवण्याचे आणि रंजनाचेही सर्वात सुलभ आणि सोयीस्कर साधन म्हणून पुस्तकांना असाधारण महत्त्व आहे; आपल्या मुलाबाळांनाही उत्तम यशासाठी पुस्तकांची गोडी लागायला हवी अशी जाणीव सर्वत्र दिसते. या जाणीवेमुळेच आज पुस्तके आणि दूरचित्रवाणीचे कार्यक्रम, वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमे यांना प्रचंड मागणी आहे.

ग्रंथप्रदर्शनाद्वारे एकाच वेळी विविध विषयांवरील हजारो पुस्तके बघायला मिळतात. आणि आपल्या आवडीची पुस्तके निवडून विकत घेण्याची संधी हातची जाऊ नये असे रसिक स्त्रीपुरुषांना वाटते. सध्या नवी नवी प्रशस्त ग्रंथदालनेही गावोगाव निघत आहेत आणि आधीच्या एक दोन खणांच्या छोट्या पुस्तकांच्या दुकानात पुस्तके पाहताना होणारी कुचंबणा कमी होत आहे. क्रॉसवर्ड, ओडिसी, डेपो वगैरे ग्रंथविक्रीदालने भारतात प्रमुख शहरात सुरू होत आहे. मोठे उद्योगपती आणि मोठ्या रिटेल क्षेत्रातील यंत्रणाही पुस्तके, खेळणी, सीडी, स्टेशनरी या चारही विभागांना एकत्र आणून प्रशस्त मॉल्स उभे करण्याच्या प्रयत्नात आहेत. परदेशातील



प्रकाशनसंस्था भारतात व्यवहार वाढवण्यास उत्सुक आहेत. हे सर्वच वातावरण भारतातील आणि प्रादेशिक भाषांतील ग्रंथव्यवहाराला पोषक ठरणारे आहे यात शंकाच नाही.

पुण्यात तर सतत ग्रंथप्रदर्शने चालूच असतात; आणि त्यामध्ये चागंली विक्री होते. पुणे येथे नोव्हेंबर महिन्यात चार ग्रंथप्रदर्शने एकाच वेळी चालू होती आणि त्या सर्वांना रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. 'दै. सकाळ' ने यावेळी प्रथमच ग्रंथप्रदर्शने भरवण्यात पुढाकार घेतला. ब्ल्यू बर्ड इंडिया लि. या संस्थेने दर्जेदार वह्या आणि अंकलिपीपासून गंमतकोडी, प्रयोगवही, बालभारती अभ्यासमाला वगैरे पुस्तकांची 'नवनीत'च्या धर्तीवर निर्मिती केली आहे. काही मराठी ललित पुस्तकेही काढली आहेत. या ब्ल्यू बर्डने आपली पुण्यातील एन्ट्री जनमानसावर कोरण्याच्या दृष्टीने सकाळच्या ॲग्रोवन प्रदर्शनाचा फायदा घेऊन हे ग्रंथप्रदर्शन भरवण्यासाठी उत्साह दाखवला. मॅजेस्टिक प्रकाशनाचे सहप्रायोजकत्व मिळवले. पाटील एंटरप्राइजेस– ज्ञानगंगाच्या उमेश पाटील यांनी या ग्रंथप्रदर्शनाचे सर्व काम बघितले. ॲग्रोवनच्या प्रदर्शनाला पाच लाख लोकांनी भेट दिली. त्यापैकी बहुसंख्य लोकांनी ग्रंथप्रदर्शनालाही भेट देऊन हजारो रुपयांची पुस्तके खरेदी केली. एकूण 'दै. सकाळ'च्या इव्हेंट मॅनेजमेंटच्या विभागाने कंझ्युमर शॉपी, आरोग्यप्रदर्शने, प्रॉपर्टी एक्झिबिशन, कृषिप्रदर्शन यांच्या जोडीने ग्रंथप्रदर्शनांनाही यापुढे आपला अविभाज्य घटक मानायला हरकत नाही. 'दै. सकाळ'च्या प्रसिद्धीमुळे ग्रंथविक्रीला चालना मिळणे आणि ग्रंथप्रदर्शनाकडे सहसा न वळणाऱ्या रसिकांना अनायासे ग्रंथ-दर्शनाचे पुण्य संपादन करण्याची संधी उपलब्ध होईल.

याचवेळी 'अक्षरधारा' चे २७५ वे प्रदर्शन अत्रे सभागृहात चालू होते. राज ठाकरे यांनी त्याचे उद्घाटन केले. 'अक्षरधारा'च्या राठिवडेकर बंधूंनी गेल्या तेरा वर्षात आपला चांगला जम बसवला आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये आपली प्रदर्शने भरवून तेथील रसिकांना ग्रंथप्रदर्शनात पुस्तके हाताळण्याची सवय वृद्धिंगत केली आहे. पुण्यात दर वर्षी किमान दोन प्रदर्शने अक्षरधारा भरवते. उत्तम कार्यक्रमांची जोड देऊन रसिकांची पावले अत्रे सभागृहाकडे वळावीत अशी दक्षताही घेते.

भारत सरकारच्या प्रकाशन विभागाने बालगंधर्व कलादालनात एक प्रदर्शन भरवले होते. संयोजक नीतिन केळकर हे शासकीय सेवेत असूनही उत्साहीत आहेत. आपल्या या विभागाची पुस्तके वाचकांपर्यंत पोचावीत म्हणून धडपड करण्यात ते कसूर करीत नाहीत. गीतरामायणाची अकरावी आवृत्ती फक्त ५० रुपयात हे या प्रदर्शनातले एक आकर्षण होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेत ग्रंथप्रदर्शन ही संकल्पना अजून रुजायची आहे. तेथे सतीश कोळेकरांनी ग्रंथप्रदर्शन भरवले आहे. ग्राहकांना आकृष्ट करण्यासाठी तेही अनेक उपक्रम राबवत आहेत.


डिसेंबरमध्ये ‘पुणे बुक फेअर’ तर्फे यंदाही गणेश कला क्रीडामंदिरात ग्रंथप्रदर्शन भरवण्यात येणार आहे. स्टॉलचे भाडे बारा हजाराच्या घरात असल्याने मराठी प्रकाशक तेथे भाग घेण्यास तेवढसे उत्सुक नसतात. परप्रांतीय व शासकीय संस्थांची उपस्थिती अधिक असते. तरीही संयोजक राजन आणि वसंत जोशी नेटाने हा उपक्रम राबवत आहेत. मुंबईतही ग्रंथप्रदर्शने सतत चालू असतात. क्रॉसवर्ड सारखी मोठी दालनेही आहेत. औरंगाबाद, अकोला, नागपूर, नाशिक, अमरावती, बुलढाणा, परभणी, नांदेड, सोलापूर, कराड वगैरे ठिकाणीही ग्रंथप्रदर्शने रसिकांची गर्दी खेचतात.

सांगलीला साहित्य संमेलनाच्या निमित्ताने यंदा ग्रंथप्रदर्शनात नागपूर सारखी स्टॉलधारकांची गैरसोय होऊ नये अशी काळजी घेतली जावी. अशी सर्वांची अपेक्षा आहे. मांडणीही सुटसुटीत असावी.

सातारा ग्रंथ महोत्सव ४,५,६ जानेवारी २००८ रोजी जिल्हा परिषद मैदानावर होणार आहे. यंदाचे हे नववे वर्ष आहे. ऐंशी स्टॉल्स आणि भरपूर कार्यक्रम यामुळे हा सातारकरांचा वार्षिक सोहळा रंगतदार होतो. कोटीच्या घरात पुस्तकांची विक्री होते. एकदीड किलोमीटरच्या ग्रंथदिंडीने सारे शहर ग्रंथमय होऊन जाते. ग्रंथमहोत्सवाचा हा ‘सातारा पॅटर्न’ इतर शहरेही राबवू लागली आहेत. अनेक ठिकाणचे संयोजक या महोत्सवाला आवर्जून येतात. सातारा शहरातील सर्व शाळा, विद्यालये, वृत्तपत्रे, नगरपालिका, जि.प., जिल्हाधिकारी कार्यालय, बँका, ग्रंथालये यांचा सहभाग वाखाणण्याजोगा आहे.

ग्रंथप्रदर्शनाचे अर्थातच एक तंत्र असते. अक्षरधारा, शुभम साहित्य, रसिक साहित्य, पाटील एंटरप्रायझेस, साहित्ययात्रा वगैरेंनी त्यात प्रावीण्य मिळवले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर ग्रंथप्रदर्शन भरवण्याचा उपक्रम हाती घेतला. शिवाजीपार्कसारखे ऐसपैस मध्यवर्ती मैदान असूनही स्टॉल्सची मांडणी चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे आणि किल्ल्यांच्या छायाचित्रांच्या प्रदर्शनाशी याची सांगड घातल्याने पुस्तकाचा खप फार कमी झाला. आरंभीच्या स्टॉल्सवर तेवढी गर्दी झाली. पुढच्या स्टॉलवरच्या लोकांना माशा मारत बसावे लागले. हजारो फोटोंच्या प्रदर्शनाला भेट देऊन झाल्यावर शेजारच्या पुस्तकांच्या स्टॉलना भेट देण्याचा त्राण उरत नाही अशी तक्रार अनेक प्रेक्षकांनी केली. प्रसिद्धीही त्यामानाने कमी पडली.. असे उपक्रम करताना योग्य ती काळजी घेतली तर घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

विविध संस्थांतर्फे गाव पातळीवर दरवर्षी ग्रंथप्रदर्शने होत राहणे ही स्वागतार्ह बाब आहे. तसे प्रयत्न होणे ग्रंथसंस्कृतीच्या संवर्धनासाठी श्रेयस्कर ठरेल.





इंदिरा जाहिरात

# साहित्यवार्ता

### * ग्रंथालीची राज्यभर 'बहुमाध्यम यात्रा'

'ग्रंथाली'ने नव्या बदलत्या युगाचा वेध घेण्यासाठी राज्यभर बहुमाध्यम यात्रेचे आयोजन केले आहे. या काळात संपूर्ण राज्यभर विविधांगी वाचकप्रिय कार्यक्रम होणार आहेत. एकीकडे विविध माध्यमांचा प्रभाव वाढत असताना वाचनाची आवड लुप्त होऊ नये हा या यात्रेमागचा हेतू आहे. 'नव्या महाराष्ट्राची नवी कहाणी' निर्माण करण्याचा हा प्रयत्न असून समाजातील अशा सर्व उपक्रमांना रूढ व आधुनिक तंत्रज्ञानसाधनांनी एका नेटवर्कमध्ये गुंफणे आणि त्याचा समाजावर प्रभाव निर्माण करणे असाही प्रयत्न आहे.

या 'बहुमाध्यम' यात्रेत पुस्तक प्रदर्शन, चित्र प्रदर्शन, सिनेमा- डॉक्युमेंटरी, स्लाइड शो, संगीत, व्यक्ती – संस्थांचे अनुभवकथन आशा कितीतरी वेगवेगळ्या प्रकारांचा समावेश केला आहे. १७ नोव्हेंबरला नगर येथून ही यात्रा सुरू झाली असून २८ फेब्रुवारी २००८ रोजी पुण्यात समारोप होईल. या यात्रेसाठी महाराष्ट्राचे आठ विभाग करण्यात आले असून प्रत्येक विभागात आठ ते बारा दिवस मुक्काम असणार आहे. प्रत्येक गावी दोन ते चार दिवसांचे कार्यक्रम असतील. त्यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच तरुणवर्गासाठी 'यंग अचिवर्स'शी संवाद, तंत्रविज्ञानातील विविध अभ्यासक्रमाची ओळख, चित्रपट रसास्वादाचा अभ्यासक्रम यांचा समावेश असेल.

स्त्रियांसाठी आरोग्य, शिक्षण व स्वतंत्रता हे सूत्र केंद्रस्थानी ठेवून गावोगावी महिला मंडळाच्या सहकार्याने चर्चासत्रे होतील.

### * लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य आठ खंडात प्रकाशित करण्याचा प्रकल्प मातंग समाज समितीने हाती घेतला आहे. यात अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या, कथा, लोकनाट्ये, नाटक, कविता आदी साहित्याचा समावेश आहे, अशी माहिती मातंग समाज समितीचे अध्यक्ष आणि प्रेरणा प्रकाशनचे प्रमुख शशिकांत घोडे यांनी दिली.

या साहित्याचा पहिला खंड ९ डिसेंबर रोजी दिल्ली येथे अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात प्रकाशित होणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने १



ऑगस्ट २००८ या अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीदिनापर्यंत इतर खंडही प्रकाशित होतील.

पहिल्या चार खंडांमध्ये अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा समावेश आहे. पाचवा खंड कथासंग्रहांचा, सहावा खंड लोकनाट्ये व नाटक यांचा असेल. सातव्या खंडात पोवाडे, लावण्या, कटाव व गीतांचा समावेश आहे. विविध मासिकांमधून पत्रकारिता करताना केलेल्या लेखनाचा समावेश आठव्या खंडात आहे.

या समग्र खंडातून मिळणाऱ्या उत्पन्नतून अण्णा भाऊ साठे यांच्या कुटुंबाला कायमस्वरूपी मदत करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि विविध संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

### * 'कपूर घराण्याची गिनीज बुकने दखल घ्यावी'

भारतीय चित्रपटसृष्टीचा इतिहास ९० वर्षांचा आहे. आणि त्यामध्ये ६० हून अधिक वर्षे कपूर घराण्याने आपले योगदान दिले आहे. या पार्श्वभूमीवर गिनीज बुकच्या पदाधिकाऱ्यांना भेटून कपूर घराण्याच्या कामगिरीची दखल घ्यावी, अशी विनंती रितू नंदा यांनी केली. 'राज कपूर स्पीक्स' हे पुस्तक 'कॉफी टेबल' ने सन २००२ मध्ये प्रसिद्ध केले होते. या पुस्तकाच्या लघु आवृत्तीचे प्रकाशन केले. राज कपूर यांचे चित्रपट सामान्य माणसांसाठी होते आणि त्याप्रमाणेच हेही पुस्तक सामान्य माणसासाठीच आहे. आपल्या वडिलांचे १९८८ मध्ये निधन झाल्यानंतर संशोधन करून आपण हे पुस्तक लिहिले आहे, असे त्या म्हणाल्या.

रितू नंदा यांनी ऋषी कपूर यांच्यासह राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांची भेट घेऊन त्यांना हे पुस्तक दिले. राज कपूर यांचे प्रारंभीचे दिवस, चित्रपटनिर्मितीबद्दलची त्यांची आस्था आणि आपल्या मुलांसमवेत त्यांचे नातेसंबंध याबद्दलही पुस्तकामध्ये वर्णन करण्यात आले आहे.

### * लेखकाची जीवनदृष्टी स्पष्ट करणारे समीक्षालेखन हवे

लेखकाची जीवनदृष्टी स्पष्ट करणारे समीक्षात्मक लेखन अलीकडे कमी प्रमाणात लिहिले जाते, असे मत ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी व्यक्त केले.

नाशिक येथील 'वाङ्मयसेवा प्रकाशन' तर्फे आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

'वसंत बापट : साहित्य आणि विचार' या डॉ. बाळासाहेब गुंजाळलिखित पुस्तकाचे प्रकाशन गंगाधर महांबरे यांच्या हस्ते झाले होते.

सारडा यांनी बापट यांच्या अनेक आठवणी कथन केल्या. ''सुमारे पन्नास वर्षे बापट यांनी सातत्याने लेखन केले. त्यातील वैविध्य आश्चर्यकारक आहे. कवितांसह लेख, मुलाखती, अनुवाद, व्यक्तिचित्रे, परीक्षणे, प्रवासवर्णने, प्रस्तावना, कथा... असे अनेक प्रकार त्यांनी हाताळले. नेमकेपणाने विचार मांडणे, हे त्यांचे

वैशिष्ट्य होते. डॉ. गुंजाळ यांनी या पुस्तकातून बापट यांच्या समग्र जीवनदृष्टीचे विश्लेषण केले आहे. अशा प्रकारचे विश्लेषक लेखन अलीकडे दुर्मिळ झाले आहे. या पुस्तकातून बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अप्रकाशित पैलूही त्यांनी स्पष्ट केले आहेत, असे निरीक्षण शंकर सारडा यांनी नोंदवले.

बापट यांच्या उपक्रमशील आणि नावीन्याचा शोध घेण्याच्या वृत्तीचा श्री. महांबरे यांनी गौरवपूर्वक उल्लेख केला. ''बापट अतिशय गुणग्राहक होते. लावणीलेखनात त्यांचा हातखंडा होता, पण आपल्या चित्रपटनिर्मात्यांनी बापट यांच्या या गुणाचा उपयोग करून घेतला नाही.'' प्रकाशक श्री. मिलिंद सोनार यांनी आभार मानले. रूपाली अवसरे यांनी सूत्रसंचालन केले.

### * तरंग काव्यसंग्रहाचे प्रकाशन

कविता हा केवळ साहित्य प्रकार नसून, ती एक प्रवृत्ती आहे, किंबहुना मन:पूर्वक कविता करण्याचा प्रकार आहे, असे मत ज्येष्ठ कवी सुधीर मोघे यांनी जयश्री बापट यांच्या 'तरंग' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ह. वि. सरदेसाई होते. अशोक बापट, श्रीधर माडगुळकर उपस्थित होते.

श्री. मोघे म्हणाले, ''अंतरंगामध्ये उफाळून आलेल्या भावभावनांचे प्रतिबिंब 'तरंग' काव्यसंग्रहात दिसते. स्वानंदासाठी रचल्या गेलेल्या कवितांमध्ये माणसे जोडण्याची शक्ती असते.''

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''चिंता दूर करण्याचे सामर्थ्य श्रद्धेत आहे. श्रद्धेमुळे मनाची मशागत होऊन सुख व शांती मिळते.'' सदानंद महाजन व डॉ. अलका पवार यांनी 'तरंग' मधील काही निवडक कवितांचे वाचन केले. सूत्रसंचालन मंदार महाजन यांनी केले, तर आभार अभिजित बापट यांनी मानले.

### * माधवराव खंडकर यांचा सत्कार

वैचारिक निष्ठा आणि व्यावसायिक समतोल साधण्याचा प्रयत्न पत्रकारितेच्या माध्यमातून माधवराव खंडकर यांनी आयुष्यभर केला, असे मत ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ. बापूसाहेब काळदाते यांनी व्यक्त केले.

पत्रकारितेतील प्रदीर्घ कार्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार माधवराव खंडकर यांचा सत्कार पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर बिजले यांच्या हस्ते करण्यात आला. खंडकर यांच्या पत्नी माधुरी खंडकर या वेळी उपस्थित होत्या.

डॉ. काळदाते म्हणाले, ''खंडकरांनी विचारांशी निष्ठा जपत पत्रकारिता केली. आम्ही सर्वजण विविध क्षेत्रांत काम करीत असलो, तरी आमची जीवननिष्ठा एकच आहे. आज मात्र व्यवसाय आणि विचार यात विसंगती जाणवत आहे. लोकशाहीची तीन अंगे शक्तिहीन होत असताना पत्रकारितेवर मोठी जबाबदारी



आहे. लोक गोंधळलेले आहेत, असुरक्षितता वाढत आहे. वाढत जाणारी लालसा या सर्वांच्या मुळाशी आहे. या लालसेला पत्रकारांनी बळी पडू नये, यातून कुणा व्यक्तीचा नाही, तरी पत्रकारितेचा नाश होईल.''

खंडकर म्हणाले,''हा सत्कार माझा नसून आयुष्यभर केलेल्या पत्रकारितेचा आहे. सेवादलाचे काम सुरवातीपासूनच केले. तीस वर्षे संपादक म्हणून काम करताना अनेकांचे सहकार्य मिळाले. काळाप्रमाणे अनेक बदल होत असले, तरी पत्रकारितेच्या निष्ठा कायम राहाव्यात,'' डॉ. बाबा आढाव, शशिकांत भागवत, शरद वैद्य, रंगनाथ माळवे यांचीही भाषणे झाली. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्याम दौंडकर यांनी परिचय करून दिला. सरचिटणीस डी. आर. कुलकर्णी यांनी प्रास्तविक व सूत्रसंचालन केले.

### * फायनान्शियल एक्स्प्रेस पुण्यातूनही प्रकाशित

भावी काळातील महासत्ता ठरू शकणारा भारत आज वेगाने बदलत आहे, कात टाकत आहे. या परिवर्तनाची प्रचीती पुण्याइतकी अन्य शहरांत तितक्या सहजतेने येत नाही. देशातला सर्वात जुना आणि सर्वात मानाचा उद्यमबिंदू असलेले पुणे आज विद्यानगरी-ज्ञाननगरी म्हणूनही ओळखली जाते. आता तर आयटी आणि अर्थकारणातही या शहराने नवी झेप घेतली आहे. अशा पुण्यनगरीत एक्स्प्रेस वृत्तसमूहाच्या फायनान्शियल एक्स्प्रेस वृत्तपत्राची पुणे आवृत्ती सुरू झाली सोमवार ते शनिवार तीन रुपये स्वागतमूल्य आहे. रविवारी किंमत दहा रुपये आहे. एक्स्प्रेस वृत्तपत्र समूहाचे समूह ब्रॅण्डप्रमख शंकरराव शिंदे यांनी सांगितले की, 'पुणे हे तरुणाईचे शहर आहे. पूर्वेकडील ऑक्सफर्ड असाही पुण्याचा लौकिक आहे. देशातील एक नवी उभरती बाजारपेठ म्हणूनही हे शहर ओळखले जात आहे. विविध उपक्रमांद्वारे तरुण वाचकवर्ग जोडायचा आमचा प्रयत्न आहे.' मायक्रोफायनान्स, गाव व शहरांतील औद्योगिक क्षमता तसेच राजकीय जोखीमव्यवस्थापनाचे महत्त्व आदी विषयांवर परिसंवादही आयोजित केले जाणार आहेत.

### * भाषा विकासातील गमतीजमती

भाषा हा मानवी संस्कृतीतला महत्त्वाचा शोध तर आहेच पण या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन तसेच तिच्या वारशाचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होणारे हस्तांतरणही केवळ भाषेमुळेच शक्य झाले आहे. जर भाषेचा शोधच लागला नसता तर माणसाने आपले विचार, भावना, कल्पना कशा व्यक्त केल्या असत्या, आपली स्वप्ने कशी प्रत्यक्षात आणली असती आणि नात्यांमधले ऋणानुबंध कसे जपले असते, याचा अंदाजही करता येत नाही. भाषेच्या जडणघडणीबाबत अलीकडे झालेल्या संशोधनाचा लेखाजोखा ब्रिटनच्या 'नेचर' या नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे.

भाषा ही शब्दांनीच घडते. शब्दच भाषेला विशिष्ट आकार, रूप देतात. या शब्दांची उत्पत्ती आणि जडणघडण तसेच त्यांच्यातील बदल; हा भाषाशास्त्र संशोधनातील महत्त्वाचा विषय आहे. याबाबतीत या नव्या संशोधनाने आणखी पुढचे पाऊल टाकले आहे. ज्या शब्दांचा वापर वारंवार होतो त्यांच्यात बदल अगदी कमी होतो, त्यांचे बाह्यरूप आणि त्यांचा अर्थ कायम रहातो आणि जे शब्द अगदी कमी प्रमाणात वा क्वचितच वापरले जातात त्यांच्यात मोठा बदल होतो किंवा अनेकदा ते शब्द तर लुप्तही होतात, असे आढळून आले आहे. इंडोयुरोपीय गटातील इंग्रजी, रशियन, ग्रीक आणि स्पॅनिश या चार भाषांच्या आधारावर प्रामुख्याने हा निष्कर्ष काढण्यात आला असला तरी सर्वच भाषांना हा नियम लागू पडतो. या गटातील ८७ भाषा सध्या बोलल्या जात असल्या तरी दहा हजार वर्षांपूर्वी त्यांचे मूळ एकाच भाषेत होते, असे या संशोधकांनी नमूद केले आहे. या भाषांतील प्रमुख २०० शब्दांमध्ये गेल्या काही हजार वर्षांत कसकसे बदल झाले आणि कोणते शब्द कायम राहिले हेही तपासले आहे. 'टू' आणि 'वॉटर' हे दोन शब्द हजार वर्षे पूर्ववत आहेत, असेही नमूद केले आहे.

इंग्रजीत क्रियापदांचे भूतकाळातील रूप म्हणून 'इडी' प्रत्यय जोडला जातो. उदाहरणार्थ 'टू वॉक' म्हणजे चालणे तर 'वॉकड्' म्हणजे चालला होता. असे असताना बी, हॅव, डू, गो अशा अगदी नित्य वापरल्या जाणाऱ्या दहा क्रियापदांचे भूतकाळ मात्र 'इडी'न जोडता वॉज, हॅड, डीड, वेन्ट असे अगदी वेगळे होतात. मात्र हे शब्द सतत वापरात असल्याने त्यांच्यात आजवर जराही बदल झालेला नाही. पण 'हेल्प'चा भूतकाळ म्हणून आज सर्रास 'हेल्पड्'हा शब्द रूढ आहे, अशा काही बाबींकडेही संशोधकांनी लक्ष वेधले आहे.

### * इंग्रजीतून संयोगचिन्हाला (हायफन) डच्चू !

भाषा प्रवाही असते, तिच्यात नेहमी बदल होत असतात. याचाच प्रत्यय इंग्रजी सध्या घेत आहे. सुमारे सोळा हजार शब्दांतून संयोगचिन्हाला ('-') डच्चू देण्यात आला आहे. नव्या पद्धतीनुसार हे शब्द एकत्र किंवा सुटे लिहिले जातात. उदा. पूर्वी आइस्क्रीम हा शब्द 'ice-cream' असा लिहिला जात असे, आता तो 'ice cream' असा लिहितात.

अनौपचारिक संभाषणाचे वाढते महत्त्व, 'ई-मेल,' 'एसएमएस', प्रसारमाध्यमांकडून केली जाणारी भाषेची 'मोडतोड आणि अलीकडे भाषा 'पाहण्याचे' वाढलेले प्रमाण (उदा.'वेबपेज',जाहिरातफलक; तसेच अन्य दृश्य माध्यमांना मिळणारा मोठा प्रतिसाद) यामुळे संयोगचिन्हाची फारच 'अडचण' होते, असे एक मत आहे. त्यामुळे संयोगचिन्हाच्या 'हकालपट्टी'ला सुरवात झाली, असे मानले जाते. आता मात्र ही 'हकालपट्टी' अधिकृत करण्याचा निर्णय ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीच्या संपादक मंडळाने घेतला आहे. दोन अब्जांहून जास्त शब्द, दोन हजारांपेक्षा जास्त संकेतस्थळे आणि ब्लॉगचा धांडोळा घेण्यात आला. या आवृत्तीचे संपादक अँगस स्टिव्हन्सन म्हणाले, ''लोकांना संयोगचिन्हाचा वापर करणे तेवढेसे गरजेचे वाटत नाही. त्यांना या चिन्हाचा नेमका उपयोगी समजत नाही. 'डिझायनर्स'नादेखील संयोगचिन्ह उगीचच जागा व्यापणारे वाटते. अर्थात, संयोगचिन्ह पूर्णपणे दूर केले जाऊ शकत नाही. संदिग्धता टाळण्यासाठी ते आवश्यक आहे.

### * दहावे कोमसाप संमेलन

संस्कृतीची पायाभरणी आणि विकास हा व्यक्तिगत प्रतिभेतून झाला आहे, असे प्रतिपादन दहाव्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांनी उल्हासनगर येथे केले.

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या दहाव्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन विधान परिषदेचे उपसभापती वसंत डावखरे यांच्या हस्ते झाले. 'कोमसाप'चे संस्थापक ज्येष्ठ साहित्यिक मधुमंगेश कर्णिक, ज्येष्ठ नाटककार शं. ना. नवरे, शिवसेना नेते सुभाष देसाई. स्वागताध्यक्ष आमदार रामनाथ मोते आदी उपस्थित होते.

संमेलनाध्यक्ष डॉ. पाटील म्हणाले, ''आज लिहिणाऱ्या कित्येक लेखक, कवींना आपल्या माध्यमाची पुरेशी जाण नसते ते जे व्यक्त करते त्यापेक्षा दडवते, दडपते अधिक. पुरेशी भाषिक संवेदनशीलता असावी लागते. तेवढी संवेदनशिलता आज आपल्यात आहे का, आणि त्याबद्दल आपल्याला ओढ तरी वाटते का, असे प्रश्न स्वत:ला विचारायला हवेत. भाषेची मिथकीय शक्ती संपादीत करण्यासाठी प्रयत्न केले तर भाषिक जगणे हे आत्मसर्जनाच्या पातळीवर जाऊ शकेल आणि रसिकालाही ते अधिक काळ साद घालू शकेल.''

यापुढील 'कोमसाप'ची सगळी साहित्य संमेलने केशवसुतांच्या गावी मालगुंडलाच घेण्याचा, निर्णय 'कोमसाप'ने घेतला आहे, असे श्री. कर्णिक यांनी सांगितले.

### * मराठीच्या विकासासाठीचा निधी प्रतिसादाअभावी अन्य भाषांकडे

मराठी भाषेच्या विकासासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी देण्यात येतो; परंतु प्रशिक्षणविषयक कार्यक्रम घेण्यास महाराष्ट्रातून फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने हा निधी परत जातो. मराठीच्या वाट्याचा असा निधी अन्य भाषा आपल्या विकासासाठी वापरत आहेत.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाशी निगडित 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस' ही संस्था म्हैसूर येथे कार्यरत आहे. पुणे, गुवाहाटी, भुवनेश्वर, म्हैसूर, सोलन, लखनौ व पतियाळा येथे या संस्थेच्या शाखा असून, या प्रत्येक शाखेतून त्रिभाषा सूत्रानुसार काम केले जाते. भाषाविषयक प्रशिक्षण शिबिर घेण्यासाठी या संस्थेकडून अनुदान दिले जात. किती शिबिरे घ्यावीत यावर संस्थेचे बंधन नाही.

भाषाविषयक प्रशिक्षणासाठी १९८९ पासून अनुदान देत असलेल्या या संस्थेचे संचालक डॉ. राजश्री व कार्यक्रम संचालक डॉ. आय. एस. बोरकर दोघेही मराठीप्रेमी आहेत. भाषाविषयक प्रशिक्षणाबाबत त्यांनी महाराष्ट्रातील विद्यापीठे व स्वयंसेवी संस्थांना पत्रेही पाठविली आहेत. प्रत्येक प्रशिक्षण कार्यक्रमाला ७५ हजार रुपये अनुदान दिले जाते; पण कोणतीही संस्था प्रतिसाद देत नसल्याची खंत डॉ. राजश्री यांनी व्यक्त केली.

म्हैसूरमधील या संस्थेच्या मदतीतून तमिळनाडू सरकार तमीळ भाषेच्या प्रशिक्षणासाठी सर्वाधिक शिबिरे घेते. यामुळे मराठी व अन्य भाषांसाठीचा न वापरला जाणारा निधी तमीळ भाषेकडे जातो, अशी माहिती पुढे आली आहे.

## * नाट्यसंमेलन अध्यक्षपदी अभिनेते रमेश देव

सोलापूर येथे १९ आणि २० जानेवारी २००८ रोजी होणाऱ्या ८८ व्या अ. भा. मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी अभिनेते रमेश देव यांची निवड झाली.

यंदा नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी पाचजण रिंगणात होते. त्यात संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेत्री फैय्याज शेख, ज्येष्ठ नेपथ्यकार बापू लिमये, कामगार रंगभूमीवरील नाटककार वसंत जाधव, बुजुर्ग सिने-नाट्य अभिनेते रमेश देव आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापक विजय देसाई यांचा समावेश होता. अभिनेत्री फैय्याज या सोलापूरच्या असल्याने स्थानिक उमेदवार म्हणून त्यांनी झुकते माप मिळाले, अशी अपेक्षा होती. त्याचप्रमाणे रंगमंच कामगारांचे प्रतिनिधी म्हणून विजय देसाई आणि तंत्रज्ञांचे प्रतिनिधी म्हणून नेपथ्यकार बापू लिमये या निवडणुकीत उतरल्याने ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली.

## * मालतीबाई बेडेकर जन्मशताब्दी

''आंतरभारतीय दृष्टिकोन ठेवून प्रादेशिक भाषांमधील साहित्याची देवाणघेवाण होत नसल्याने सांस्कृतिक अनुशेष निर्माण झाला आहे. तो भरून काढण्यासाठी भाषांतरित साहित्य आवश्यक आहे,'' असे मत भाषातज्ज्ञ डॉ. प्रमोद तलेगिरी यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ लेखिका मालतीबाई बेडेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त साहित्य अकादमीच्या वतीने बेडेकर यांच्या 'बळी'या कादंबरीचे इंग्रजीत भाषांतर करण्यात आले आहे. साधना ट्रस्टच्या वतीने त्याचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. देहविक्रय करणाऱ्या महिला आणि त्यांच्या पाल्यांच्या भावविश्वाबाबत संशोधन करणाऱ्या इंद्रायणी गावस्कर यांना या वेळी मालतीबाई बेडेकर स्मृती अभ्यासवृत्ती प्रदान करण्यात आली. साधनाचे संपादक नरेंद्र दाभोलकर, अकादमीचे डॉ. प्रकाश भातंब्रेकर आदी या वेळी उपस्थित होते. यापूर्वी बेडेकर अभ्यासवृत्ती प्राप्त केलेल्या पद्मजा फाटक व दीपा गोवारीकर यांनी मनोगत व्यक्त केले.



## * बोलका मराठी विश्वकोश

प्राचीन आणि अर्वाचीन अशा दोन्ही परंपरा जपणारा विश्वकोश आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साथीने केवळ लिखित स्वरूपातच न राहता 'बोलका' होणार आहे. विश्वकोशाचा सतरावा खंड त्यातील निवडक नोंदींसह 'सीडी'च्या रूपात उपलब्ध होत आहे.

'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा' ने 'नॅब' (नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड)च्या सहकार्याने बोलक्या विश्वकोशाची निर्मिती केली आहे. कोशवाङ्मय प्रकारात जागतिक स्तरावरील हा पहिलाच उपक्रम असावा. सीडीच्या रूपातील हा बोलका विश्वकोश लवकरच उपलब्ध होईल.

''या सीडीचा कालावधी पाच तासांचा आहे. नोंदींबरोबरच त्यात विश्वकोशाचे प्रणेते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या काही आठवणी त्यांच्या कन्येने सांगितल्या आहेत. मंडळाचे सचिव पांडुरंग लोंढे यांनी विश्वकोशाची कार्यपद्धती सांगितली आहे. विश्वकोश मंडळाचे कार्यालय असलेल्या वाईची माहिती माधवराव चौंडे यांनी दिली आहे. शिवाय महत्त्वाच्या नोंदी वाचण्यासाठी विक्रम गोखले, प्रदीप भिडे, निशिगंधा वाड, ज्योती आंबेकर, गौरी देशमुख, भूषण गगराणी यांनी आवाज दिला आहे. सीडीमध्ये काही गीतेही आहेत. या सीडीची किंमत फक्त पन्नास रुपये असेल. विश्वकोशाचा अठरावा खंड एक मे २००८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. 'शेख अमर शाहीर' ते 'सिंघण'पर्यंतच्या नोंदी त्यात असतील. लवकरच कुमारांसाठी 'जीवसृष्टी आणि पर्यावरण कोश'; तसेच 'चरित्रकोश' आणि 'कन्याकोश' यांचेही काम सुरू होणार आहे.

## * 'भाषा घडताना'चे प्रकाशन

नाशिकच्या गौतमी प्रकाशनातर्फे प्रा. अविनाश बिनीवाले लिखित 'भाषा घडताना' व 'शब्दगन्ध' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले. अध्यक्षस्थानी श्री. शं. सराफ होते.

अविनाश बिनीवाले यांनी 'संस्कार भाषा' या विषयावर विचार मांडले. ''भाषेचा सर्वात प्रथम संस्कार आई करते. लहानपणीच भाषेचे संस्कार योग्य पद्धतीने झाले तरच मोठेपणी व्यक्तीला अतिशय योग्य पद्धतीने बोलता येते. दुसऱ्याला योग्यपणे कळणे, हे खऱ्या अर्थाने भाषेचे महत्त्वाचे कार्य आहे. भाषा संस्काराशिवाय शब्दांचा उच्चार, आघात, आरोह-अवरोह योग्य पद्धतीने होत नाहीत. जागतिकीकरणात मराठी भाषेचे सौंदर्य आणि शुद्धता जपण्यासाठी प्रमाणीकरण आवश्यक आहे. जगात मराठी भाषेचा क्रमांक दहाव्या स्थानावर आहे. न्यूनगंड सोडून त्याचा अभिमान बाळगायला हवा. १० कोटी मराठी लोक जी भाषा बोलतात ती मरायला टेकलेली नाही. मात्र स्वकीयच तिचे मारेकरी ठरू शकतात हे जाणून घेतले पाहिजे.''



**प्रकाशन प्रसंगी प्रकाशक निशाद देशमुख, अविनाश बिनीवाले, व इतर मान्यवर**

स्वातंत्र्यानंतर साहित्यात विविध प्रवाह आले. मराठी भाषेचा विस्तार होत गेला. भाषा जोमाने वाढते तेव्हा अराजकही निर्माण होते. तिच्यातील शिस्त बिघडते. भाषा व शुद्धलेखन यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.''

### * भगतसिंग यांची पुस्तके लाहोरमध्ये दुर्लक्षित अवस्थेत

१९२९ सालच्या लाहोर कटामध्ये क्रांतिकारक भगतसिंग सहभागी होते हे सिद्ध करण्यासाठी पोलिसांनी जंगजंग पछाडले होते. भगतसिंग यांच्या वैयक्तिक संग्रहातील जप्त केलेल्या पुस्तकांचा पुरावा म्हणून लाहोर कटाच्या खटल्यात वापर करण्यात आला होता. ऐतिहासिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व असलेली भगतसिंग यांची ही पुस्तके लाहोर येथील कनिष्ठ न्यायालयाच्या रेकॉर्ड रुममध्ये धूळ खात पडून आहेत.

शहीद भगतसिंग यांचे पुतणे प्रा. जगमोहन सिंग यांनी सांगितले की, भगतसिंग यांच्या वैयक्तिक संग्रहातील पुस्तके मलखाना रेकॉर्ड या नावाने लाहोर येथील कनिष्ठ न्यायालयाच्या रेकॉर्ड रूममध्ये ठेवली आहेत. ती भारतीयांनाही उपलब्ध करून द्यावीत, अशी विनंती पाकिस्तान सरकारला करण्यात आली आहे.

शहीद भगतसिंग यांचे आग्रा येथील नई मंडी येथे कार्यालय होते. तेथे त्यांनी आपल्या वैयक्तिक संग्रहातील १७० पुस्तके ठेवलेली होती. ब्रिटिश पोलीस अधिकारी सँडर्स याचा खून झाल्यानंतर त्या प्रकरणी तपास करताना पोलिसांनी सर्व पुस्तके जप्त केली.

प्रख्यात इतिहासकार इरफान हबीब यांनी लिहिलेल्या 'टू मेक द डिफ



हिअर' या पुस्तकाचे नवी दिल्ली येथे प्रकाशन झाले. त्या प्रसंगी प्रा. जगमोहन सिंग म्हणाले की, शहीद भगतसिंग हे व्यासंगी होते. मात्र ते हिंसेचे पुरस्कर्ते होते असा गैरसमज त्यांच्याबाबत पसरलेला आहे.

### * इंग्लंड-अमेरिकेच्या तुलनेत भारतीय मुले अधिक ग्लोबल!

इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत देशांपेक्षा भारतीय मुलांनाच अधिक 'ग्लोबल' दृष्टिकोन आहे. जगभराच्या घडामोडींबाबत ते जागरूक आहेत.

दहा देशांमध्ये ब्रिटिश कौन्सिलने केलेल्या एका पाहणीमध्ये नायजेरियाने अव्वलस्थानी झेप घेतली आहे. 'अमेरिकन किड्स' नवव्या, तर इंग्लंडमधील मुले तळाशी म्हणजे दहाव्या स्थानी फेकली गेली आहेत!

ब्रिटिश कौन्सिलच्या पाहणीत इंग्लंड, अमेरिका, भारत, ब्राझील, चीन, जर्मनी, स्पेन, चेक प्रजासत्ताक, नायजेरिया आणि सौदा अरेबिया या दहा देशांमधील ११ ते १६ या वयोगटातील ४१७० मुला-मुलांशी इंटरनेटच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला. त्यामध्ये ग्लोबल दृष्टिकोन, जागतिक घडामोडींबाबतचे ज्ञान आणि परदेशी भाषा शिकण्यासंदर्भातील मते आदी विषयांवर विविध निकषांवर सातपैकी गुण देण्यात आले. त्यामध्ये नायजेरियातील मुला-मुलींनी ५.१५ गुण पटकावले. भारतीयांनी ४.८६ गुण मिळविले. ब्राझीलने ४.५३, धार्मिक आणि सनातनवादाचा पगडा असलेल्या सौदी अरेबियातील मुलामुलींनी ३.७४ गुण मिळवून चौथे स्थान मिळविले. स्पॅनिश मुलांनी ३.२९ गुण मिळविले. जर्मन मुलांनी ३.२४, तर चिनी मुलांनी २.९७ गुण मिळविले. चेक प्रजासत्ताकच्या मुलांना २.२१ गुणच मिळविता आले. या पाहणीचा धक्कादायक निष्कर्ष म्हणजे अमेरिका आणि इंग्लंड या प्रगत देशांची पीछेहाट, अमेरिकन मुले २.२२ गुणांसह नवव्या स्थानावर, तर इंग्लंडमधील मुले २.१९ गुणांनी अखेरच्या दहाव्या स्थानी फेकले गेले.

या पाहणीसाठी विशिष्ट घटकामधील मुले निवडण्यात आली नव्हती. तसेच त्यांच्याकडून गृहपाठही करून घेण्यात आला नव्हता. ऑनलाईन स्वरूपात ही पाहणी करण्यात आली. 'तुम्ही प्रथम कोणते नागरिक आहात? ग्लोबल की आपापल्या देशांचे?' असा सवाल विचारला असता फक्त अमेरिका आणि चेक प्रजासत्ताकातील मुलांनी 'आपापल्या देशांचे' असे उत्तर दिले. उर्वरित सर्व मुलांनी ग्लोबल नागरिकत्वावर शिक्कामोर्तब केले. भारत आणि ब्राझीलमधील ६५ टक्क्यांहून अधिक मुले नियमित अभ्यास करतात आणि दिनक्रमाच्या बाहेर जाऊन जागतिक घडामोडी जाणून घेण्यात रस दाखवितात. त्याचप्रमाणे काही जागतिक घडामोडींवर भाष्यही करतात. इंग्लंडमध्ये हे प्रमाण केवळ ३२ टक्के आहे! सौदी अरेबियातील सर्वच्या सर्व १०० टक्के मुलांनी परदेशी भाषा शिकणे गरजेचे असल्याचे सांगितले. भारत-ब्राझीलमधील ९७ मुलांनी तसे मत व्यक्त केले. चीनमधील

८५ टक्के, तर अमेरिकेतील ७३ टक्के मुला-मुलींनी परदेशी भाषा शिकत असल्याचे सांगितले. इंग्लंडमध्ये हे प्रमाण ७० टक्के आहे.

सध्याच्या जगामध्ये अमेरिका हीच सर्व सत्ताधीश असल्याचे मत या दहाही देशांमधील मुला-मुलींनी व्यक्त केले आहे; परंतु नजीकच्या भविष्यात क्रमवारी बदलणार असल्याचे भाकितही व्यक्त केले. ब्रिटिश कौन्सिलच्या पाहणीमध्ये चीन, भारत आणि ब्राझील यांना झुकते माप देण्यात आले आहे. प्रगत देश असे बिरुद मिरवीत असल्याने इंग्लंड, अमेरिकेतील मुले आत्मसंतुष्ट झाली आहेत. त्यामुळेच आत्मकेंद्रितपणा येऊन जगाशी संवादाची दारे बंद होत आहेत. याउलट मागास समजल्या जाणाऱ्या आफ्रिकेतील नायजेरिया–भारत-ब्राझीलसारख्या विकासपथावरील देशांमधील मुला-मुलींमध्ये नावीन्याची ओढ आहे. इंटरनेटद्वारे ग्लोबल दृष्टिकोन निर्माण होऊन 'ग्लोबल व्हिलेज'चे नागरिक होण्याची ओढ जाणवते, असे निरीक्षण कौन्सिलचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्टिन डेव्हिडसन यांनी नोंदविले.

### * राजहंस व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश

मायबोलीतील शब्दांप्रमाणेच नव्याने लोकव्यवहारात रुळलेल्या 'पाहुण्या' शब्दांचे, संकल्पनांचेही अर्थ समजावून देणारा मो. वि. भाटवडेकर कृत 'व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश' वाचकांचे लक्ष वेधून घेत आहे.

आचार्य अत्रे सभागृहातील 'अक्षरधारा' प्रदर्शनाच्या निर्मित्ताने प्रदर्शनाचे सहआयोजक असणाऱ्या 'राजहंस प्रकाशन'तर्फे हा कोश प्रकाशित करण्यात आला. ८८० पानांच्या या कोशाची किंमत आठशे रुपये असली, तरी डिसेंबरअखेरपर्यंत तो पाचशे रुपयांना मिळणार आहे. कोशात व्यावहारिक उपयोगाचे चाळीस हजार शब्द, संज्ञा, संकल्पनांचा समावेश आहे. याशिवाय २९ परिशिष्टांचाही अंतर्भाव आहे. या प्रकल्पासाठी विश्वास ज्ञानप्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक यांचे सहकार्य मिळाले आहे.

कोशाविषयी माहिती देताना 'राजहंस'चे दिलीप माजगावकर म्हणाले, ''कुठलाच शब्दकोश सदासर्वकाळ परिपूर्ण ठरू शकत नाही. लोकजीवनाचे संपर्कमाध्यम असणारी भाषा गतिशील असते. त्यामुळे समाजात घडणाऱ्या असते. त्यामुळे समाजात घडणाऱ्या गोष्टी, अन्य भाषांचा संपर्क अशा भाषिक बदलांचे प्रतिबिंब कोशात पडणे अपेक्षित असते. बहुविद्याशाखीय अभ्यासाला सामोरे जाणारी आजची पिढी भाषेच्या व्यावहारिक बाजूकडे उपयुक्ततावादी दृष्टीने पाहते. नवे शब्द, वाक्यसमूह, संकल्पना ती सहजपणे स्वीकारते. याची जाणीव ठेवून हा कोश तयार केला आहे.''

### * 'आमचा बाप अन् आम्ही'ची आता जनआवृत्ती

मराठीबरोबरच अन्य भाषांमध्ये लोकप्रिय झालेल्या 'आमचा बाप अन् आम्ही'



पुस्तकाची जनआवृत्ती ग्रंथाली प्रकाशनातर्फे निघणार असून तिच्या एक लाख प्रती छापण्यात येणार आहेत. तरुण वर्गापर्यंत पुस्तक पोचावे, म्हणून ३०० पानांच्या या पुस्तकाची किंमत ६० रुपये ठेवण्यात आली आहे. या पुस्तकाच्या आतापर्यंत चार आवृत्या झाल्या असून २९ वेळा पुस्तकाचे पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. भारतीय आणि परदेशी अशा दोन्ही भाषांमध्ये आतापर्यंत या पुस्तकाच्या एकूण दोन लाख २५ हजार प्रतींची विक्री झाली आहे. कोरियात हे पुस्तक लोकप्रिय झाले असून त्याच्या एक लाख प्रती खपल्या आहेत. आतापर्यंत या पुस्तकाच्या मराठीत ५० हजार हिंदी, पंजाबी, उर्दू, गुजराती, कन्नड, तामिळ या भारतीय भाषांमध्ये मिळून २५ हजार, इंग्रजी २५ हजार, फ्रेंच २० हजार आणि स्पॅनिश भाषेत पाच हजार प्रतींची विक्री झाली आहे.

येत्या वर्षभरात 'आमचा बाप आन् आम्ही' बंगाली, ओरिया, मल्याळम् आणि तेलगू या देशी भाषांबरोबरच जर्मन, स्विडिश, इटालियन, चायनीज, जपानी, थाय आणि अरेबिक या परदेशी भाषांमध्ये येणार आहे.

### * वृत्तपत्रांची माहिती आता केवळ एका 'क्लिक' च्या अंतरावर

वृत्तपत्रांमधून आपल्याला बसल्याजागी सर्व दुनियेची खडा न् खडा माहिती मिळते हे सर्वश्रुत आहे. परंतु या वृत्तपत्रांबाबतची तपशीलवार माहिती एकत्रितपणे उपलब्ध नव्हती. ही परिस्थिती आता बदलली असून देशभरातील सर्व वृत्तपत्रांची तपशीलवार माहिती बसल्याजागी मिळविणे शक्य झाले आहे. www.printpublications.com या नव्या संकतेस्थळामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातील छोटी-मोठी सर्वच वृत्तपत्रे एका 'क्लिक'च्या अंतरावर येऊन ठेपली आहेत.

प्रिंट पब्लिकेशन्स डॉट कॉम या नव्यानेच सुरू झालेल्या संकेतस्थळावर देशभरातील सर्व भाषांतील वृत्तपत्रांची माहिती एकत्रित केली गेली आहे. सध्या केवळ 'आयएनएस' अ‍ॅक्रिडेटेड वृत्तपत्रांची व नियतकालिकांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध असून लवकरच 'नॉन अ‍ॅक्रिडेटेड' वृत्तपत्रांचा तपशीलही समाविष्ट केला जाईल.

''आजमितीला देशाच्या २५ राज्यांतील ३२० शहरांतील वृत्तपत्रांची माहिती संकलित केलेली आहे. लवकरात लवकर भारताच्या कानाकोपऱ्यातील सर्व राज्यांतील सर्व भाषांमधील वृत्तपत्रांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.'' अशी माहिती संकेतस्थळाचे संचालक श्री. उपेंद्र वैद्य यांनी दिली.

''सर्वसामान्य नागरिकांच्या जोडीलाच जाहिरात संस्था, प्रसिद्धी आणि जनसंपर्क संस्था, शासकीय संस्था आदींना ही माहिती उपयुक्त ठरणार आहे. एवढेच नव्हे तर वृत्तपत्रांच्या व्यवस्थापकांनादेखील आपल्या स्पर्धक वृत्तपत्राविषयी, त्यांच्या विपणन - जाहिरात धोरणांविषयी अचूक माहिती मिळू शकेल.

वृत्तपत्राचे नाव, कार्यालयाचा पत्ता, शाखा कार्यालये, आवृत्त्या, जाहिरातीचे विविध दर (उदा., मुख्य अंकातील जाहिराती, छोट्या जाहिराती, नोकरीविषयक जाहिराती, खास पुरवण्यांतील जाहिराती), संपादकीय तसेच जाहिरात विभागातील, संबंधित व्यक्तींची नावे व संपर्क क्रमांक आदी तपशील या संकेतस्थळावर देण्यात आला आहे. गुगल मॅप सेवेच्या साहाय्याने विशिष्ट वृत्तपत्राचे अथवा त्याच्या विशिष्ट आवृत्तीचे नेमके स्थान शोधणे सहज शक्य झाले आहे.

*** साधनेची एक लाख पृष्ठांची वेबसाइट**

साधना साप्ताहिकाने १५ ऑगस्टला हीरकमहोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने विविध उपक्रम हाती घेण्याचे ठरवले. साधनेचे गेल्या साठ वर्षात तीन हजार अंक प्रसिद्ध झाले. त्यात सुमारे एक लाख पृष्ठाचा मजकूर प्रसिद्ध झाला. या मजकुरातील निवडक साहित्याचे प्रत्येकी दोन-दोनशे पृष्ठांचे आठ संग्रह प्रा. रा.ग.जाधव आणि ग.प्र. प्रधान यांनी संपादित केले. त्यांचे प्रकाशन झाले. ध्येयवादी पत्रकारितेवर जागोजाग परिसंवाद घेण्यात आले. यापुढे जाऊन साधनेच्या ६० वर्षातील सर्व अंकांचा मजकूर हा इंटरनेटवर वेबसाइटद्वारे उपलब्ध करून देण्यात आला आहे. या वेबसाइटचे उद्घाटन 'टाइम्स ऑफ इंडिया'चे भूतपूर्व संपादक दिलीप पाडगावकर यांच्या हस्ते दि. १८.नोव्हेंबर रोजी करण्यात आले. 'जर्नालिझम इन रिसर्जंट इंडिया' या विषयावर बोलताना पाडगावकरांनी भारतातील पत्रकारितेतील आठ नव्या प्रवाहांचा उल्लेख केला. लोकशाही, संघराज्याचे स्वरूप, धर्मनिरपेक्षता, शासनयंत्रणेऐवजी उद्योगधंद्याकडे व बाजाराकडे लोकांचे केंद्रित झालेले लक्ष, वृत्तपत्र व संज्ञापन माध्यमात झपाट्याने घडून येत असलेले परिवर्तन, लोकसंख्याचे बदलते वयोगट सापेक्ष स्वरूप राज्यकर्ते वयस्क तर ४० टक्के नागरिक तरूण), महिलांचे सर्वच क्षेत्रात वाढत चाललेले प्रमाण, तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि प्रसार (नॅनोटेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी आणि कृषितंत्रज्ञान), संशोधन, लोकांची लोकशाही मार्गाने अपेक्षित उद्दिष्टे साध्य होण्याची आकांक्षा या सद्य:कालीन वैशिष्ट्यांमुळे वृत्तपत्रांचे स्वरूप बदलणे अटळ ठरले आहे. पत्रकारितेत एकूण आशावादी वातावरण आहे. आत्मविश्वास आहे. शिक्षण- सबलीकरण व साहसप्रिय उद्योजकता ही त्रिसूत्री प्रेरणा देत आहे. लोकशाही यंत्रणा( न्यायालये, निवडणूक आयोग, अल्पसंख्य आयोग,मानवी प्रतिष्ठा आयोग) प्रभावी ठरत आहेत. वृत्तपत्रांवर जाहिरातदारांची पकड जास्त तीव्र होत आहे. त्यामुळे पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न दुय्यम ठरत आहे. अशी पाडगावकरांनी या विषयाची मांडणी केली होती. ती श्रोत्यांना अंतर्मुख करणारी ठरली.

*** सकाळतर्फे ग्रंथप्रदर्शन**

सकाळ वृत्तपत्रसमूह सध्या पत्रकारितेबरोबर इव्हेंट मॅनेजमेंटद्वारे लोकांना आकृष्ट करण्यावर भर देत आहे. कंझ्युमर आयटेम्सचे प्रदर्शन, आरोग्य प्रदर्शन, मधुरांगणतर्फे



महिलांचे व्यासपीठ, प्रॉपर्टी एक्झिबिशन, बालकांसाठी चित्रकला स्पर्धा, कृषिप्रदर्शन, पुस्तक प्रकाशन इत्यादी उपक्रम जोरात चालू आहेत. दि. १८ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर कृषिमहाविद्यालयाच्या मैदानावर सकाळतर्फे पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. संभाजीकार विश्वास पाटील यांनी त्याचे उद्घाटन केले. वेगवेगळ्या प्रकाशक विक्रत्यांचे स्टॉल्स न ठेवता, त्यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन स्वत:च भरवण्याचे हे पाऊल निश्चितच धाडसाचे व स्वागतार्ह आहे. 'अक्षरधारा', 'शुभम' 'ज्ञानगंगा' यांच्यातर्फे अशी प्रदर्शने भरतात. सकाळ त्याच्याशी स्पर्धेत उतरत आहे असा याचा अर्थ होतो. सकाळतर्फे गावोगाव अशी प्रदर्शने होत राहिली तर ग्रंथवितरण-विक्रीचे नवे पर्व सुरू होऊ शकेल.

*** मर्ढेकरांच्या स्मारकासाठी ४८ लाखांचा निधी**

सातारा जिल्ह्यातील कवी बा. सी. मर्ढेकर यांच्या मर्ढे येथील स्मारकाचे काम गेली पाच वर्षे रेंगाळले आहे. स्मारकासंदर्भात राज्य मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत ४८ लाख ७६ हजारांचा निधी मंजूर झाला असून त्याबाबतचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. तसेच, तातडीने २५ लाखांचा निधी बांधकाम विभागाला देण्याचा आदेशही देण्यात आला आहे.

सातारा तालुक्यातील मर्ढे गावी मर्ढेकरांचे स्मारक व्हावे यांसाठी २००३ पासून भाजपच्या माजी आमदार कांता नलावडे प्रयत्नशील होत्या. त्यामुळे जिल्हावासियांच्या दृष्टीने स्मारकाचा प्रश्न जिव्हाळ्याचा झाला होता. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या स्मारकाला निधी मंजूर झाल्याने लवकरात लवकर स्मारक उभे राहील अशी आशा नलावडे यांनी व्यक्त केली.

यापूर्वी मंजूर झालेला निधी पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झाल्यानंतर दुसऱ्याच कामासाठी वळविण्यात आला होता.

*** 'जिंकी रं जिंकी'ची आंतरराष्ट्रीय महोत्सवामध्ये हजेरी**

दुर्गम खेड्यात राहून आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत आयुष्यात मोठी झालेली माणसे बरीच आहेत. अगदी लहान वयात शिक्षणाची गोडी लावणारा चांगला हाडाचा शिक्षक मिळाल्यामुळे ज्यांच्या आयुष्याचे सोने झाले त्या भाऊ गवांडे यांच्या आत्मचरित्रावर काढलेला 'जिंकी रं जिंकी' या सिनेमाने आता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातूनही हजेरी लावायला सुरुवात केली आहे.

पाचव्या आशियाई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हा सिनेमा दाखवला जात असून नऊ नोव्हेंबर पासून प्रभात चित्रपटगृहात सवलतीच्या दरात तो प्रदर्शित होत आहे. या सिनेमाचे सहनिर्माते विक्रांत पाटील, दिग्दर्शक ऋषी देशपांडे, बालवयातील भाऊंची भूमिका करणारा देवाशीष परांजपे हा पुण्यातला सात वर्षांचा शाळकरी मुलगा, तसेच राजश्री वाड आणि दिनेश लिमये यानिमित्ताने उपस्थित होते.

हैद्राबाद येथे होत असणाऱ्या १५व्या गोल्डन एलिफंट इंटरनॅशनल चिल्ड्रन फिल्म फेस्टिव्हलच्या एशियन पॅनोरामामध्ये तसेच १३व्या कोलकाता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'जिंकी रं जिंकी'ची निवड झाली आहे.

प्रसिद्ध सनदी अधिकारी भाऊ गावंडे यांच्या 'प्रकाशाच्या उंबरठ्यावर' या पुस्तकावर आधारित 'जिंकी रं जिंकी' मध्ये दंगामस्ती करण्यामुळे वाया गेलेला भाऊ आणि त्याला शिक्षणाची गोडी लावणारे देशमुख मास्तर यांच्यातील संवेदनशील नाते मांडण्यात आले आहे. कोकणातील पोयनार या गावात या सिनेमाचे सलग २५ दिवस चित्रण झाले असून हा सिनेमा तयार करणे, हा एक अनोखा अनुभव ठरल्याचे देशपांडे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील जनजीवन आणि शिक्षणातही फारसा फरक न पडल्यामुळे आजही हा सिनेमा समकालीन ठरत असल्यामुळे त्यातील भाऊच्या आईची भूमिका करताना गंमत आल्याचे अभिनेत्री राजश्री वाड यांनी सांगितले. ❐

## मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा 'ऐका' आता थेट नभोवाणीवर...

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे नभोवाणीच्या सहकार्याने सकाळच्या प्रहरी, दर गुरुवारी, ठीक सात वाजून पन्नास मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

या कार्यक्रमामध्ये वाचक-श्रोत्यांना एक प्रश्न विचारला जाईल. प्रश्नाचे उत्तर 'पोस्टकार्ड'द्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'पुणे' येथील पत्त्यावर पाठवावे. सहभागी स्पर्धकांमधून भाग्यवान विजेत्याची निवड केली जाईल व त्याला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दर्जेदार पुस्तक भेट मिळेल.

**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:५० वाजता 'पुणे नभोवाणीवर'.**



१

## विशेष वार्ता

### मेहता मराठी ग्रंथजगतच्या दीपावली विशेषांकाचे प्रकाशन.

सांगली येथील नियोजित ८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा. म. द. हातकणंगलेकर यांचा पहिला सत्कार करण्याचा सन्मान मेहता पब्लिशिंग हाऊसला मिळाला. दिनांक चार नोव्हेंबर रोजी पुणे दौऱ्यातील आपला नियोजित कार्यक्रमापूर्वी प्रा. हातकणंगलेकरांनी मेहता पब्लिशिंग हाऊसला सदिच्छा भेट दिली.



**प्रा. म. द. हातकणंगलेकर यांचे स्वागत करताना डॉ. आनंद यादव**

यावेळी मेहता मराठी ग्रंथजगतच्या दीपावली विशेषांकाचे प्रकाशन प्रा. हातकणंगलेकरांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव, प्रकाशक सुनील मेहता, कार्यकारी संपादक शंकर सारडा

याप्रसंगी उपस्थित होते.

सत्कारानंतरच्या वार्तालापात प्रा. हातकणंगलेकर म्हणाले, 'मराठी भाषेच्या भविष्याविषयी मी आश्वस्त आहे, दर्जेदार साहित्यासाठी आसुसेलला वाचकवर्ग ग्रामीण भागात मोठ्या संख्येने निर्माण झाला आहे. विदर्भ-मराठवाडा-खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रात नव्या अभिव्यक्तीतून साहित्य लिहिणारे लेखक पुढे येत आहेत, मराठी साहित्यात ते मोलाची भर घालत आहेत. मराठी साहित्याची निर्मिती करणाऱ्या मुंबई-पुणे-ठाणे या महानगरी केंद्रांना मरगळ आली असून ह्या केंद्राबाहेरील तरुण लेखक सातत्याने सर्जनशील निर्मिती करताना दिसतात. कृष्णा खोत, राजन गवस, भारत सासणे, मोहन पाटील, विजय जाधव या लेखक मंडळीची मराठीत नवे काही आणण्यासंबंधीची आत्मीयता उघड दिसते. कृष्णा खोतांनी डॉ. आनंद यादव यांच्या ग्रामीण साहित्य परंपरेला पुढे चालवण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.'

'सध्याच्या मराठी समीक्षेवर पाश्चात्य समीक्षापद्धतीचा प्रभाव आहे. मात्र हा प्रभाव उपकारक ठरणार नाही. पाश्चात्य आणि मराठी साहित्य यात मूलभूत फरक असून मराठी साहित्यातील सामर्थ्य शोधण्यास पाश्चात्य समीक्षा अपूरी पडणार आहे. तसेच पूर्वीची एकधर्मी आणि एकसंघ समीक्षा पद्धत आता बदलेली असून तिच्यात अनेक नवे प्रवाह मिसळू लागले आहेत, असेही प्रा. हातकणंगलेकरांनी नमूद केले. वाङ्मयीन निर्मीतीच्या दृष्टीने या काळात भरभरून साहित्यनिर्मीती होत असली तरी समकालीन प्रवाहात टिकणारे साहित्य किती याबाबत शंकाच आहे. याची नेमकी मीमांसा करण्यासाठी ज्ञानेश्वरांपासूनच्या मराठी साहित्याचे मूळ व्यापक वर्तुळ आणि आजचे समकालिन साहित्याचे बंदिस्त वर्तुळ यांच्यात संवाद साधणारी समीक्षाच मराठी भाषेलाच उपयुक्त ठरेल असे मत त्यांनी मांडले.

या सदिच्छा भेट प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते प्रा. हातकणंगलेकरांचा सत्कार करण्यात आला.

❐



२

### * समाजविज्ञानकोशाच्या दुसऱ्या आवृत्तीचे दिमाखदार प्रकाशन

ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक स.मा.गर्गे यांनी अथक प्रयत्नांतून संपादित केलेल्या भारतीय समाजविज्ञान कोशाची दुसरी आवृत्ती मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नुकतीच प्रकाशित झाली.

चार नोव्हेंबर रोजी गर्गे यांच्या स्मृतिदिनी पुणे येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित होणारा हा पहिलाच कोश प्रकल्प आहे.

१९७७-७८ च्या सुमारास स.मा.गर्गे यांनी भारतीय समाजविज्ञान कोशाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी केली. १९८० साली कोशाच्या प्रत्यक्ष लेखनास सुरुवात झाली. १९८६ साली मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते कोशाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन झाले. शेवटचा सहावा खंड १९९३ साली प्रकाशित झाला.

सामाजिक शास्त्रांचा असा कोश तोपर्यंत इतर कोणत्याही भारतीय भाषेत उपलब्ध नव्हता. त्यामुळे भारतीय भाषांतील सामाजिक विज्ञानाचा पहिला कोश म्हणून या कोशाला मान्यता मिळाली आणि मोठ्या प्रमाणावर स्वागतही झाले. संस्कृतीकोश – विश्वकोशाबरोबरच समाजविज्ञान कोशही संदर्भास उपयुक्त ठरू लागला. कोशाची पहिली आवृत्ती अल्पावधीतच संपली.

कोशाची दुसरी आवृत्ती काढण्याचे श्री. गर्गे यांच्या मनात होते. मात्र प्रकृतीअस्वास्थ्यामुळे ते लांबणीवर पडले. त्यांच्या अकस्मात निधनाने यात बराच कालावधी गेला.

समाजविज्ञान मंडळ न्यास आणि मेहता पब्लिशिंग हाऊस यांच्या संयुक्त प्रयत्नातून कोशाची दुसरी आवृत्ती अधिक देखण्या स्वरुपात वाचकांच्या, अभ्यासकांच्या सोयीसाठी उपलब्ध झाली आहे.

चार नोव्हेंबर हा स.मा गर्गे यांचा स्मृतिदिन, याचे औचित्य साधून प्रकाशनसोहळा आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने ज्येष्ठ विचारवंत आणि पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचे 'विज्ञानयुगातील सामाजिक आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित

करण्यात आले होते. यावेळी बोलताना नवलगुंदकर म्हणाले,' विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुखकर बनवले आहे. सर्व प्रकारची भौतिक सुखे उपभोगण्यास मिळत आहेत. मात्र यात एक प्रकारची अपूर्णता आहे. माणूसच माणसापासून दूर गेल्याचे सध्या चित्र आहे, अशा परिस्थितीत माणसातील मनुष्यत्व जागृत करणे हेच विज्ञानयुगातील मोठे आव्हान आहे.

'पाश्चिमात्य देशांकडून शिस्त आणि कार्यनिष्ठा घ्यायला हवी. जे चांगले आहे ते स्वीकारलेच पाहिजे. मात्र कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारायला नको. भारतीय संस्कृतीतील काही मूल्ये चांगली जतन करण्याची आवश्यकता आहे, असे मत डॉ. नलवगुंदकर यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी अनेक सुहृदांनी गर्गे यांच्याबद्दलच्या स्मृती जागवल्या. दादासाहेब नाईकनवरे, विश्वास नाईकनवरे, सुरेश खुरसाळे यांनी गर्गे यांच्या कार्याचा आढावा घेतला. ज्येष्ठ पत्रकार आणि पुरवणी खंडांचे संपादक एकनाथ बागूल, सहसंपादिका प्रतिभा गुंडी, कविता भालेराव, मंगला जोगाईकर, दै. लोकमतचे सहसंपादक मनोहर कुलकर्णी आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक सुनील मेहता आदी मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते. ❒

## समाजविज्ञान कोश
## संपादक - स.मा.गर्गे
## एक दृष्टिक्षेप....

### **खंड पहिला :** महत्त्वाचे विषय

मानवी जीवनाचा मूलाधार अर्थ-पैसा. या आर्थिक तत्त्वाला प्राधान्य दिला गेलेला हा पहिला खंड. या खंडात अकारविल्हेप्रमाणे **अर्थशास्त्रातील विचारांना, सिद्धांतांना आणि मूलभूत प्रश्नांना महत्त्वाचे स्थान** दिले गेले आहे. या खंडात प्रामुख्याने अर्थशास्त्रावर आधारित असलेले लेख आढळतील. त्यापैकी महत्त्वाचे ठळक विषय व लेख पुढीलप्रमाणे आहेत.

अखंड क्रांती, अधिकार, अनुसूचित जाति-जमाती, अपंगत्व, अराज्यवाद, अर्थव्यवस्था, अर्थसंकल्प, अलिप्ततावाद, अल्पसंख्याक, असहकार आंदोलन, अहमदिया पंथ, ॲरिस्टॉटल, आदिवासी समाज, आधुनिकता, आर्थिक नियोजन, आर्थिक राहणीमान, आर्थिक विचारांचा इतिहास, आर्थिक साधनसामग्री, भारत, आज्ञापत्र, आंतरराष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय संबंध, आंबेडकर डॉ. बाबासाहेब, ऑगस्टीन, ऑस्टिन, इपिक्युरस, इहवाद, उत्क्रांती, उदारमतवाद, उद्योग, उपयुक्ततावाद, उपयोगिता, ऊर्जा इत्यादी

### **खंड दुसरा :** महत्त्वाचे विषय

दुसऱ्या खंडातही पहिल्या खंडाप्रमाणे प्रामुख्याने अर्थविषयक नोंदी आहेतच; पण त्याबरोबर अकारविल्हेप्रमाणे इतर विषयांच्या नोंदींचाही समावेश या खंडात आहे. अनेक तज्ज्ञ, विचारवंत व्यक्तिमत्त्वांचाही परिचय या खंडात करून देण्यात आला आहे.

या खंडातील प्रमुख नोंदी पुढीलप्रमाणे आहेत:

एकदेवतावाद, एकात्मता-राष्ट्रीय, एंगल्स फ्रेडरिक, ऐतिहासिक भौतिकवाद, औद्योगिक संबंध, कम्युनिस्ट जाहीरनामा, कम्युनिस्ट पक्ष, कर व करआकारणी, कल्याणकारी राज्य, कामगार संघटना, कायदेमंडळ, क्रांती, क्रांती-औद्योगिक, क्रांती-रशिया, किसान चळवळ, किंमत, कुटुंबनियोजन, कुटुंबसंस्था, कुल, कुलक, कुलपरंपरा, कुलाचार, कूले चार्लस् हार्टन, केतकर (डॉ.) श्रीधर व्यंकटेश, केंद्र-राज्य वित्तीय संबंध, क्रोबर ए. एल, कौटिल्य, खनिज संपत्ती, खंड, खिलाफत चळवळ, खेडे, ग्रामीण समाज, गांधी महात्मा, गोखले गोपाळ कृष्ण, गोवा मुक्तिसंग्राम, घटनादुरुस्ती, चलनपद्धती, चार्वाक, जातिव्यवस्था, जातिनिर्मूलन, जेफरसन थॉमस, जोशी गणेश वासुदेव इत्यादी.

### **खंड तिसरा :** महत्त्वाचे विषय

अनेक विषय अंतर्भूत असणारा हा तिसरा खंड. या खंडात जसे नफा, नाणेबाजार, पैसा, भांडवल असे अर्थशास्त्रविषयक लेख आहेत; तसेच तंत्रज्ञशाही, तह व करार, नकाराधिकार, न्यायमंडळ, निवडणूक, महायुद्ध यासारखे **राज्यशास्त्रा**तील लेखही समाविष्ट आहेत. त्याचप्रमाणे नातेव्यवस्था, पडदापद्धती, बालगुन्हेगार, बालविवाह, भटक्या जमाती यासारख्या **समाजशास्त्रा**तील संकल्पनांचाही समावेश आहे.

याशिवाय **नागरिकशास्त्र, प्रबोधन, पर्यावरण, परातत्त्वविद्या, प्रौढशिक्षण यासारख्या इतर सामाजिक शास्त्रां**शी निगडित विषयही

त्यात अंतर्भूत आहेत.

या खंडातील प्रमुख नोंदी पुढीलप्रमाणे आहेत:

टाळेबंदी, टॉयन्बी, टिटो मार्शल, टिळक लोकमान्य, डुरखाईम, तलाक, ताश्कंद करार, तॉकव्हील, तुरुंगसुधारणा, दलवाई हमीद, दलित पँथर, दहशतवाद, दारिद्र्य, द्विराष्ट्रवाद, दुष्काळ, देशमुख गोपाळ हरी (लोकहितवादी), धर्मनिरपेक्ष राज्य, नफा, नवमानवतावाद, नागरिक, नाणेबाजार, नातेव्यवस्था, न्याय, न्यायपद्धती-भारत, नाझीवाद, निवडणूक-भारत, नेतृत्व, नेहरू जवाहरलाल, नोबेल पारितोषिक, पडदापद्धती, परराष्ट्रधोरण, पंचशील, पंचायत राज्य, प्रबोधन, पिगू आर्थर, प्लेटो, पुरातत्त्वविद्या, पोलादी पडदा, प्रौढ शिक्षण, फॅसिझम, फाळणी, फुले महात्मा, बहिष्कार, बहुमताचे अधिराज्य, बालगुन्हेगार, बेकारी, भटक्या विमुक्त जमाती, भ्रष्टाचार, भांडवल, भूदास-पद्धती, मतदान, मॅकआयव्हर, मॅनहेम कार्ल, मानवशास्त्र, मार्क्सवाद, मिर्दाल गुन्नार, मूर्तिपूजा, मेन्शेव्हिक इत्यादी.

## खंड चौथा : काही महत्त्वाचे विषय

स्वामित्वाच्या भावनेतून आणि ईर्षेतून राजा, राज्य, राज्यसंस्था या संकल्पना विकसित होत गेल्या. चौथ्या खंडाचा **राज्यशास्त्र हा प्रमुख विषय**. अर्थात इतर विषयांनीही इथं हजेरी लावली आहेच. राज्यशास्त्राच्या अनेक लेखांचा प्रामुख्याने समावेश असलेल्या या खंडात समाजशास्त्रविषयक नोंदीही आहेत.

शिवाय महादेव गोविंद रानडे, रमाबाई रानडे, राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, शाहूमहाराज या भारतीय विचारवंतांबरोबर पाश्चात्त्य विचारवंतांचाही परिचय या खंडात करून देण्यात आला आहे.

या खंडातील प्रमुख नोंदी पुढीलप्रमाणे आहेत :

रसेल बर्ट्रांड, राजकीय तत्त्वज्ञान, राजकीय दबावगट, राजकीय पक्ष, राजकीय संस्कृती, राजकीय सिद्धांत, राज्य, राज्यघटना, रानडे महादेव गोविंद, रॉय मानवेंद्रनाथ, राष्ट्रवाद, राष्ट्रीयीकरण, रिकार्डो, लास्की, ल्युथर मार्टिन, लोककथा-लोकगीते, लोक- प्रशासन, लोकपाल व लोकायुक्त, लोकशाही, लोकसंख्या, वर्ग-सामाजिक, वसाहतवाद, वॉलरस लिआँ, व्याज, व्यापार, विवाहसंस्था, वृद्धापकाळ, विषमता, शासनसंस्था, शासनपद्धती, शाहूमहाराज (राजर्षी), शांततामय सहजीवन, शीतयुद्ध, सत्ता, सत्ताविभाजन, समाज, समाजवाद, समान नागरी कायदा, सर्वोदय, सहकार, सहशिक्षण, संस्कृती, स्वयंसेवी संघटना इत्यादी.



## खंड पाचवा : काही महत्त्वाचे विषय

समाजशास्त्र हा प्रामुख्याने पाचव्या खंडातील लेखांचा विषय.

हा खंड प्रकाशित झाला, तेव्हा समाजशास्त्र हा विषय विकसित होण्याच्या मार्गावर होता. आज हा विषय खूपच अभ्यासनीय, विस्तृत संकल्पनांवर आधारित आणि नवनवीन कल्पनांचा आविष्कार व अभिनव दृष्टी यांनी परिपूर्ण बनला आहे. त्यामुळे या बदलत्या जगाचा जास्तीत जास्त आढावा नवीन पुरवणी खंडात घेण्याचा प्रयत्न केला आहे. पुरवणी खंडात नवीन विषय, संकल्पना, विचारवंत, बदलती परिस्थिती यानुसार लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. या खंडात अखेरीला लेखसूचीही देण्यात आली आहे.

पाचव्या खंडातील प्रमुख नोंदी पुढीलप्रमाणे आहेत :

साम्यवादी चळवळ, सामाजिक आंदोलन, सामाजिक एकात्मता, सामाजिक गतिशीलता, सामाजिक जीवन, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक मानदंड, सामाजिक समस्या, सामुदायिक शेती, सार्वमत, सांघिक सौदा, स्टालीन, स्वातंत्र्य, सिस्मंडी, स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्रीशिक्षण, सुवर्णप्रमाण, स्पेन्सर हर्बर्ट, सोव्हिएट, हस्तव्यवसाय, हाराकिरी, हॉब्ज थॉमस, हिंदू राष्ट्रवाद, हुंडा, हुकूमशाही, ह्यूम ॲलन, हेगेल विल्यम, हेरगिरी, होमरूल चळवळ, ज्ञानाचे समाजशास्त्र इत्यादी.


## पारिभाषिक शब्दसंग्रह

सामाजिक शास्त्रांमधील मूळ इंग्रजीतील शब्दांना मराठीत रूपांतरित करून अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना मराठीत लेखन करणे सोपे व्हावे या उद्देशाने पारिभाषिक शब्दसंग्रहाची निर्मिती झाली आहे. मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी असा पारिभाषिक शब्दसंग्रह प्रसिद्ध करण्यात आला आहे. नवीन पुरवणी खंडात वापरण्यात आलेल्या संज्ञांचाही समावेश करून हा संग्रह परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आला आहे.

**प्रत्येक खंडाची किंमत रु.५००/-प्रत्येकी.**
**पाच खंडाच्या संपूर्ण सेटची किंमत रु.२५००/-**
**सवलतीची किंमत रु.२०००/-**

**पोस्टेज रु. १००/-**

## आगामी




**डॉ. किरण बेदी प्रस्तुत**

# तुरुंगातील सावल्या

**भारतीय कारागृहातील माता व मुले**

मूळ इंग्रजी लेखक
**रुझबेह भरुचा**
अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत १८०रु. पोस्टेज ३० रु.**

‘तुरुंगातील सावल्या’ या पुस्तकात भारतीय तुरुंगात राहणाऱ्या स्त्रिया व मुलांच्या भावनिक जीवनावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. यासाठी लेखकाने देशभरातील तुरुंगात जीवन कंठणाऱ्या अनेक कैदी स्त्रिया व त्यांच्या मुलांशी संवाद साधून तुरुंगातील परिस्थिती, असुरक्षितता, त्या कैदी स्त्रियांची व मुलांची धडपड, आनंद, आशा आणि स्वप्ने याचे चित्रण या पुस्तकात दिले आहे.

तुरुंगातील कैद्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती, त्याचप्रमाणे कैदी स्त्रियांची मुले, त्यांच्याशी काम करणारे समाजसेवक, तुरुंगाधिकारी आणि वकील यांच्या मुलाखती रोमांचकारी आहेत. त्या वाचताना एका वेगळ्या भावनिक कल्लोळाचा अनुभव वाचकाला येतो. आपल्या हळुवार, नाजूक व क्वचित नर्म विनोदाची झालर असलेल्या शैलीत लेखक वाचकाला या एका प्रवासात आपल्यासोबत घेऊन जातो.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## दखल

### साक्षेपी समीक्षकाचा सन्मान

मराठीतील एक साक्षेपी समीक्षक आणि अध्यापक प्राचार्य म. द. हातकणंगलेकर यांची सांगली येथे होणाऱ्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली; ही निवड अपेक्षितच होती. यंदाच्या निवडणुकीत पाच उमेदवार उभे होते आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीत प्रथमच आर्थिक आमिषाचा वापर झाल्याचा प्रवाद प्रकट झाला; त्यामुळे या निवडणुकीचा निकाल अनपेक्षित लागेल की काय अशी शंका काही जाणकारांना सतावत होती. तशात ‘सकाळ’ने एसएमएसद्वारे केलेल्या एका पाहणीत राजन खान यांनी ४२ टक्के तर प्रा. द. ता. भोसले यांनी २७ टक्के मते मिळवून प्रा. हातकणंगलेकर यांना तिसऱ्या क्रमांकावर टाकले होते. त्यांना फक्त १८ टक्के मते ‘रसिकां’कडून मिळाली होती. मीना प्रभू (१० टक्के मते) आणि वसंत आबाजी डहाके (३ टक्के मते) यांना शेवटचे क्रम मिळाले होते. हा निष्कर्ष २८ ऑक्टोबरच्या अंकात आला होता. त्यानंतर ३० तारखेच्या एका दैनिकात विदर्भ, छत्तीसगढ, मध्यप्रदेश यांच्या मताधिक्याचे बळ लाभल्याने प्रा. वसंत आबाजी डहाके यांचे पारडे जड असल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. असो!

या निवडणुकीत ७८८ पैकी ६०० मतदारांनी जो कौल दिला, त्यात प्रा. हातकणंगलेकरांच्या ज्येष्ठत्वाचा यथोचित मान राखला गेला याचा आनंद वाटतो. खुद्द त्यांच्याच कर्मभूमीत म्हणजे सांगली शहरात हे संमेलन होत आहे; त्यामुळे या संमेलनाचे नियोजन देखणे आणि संस्मरणीय व्हावे याबाबत सांगलीकर मुळीच कसूर करणार नाहीत अशी अपेक्षा मराठी साहित्यप्रेमींनी बाळगायला हरकत नाही.

उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी स्वागताध्यक्षाची माळ पत्रकार-संपादक उत्तम कांबळे यांच्या गळ्यात उदारपणे टाकली असली तरी त्यांची सर्वतोपरी मदत संमेलनाला राहील असे गृहीत धरूया. महाराष्ट्रात साहित्य संमेलनात राजकारणी व्यक्तींचा वरचष्मा असू नये ही भूमिका दीर्घकाळ सर्वसंमत आहे. त्यानुसार एक वाङ्मयप्रेमी व्यक्ती म्हणून आर. आर. पाटील आणि त्यांचे सहकारी, तसेच मुख्यमंत्री विलासराव देशमुख हात आखडता घेणार नाहीत. साहित्य संमेलनाचा सोहळा हा मराठी माणसाच्या अस्मितेचा एक अभिमानास्पद आविष्कार असतो आणि तेथे त्या निमित्ताने मराठी भाषा आणि साहित्य यांचा



प्रा. म. द. हातकणंगलेकर

एक दिव्यभव्य साक्षात्कार होत असतो. अशा सोहळ्यासाठी पाच-दहा कोटी म्हणजे किस झाड की पत्ती! आपल्या सांस्कृतिक अभिरुचीच्या संवर्धनासाठी हजार, दोन हजार कोटींचे बजेटही खरे तर कमीच ठरावे. आंध्रप्रदेशने तेलुगू भाषकांचा जागतिक मेळावा परदेशात घेऊन आपल्या श्रेष्ठत्वाची पताका डौलदारपणे फडकवली. मराठी साहित्य संमेलनाचेही आयोजन न्यूयॉर्क, लंडन, सिडने, मॉरिशस अशा आंतरराष्ट्रीय स्थळी व्हायला हवे. सर्वत्र आपली भावंडे आहेत. मराठी भाषकांचे सर्वदूर वास्तव्य आहे. तेथेही मराठी भाषेचा आणि साहित्यसंस्कृतीचा जागर नित्यनेमाने व्हावा अशी आपली भावना हवी.

प्राचार्य हातकणंगलेकर यांचा जन्म हातकणंगले येथे १ फेब्रुवारी १९२७ रोजी झाला. शिक्षणही कोल्हापूर, सांगली येथे झाले. धारवाड येथे चार वर्षे अध्यापन केल्यावर १९५७ पासून ते सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत झाले. १९७४-७९ दरम्यान ते प्राचार्य होते. इंग्रजी हा विषय घेऊन एम.ए. झाल्यामुळे वाङ्मयीन समीक्षेचा एक विशाल पट कुठल्याही अभ्यासकापुढे उभा राहतो आणि त्या तुलनेत मराठी साहित्याच्या मर्यादांची सतत जाणीव होत राहते. मराठी समीक्षेत नवनव्या संकल्पना आणण्याचे काम प्रामुख्याने इंग्लिशच्या प्राध्यापकांनी केले आहे हे याचेच निदर्शक आहे.

प्रा. हातकणंगलेकर यांनी अनेक पाश्चात्त्य कथाकारांच्या कथांचे अनुवाद केले; परंतु मराठी साहित्यावर, मराठी कथेवर, मराठी लेखकांवर प्रेम केले. पाश्चात्त्य समीक्षा व्यवहाराशी त्यांचा संपर्क असल्याने मराठी समीक्षेत अनेक नवनव्या कल्पना त्यांनी आणल्या; त्यांच्या परिप्रेक्ष्यातून निवडक मराठी काव्याचा आणि मराठी कथा-कादंबऱ्यांचा मागोवा घेतला. इंदिरा संत आणि शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या काव्यसंग्रहाचे त्यांनी वेधक रूप वाचकांपुढे मांडले. साहित्यातील



अधोरेखित, वाङ्मयीन शैली आणि तंत्र, लघुकथा-रूप आणि परिसर ही त्यांची १९८०-८६ च्या दरम्यान प्रसिद्ध झालेली पुस्तके नव्या प्रतिभावंतांबद्दल त्यांना वाटणारी आस्था प्रकट करतात. मराठीतील कथासाहित्यातील कैलास, मानसरोवर म्हणून मानल्या जाणाऱ्या जी. ए. कुलकर्णी यांचा सहवास आणि लोभ प्रा. हातकणंगलेकरांना लाभला. जी. ए. आणि हातकणंगलेकर यांच्यात अखंड पत्रव्यवहार चाले. 'जी.एं.ची निवडक पत्रे' या ग्रंथाचे संपादनही त्यांनी श्री. पु. भागवतांच्या सहकार्याने केले. जी.एं.च्या निवडक कथांचा संग्रह 'डोहकाळिमा' या नावाने १९८७ मध्ये काढला. जी.एं.वर त्यांनी वेळोवेळी भरपूर लिहिले आहे. 'उगवाई' हे मासिक काही वर्षे चालवले. सांगलीला विलिंग्डन महाविद्यालयात प्रा. हातकणंगलेकर अनेक चर्चासत्रे, परिसंवाद घेत. अशा काही चर्चासत्रांना हजर राहण्याची संधी मिळाली. नेटके आयोजन, निमंत्रितांची आस्थापूर्वक व्यवस्था, चर्चेचा समतोल राखण्यातील कौशल्य त्यावेळी बघायला मिळे. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात पॉप्युलर प्रकाशनच्या रामदास भटकळांच्या पुढाकाराने 'मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप' यावर झालेल्या परिसंवादाचे पुस्तकही प्रा. हातकणंगलेकर आणि प्रा. गो. मा. पवार यांनी संपादित केले आहे. 'साहित्यसोबती' (१९९७) या पुस्तकात कथाप्रभू जी.ए., प्रभाकर पाध्ये, जयवंत दळवी, श्री. दा. पानवलकर, दर्शनकार चारुता सागर, व्यंकटेश माडगूळकर, प्रा. स. शि. भावे वगैरे लेखकमित्रांवर त्यांनी भरभरून लिहिले आहे. 'साहित्यविवेक' (१९९७) मध्ये निवडक २५ समीक्षालेखांचा संग्रह आहे. मर्ढेकर, रा. भा. पाटणकर यांच्या समीक्षेचे व सौंदर्य विचाराचे त्यात परिशीलन केले आहे. 'उघडझाप' हे आत्मकथनात्मक पुस्तकही मौज प्रकाशनने प्रसिद्ध केले आहे. त्यात आपले बालपण, मामांचे घर, शिक्षण, स्नेही सुहृद यांच्याबद्दल बरेच मोकळेपणाने त्यांनी लिहिले आहे. ते खरे अंतर्मुख वृत्तीचे; पण येथे थोडे खुले झाले आहेत.

निवृत्तीनंतर प्रा. हातकणंगलेकर लेखन-वाचन आणि दौरे यात रमलेले आहेत. जी. ए. कुलकर्णी यांचे धारवाडमधील कडेमनी कंपाउंडमधील घर मूळ मालकाकडून विकत घेऊन तेथे जी.एं.चे स्मारक करण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. छायाचित्रकार दिलीप कुलकर्णी यांनी जी.एं.शी संबंधित अनेक व्यक्तींना वा स्थळांना भेटी देऊन जी.एं.च्या जीवनाचा आणि साहित्याचा संबंध उलगडून दाखवण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यांचेही सहकार्य प्रा. हातकणंगलेकरांना मिळालेले आहे. हे स्मारक त्यामुळे चांगल्या प्रकारे आकाराला येऊ शकेल. आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीत प्रा. हातकणंगलेकर जी.एं.च्या स्मारकाच्या दृष्टीने हे वातावरण निर्माण करू शकतील. जी.एं.चे जवळचे स्नेही या नात्याने हातकणंगलेकरांना या स्मारकाबद्दल विलक्षण आस्था आहे.

**शंकर सारडा**

**पुस्तक परिचय**




## कल्पनाशक्तीची विलक्षण झेप

---

# प्रेमाचा रेणू

---

**डॉ. संजय ढोले**

मराठीत विज्ञानकथा हा प्रकार आता वाचकांच्या आकर्षणाचा विषय झाला आहे. डॉ. जयंत नारळीकर यांनी विज्ञानकथांना प्रतिष्ठा मिळवून दिली. निरंजन घाटे, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, द. व्यं. जहागीरदार, माधुरी शानभाग ही नावे या क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यातच डॉ. संजय लोंढे यांचे नाव घ्यायला हवे. 'प्रेमाचा रेणू' हे त्यांचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात विज्ञानातील अनेक आकर्षक संकल्पना वापरल्या आहेत.

आपला मित्र सतीश हा स्वरूपसुंदर अलका शहाच्या प्रेमात पडला आहे, पण ती मात्र त्याच्याकडे ढुंकूनही बघत नाही. आपल्या या मित्राला मदत करायला हवी म्हणून शरद संशोधन करतो, ही 'प्रेमाचा रेणू' या कथेतील मध्यवर्ती कल्पना आहे.

स्त्री-पुरुषांच्या आकर्षणाला फिनाईल-इथाईल-अमाईन या मेंदूत तयार होणाऱ्या रसायनाबरोबर डोपॅमाइन हे रसायनही आवश्यक असते; डोपॅमाइन इंजेक्ट केले तर त्या दोन व्यक्तीत प्रेमभावना उफाळून येऊ शकेल असे शरदच्या लक्षात येते. तो सतीशच्या लाळेपासून विशिष्ट रेणू वेगळे करून ते फिनाईल-इथाईल-अमाईन-डोपॅमाइन यांच्या रसायनात मिसळतो. हे रसायन शरद अलकाला सॉफ्ट ड्रिंकमधून देतो आणि अलका खरोखरच सतीशच्या प्रेमात पडते. त्यांचे लग्न होते; परंतु नंतर वर्षभराने परदेशातून शरद त्यांना भेटायला येतो तेव्हा त्यांचा घटस्फोट झालेला असतो. का? सतीश खुलासा करतो, ''अलकावर माझं जिवापाड प्रेम होतं. ती सुंदर होती. तिचंही माझ्यावर प्रेम होतं, पण स्वभावानं



**डॉ. म्हसकर एकाग्र होऊन योगसिद्धीचा प्रयोग करतात. चार अतिरेक्यांची डोकी हे त्यांचे लक्ष्य. योगसिद्धीमुळे शरीरातून बाहेर पडणाऱ्या प्रारणांचा मारा ते अतिरेक्यांवर करतात. ते अतिरेकी लोळागोळा होऊन खाली पडतात.विमानाचा कॅप्टन थक्क होतो.**

ती खत्रूड होती. अहंमन्य होती. सारखं तुझं-माझं करायची. शृंगाराच्या वेळी नको तेवढी आक्रमक व्हायची. पैसा व शृंगार यांनाच सर्वस्व मानायची... तेव्हा तिच्यापासून दूर होणं मला भाग पडले.''

आपण शोधलेल्या प्रेमाच्या रेणूनं आपलं काम केलं; **पण तो माणसाचा स्वभाव बदलू शकत नाही.** त्या रसायनानं सुंदर स्त्रीला वश करून घेता येईल; पण त्यामुळं जन्मभर पश्चात्तापाची पाळी येईल. हे रसायन निसर्गाविरुद्ध आहे, विघातक आहे, अनर्थकारक आहे असे शरदला जाणवते. प्रेम हे नैसर्गिकरीत्याच व्हायला हवे. रसायनाच्या प्रभावाने नव्हे, हे त्याच्या लक्षात येते.

प्रेमाच्या रेणूची ही कल्पना–सतीश-अलका यांच्या प्रेमकहाणीतून चांगली फुलवत नेली आहे.

चांगल्या कल्पनेचा वा शोधाचाही चुकीच्या व्यक्तीमुळे अनर्थावह प्रभाव पडू शकतो.

पदार्थ तापवला की त्यातून मूलद्रव्ये-प्रारणे बाहेर पडतात. हेच तत्त्व शरीराबाबतही लागू पडते. मानवी शरीरही जर योगसिद्धीने तप्त केले तर विशिष्ट प्रारणे वा तरंग बाहेर टाकू लागते. शरीरातील तापमान आणि बाह्य वातावरणातील तापमान यात फरक असल्याने निर्माण होणाऱ्या विक्षेपकामुळे प्रारणांची ऊर्जा बाहेर फेकली जाते. या ऊर्जेने बाहेरच्या वस्तूचा विध्वंस होऊ शकतो...

ही संकल्पना 'योगसिद्धी' या कथेमध्ये विकसित करून दाखवली आहे.

डॉ. म्हसकर हे एक शास्त्रज्ञ. ते योगसिद्धीने आपल्या शरीरापासून प्रचंड प्रमाणात प्रारणे सोडू शकतात, त्या प्रारणांतील ऊर्जेने बाह्य वस्तूदेखील जळून खाक होऊ शकते.

हे संशोधन आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर करण्यासाठी ते विमानाने निघतात. त्या विमानात चार अतिरेकी असतात.

''या विमानाचे अपहरण केले आहे. कोणीही गडबड केली तर ठार मारू.'' अशी धमकी ते देतात. ते विमान पुन्हा दिल्लीकडे वळवण्यात येते. संसदभवनवर ते आदळावे अशी अतिरेक्यांची योजना असते.

**‘काळकोठडी’ या कथेत एका गुहेत सापडलेले शुष्क अवस्थेतील मात्र सुप्तावस्थेतील मानवी देह मृत नव्हे तर जिवंत अवस्थेत असल्याचे वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. पंडित यांना आढळते. त्या देहाच्या तोंडावर दोन फूट उंचीवर एक चंचुपात्र असते.**

डॉ. म्हसकर एकाग्र होऊन योगसिद्धीचा प्रयोग करतात. चार अतिरेक्यांची डोकी हे त्यांचे लक्ष्य. योगसिद्धीमुळे शरीरातून बाहेर पडणाऱ्या प्रारणांचा मारा ते अतिरेक्यांवर करतात. ते अतिरेकी लोळागोळा होऊन खाली पडतात.

विमानाचा कॅप्टन थक्क होतो. सर्व प्रवासी स्तब्ध होतात. हे कसे घडले?

दिल्ली विमानतळावर उतरल्यावर डॉ. म्हसकर अमेरिकेला जाण्याचा बेत रद्द करतात. का?

‘‘मी हा एक मानवी बॉम्बच तयार केला आहे. माझी विवेकबुद्धी जागृत आहे म्हणून ठीक. ही योगसिद्धी अतिरेकी शक्ती एक महासंहारक शस्त्र म्हणून वापरू शकतील आणि पृथ्वीला वेठीला धरू शकतील.’’

आपला हा शोध ते आपल्या मेंदूतून काढून टाकतात.

अतिरेक्यांचा खात्मा कुणी केला, कसा केला हे गूढ ते तसेच कायम ठेवतात.

राष्ट्रपती-पंतप्रधान हा दैवी चमत्कार होय असे म्हणतात; तेव्हा डॉ. म्हसकर फक्त हसतात.

‘काळकोठडी’ या कथेत एका गुहेत सापडलेले शुष्क अवस्थेतील, सुप्तावस्थेतील मानवी देह मृत नव्हे तर जिवंत अवस्थेत असल्याचे वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. पंडित यांना आढळते. त्या देहाच्या तोंडावर दोन फूट उंचीवर एक चंचुपात्र असते. त्यात गुलाबी रंगाचे फेनॉल्फथॅलिन द्रावण असते... याचा अर्थ हे मानवी शरीर श्वसन करत आहे असे ते म्हणतात.

या शुष्क मानवी देहात सुप्तावस्थेतून बाहेर काढण्याचे आव्हान डॉ. पंडित जीवशास्त्रज्ञ डॉ. मकरंद पानशे यांना देतात.

...या देहात विशिष्ट दाबाने व वेगाने रक्त सोडण्यात येते... हृदयातील झडपांची सूक्ष्म हालचाल होऊ लागते. शरीरातील चेतना व चैतन्य जाणवू लागते.

...त्यातूनच एक जटाधारी साधू अवतरतो...



‘‘या काळकोठडीतून बाहेर पडण्यासाठी रक्ताचा फक्त एक थेंब हवा होता. आम्ही खूप लोक आहोत. आमचे मेंदू सुप्तावस्थेतही एकमेकांशी जोडलेले आहेत. तुम्हाला हे तंत्र, हे ज्ञान आम्ही देऊ शकणार नाही... उलट, तुमचेच येथले अस्तित्व संपत आले आहे.’’

...डॉ. पंडित व डॉ. पावशे हे अचानक कसे गायब झाले याचे कोडे कोणालाच उलगडले नाही .

**प्रयोगशाळा, विद्यापीठातील वातावरण वगैरे वास्तव पार्श्वभूमीचा चपखल वापर करीत संशोधनातील बारकावे आणि संशोधकामधील परस्परसंबंध याचे वस्तुनिष्ठ चित्रण करतानाच अफलातून, अचाट पण तर्कसंगत कल्पना फुलवत कथावस्तूंची नाट्यपूर्ण उभारणी करण्यातील त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे.**

डॉ. संजय ढोले यांच्या वैज्ञानिक संकल्पनांमध्ये खूप विविधता आहे. नॅनो टेक्नॉलॉजीने विशिष्ट व्यक्तीच्या रोगाच्या पेशीमध्ये बदल करून जीवनदान देणे, कोळ्याने निर्माण केलेल्या जाळ्यातील चिवट धाग्यांचा वैद्यकीय वापर करणे, मृतदेह जपून ठेवून नॅनो तंत्रज्ञानाने ते जिवंत करणे, कर्करोगाच्या पेशींचा नाश करण्यासाठी न्यूट्रॉन्सचा प्रभावी वापर करणे, ब्रेनट्युमर दूर करण्यासाठी बोरॉन या मूलद्रव्याचा उपयोग, अतिसूक्ष्म स्फोटकांचा वापर करून अतिरेक्यांनी घडवून आणलेला भयंकर विध्वंस, मेंदूमध्ये इलेक्ट्रॉड बसवून त्या व्यक्तीच्या विचारांचे नियंत्रण करणे यासारख्या संकल्पना डॉ. ढोले यांनी वापरलेल्या आहेत.

त्या प्रत्येक संकल्पनेला उठाव मिळेल अशा व्यक्ती, घटना आणि वातावरणाच्या निर्मितीची दक्षता घेतली आहे.

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन प्रकल्पांमुळे त्यांच्या अभ्यासाला नेमक्या संदर्भांचे कोंदण लाभले आहे. त्यामुळे मराठी विज्ञानकथांमध्ये डॉ. ढोले यांच्या विज्ञानकथांना एक विशिष्ट विश्वासार्हता लाभलेली आहे. ‘हार्ड सायन्स फिक्शन’ या वर्गात मोडणाऱ्या अशा विज्ञानकथांचे लेखन डॉ. ढोले हे करीत आहेत. तर्कसंगत शास्त्रीय तथ्यांचा व सिद्धांतांच्या आधारे त्यांनी पर्यायी भविष्याचे स्वरूप स्पष्ट करीत मानवी मूल्यांचे भाव त्यातून अधोरेखित केले आहे.

प्रयोगशाळा, विद्यापीठातील वातावरण वगैरे वास्तव पार्श्वभूमीचा चपखल वापर करीत संशोधनातील बारकावे आणि संशोधकामधील परस्परसंबंध (त्यातील स्पर्धा, हेवेदावे, द्वेषमत्सर, श्रेय-नावलौकिकाची आकांक्षा) याचे वस्तुनिष्ठ चित्रण करतानाच अफलातून, अचाट पण तर्कसंगत कल्पना फुलवत कथावस्तूंची नाट्यपूर्ण

शेकडो विज्ञान कथा-कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले असून त्यांनी भरपूर कमाईही केली आहे. नवनव्या कल्पनांना उत्तम प्रकारे कथेच्या कोंदणात बसवण्याची कुशलता असेल तर त्या विज्ञानकथाकारांना खूप मोठा जागतिक वाचकवर्ग उपलब्ध आहे.

उभारणी करण्यातील त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे.

मराठीत विज्ञानकथांचे लेखन अजूनही फार मर्यादित आहे. विज्ञान कादंबऱ्या तर त्याहूनही दुर्मिळ आहेत. केवळ अनुवादावर वा रूपांतरावर अवलंबून राहणाऱ्यांना स्वतंत्र विज्ञानकादंबरीचे आव्हान स्वीकारा असे सांगणेही शक्य नसते. परंतु विज्ञानक्षेत्रात अध्ययन-अध्यापन करणाऱ्यांनी आपल्या अभ्यासात अद्ययावतपणा ठेवून लेखनाचा प्रयत्न करायला हवा.

डॉ. रॉबिन कूक, मायकेल क्रिश्टन, आर्थर सी क्लार्क, रे ब्रॅडबरी, केव्हिन अँडरसन, जेम्स सी. ख्रिश्चनसेन, स्टिफन डोनॉल्डसन, ॲन मॅकॅफ्रे, चायना मेलव्हिल, जेरी पौरनेल, सुझान साइझमोअर, आंगस वेल्स, रॉजर झेलांझी वगैरे लेखकांच्या विज्ञान कादंबऱ्यांना बरीच लोकप्रियता लाभली आहे. स्टार वॉर्स, वॉर ऑफ द वर्ल्डस, फाउंडेशन्स फियर, दिनो टोपियो, डेस्टिनीज रोड, दि डेथ ऑफ केऑस, दि ब्लॅक गॉड, एक्झाइल्स चॅलेंज, फॅटल टेरेन, लाइफ हाऊस, रेडलायनर्स, रोबो ब्ल्यूज, स्टार ट्रेक, ए स्टरिंग ऑफ डस्ट, ऑक्टोबर कंट्री, ए मॅन बिट्रेड, आइन्स्टाइन्स ब्रिज, डीपर सी वगैरे कादंबऱ्या क्लासिक्स गणल्या जातात. शेकडो विज्ञान कथा-कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले असून त्यांनी भरपूर कमाईही केली आहे. नवनव्या कल्पनांना उत्तम प्रकारे कथेच्या कोंदणात बसवण्याची कुशलता असेल तर त्या विज्ञानकथाकारांना खूप मोठा जागतिक वाचकवर्ग उपलब्ध आहे.

सध्या जे चित्रपट जागतिक पातळीवर बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरत आहेत ते विज्ञानकथांवरच आधारित आहेत. ज्युरासिक पार्क, टाइमलाइन, दि लॉस्ट वर्ल्ड, कोमा, ब्युटिफूल माइंड, स्टारट्रेक, स्टार वॉर्स, दि मॅट्रिक्स, मायनॉरिटी रिपोर्ट, क्रोमोझोम यांची उदाहरणे देता येतील.

म्हणूनच एकविसावे शतक हे विज्ञानकथांचे शतक ठरेल असे वाटते.

**पृष्ठे : २३९ ● किंमत : १८० रु. ● सभासदांना: १२६ रु. ● पोस्टेज: २५रु.**



**आगामी**

# तुक्याची आवली




मंजुश्री गोखले

किंमत : १५०रु.
पोस्टेज : २५रु.

आवलीला त्या घटनेचा पुरता अर्थ कळला. आणि ती विलक्षण चरकली. बुवांच्या टाळ-चिपळ्या बुवांशिवाय? आवलीनं टाहो फोडला. धनी ऽऽऽ! धनी ऽऽऽऽ! आणि ती बुवांच्या बैठकीवर कोसळली. त्या टाळ-चिपळ्या उराशी धरून तिनं आकांत मांडला. त्याच त्या टाळ-चिपळ्या ज्यांना बुवा आपले श्वास आणि उच्छ्वास म्हणत होते. त्याच टाळ-चिपळ्या आज बुवांपासून वेगळ्या एकट्या, पोरक्या, अनाथ होऊन बुवांच्या बैठकीवर पडल्या होत्या. अन् करपलेल्या काळजानं आणि चरकलेल्या मनानं त्याच टाळ-चिपळ्या उराशी धरून आवली आकांत करत होती. तिचा तो आकांत सगळ्या गावकऱ्यांचं काळीज चिरत गेला. आकाश फाडत गेला. विठ्ठल मंदिराच्या भिंती भेदत गेला. विठ्ठलाच्या मूर्तीचा थरकाप उडवत गेला. त्याच्या पायखालची वीट क्षणभर थरारली. इंद्रायणी क्षणभर वाहायचं विसरली. विठ्ठल मंदिराच्या कळसाला छेदत आवलीचा तो टाहो आकाश फाडत राहिला. नंतर कितीतरी वेळ त्याचे पडसाद आकाशातून येत राहिले. वाळवंटात कोसळत राहिले, विठ्ठलाच्या मंदिराच्या गाभाऱ्यावर आदळत राहिले.




## विज्ञानावर आधारित दोन रहस्यकथा

- - - - - - - - - - - - - -

# दृष्टिभ्रम

- - - - - - - - - - - - - -

**डॉ. बाळ फोंडके**

मराठीत अत्यंत जाणीवपूर्वक विज्ञानविषयक लेखन करणाऱ्या व्यासंगी व्यक्तींमध्ये डॉ. बाळ फोंडके यांचे नाव आदरपूर्वक घेतले जाते. विज्ञानाच्या संकल्पनांचा आणि विविध विज्ञानशाखांमधील प्रगतीचा ते गेली तीन-चार तपे साक्षेपी मागोवा घेत आहेत. 'सायन्स टुडे'सारख्या मासिकाचे संपादन (१९८३-८६), विज्ञानविषयक पुस्तकांच्या निर्मितीसाठी निघालेल्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कम्युनिकेशन'चे संचालकपद (१९८९-९९) भाभा अणु संशोधन केंद्रात जीववैद्यकीय क्षेत्रात संशोधन (१९६०-८३) अशा उच्चस्तरीय कारकीर्दीमुळे विज्ञानाच्या सर्वंकष विकासाचे त्यांना नेमके भान आहे. त्याचबरोबर जटिल वैज्ञानिक संकल्पना सोप्या सहजसुगम शैलीत मांडण्याची सिद्धीही त्यांना अवगत आहे. त्यामुळे त्यांच्या विज्ञानकथा वाचनीय ठरतात. 'अमानुष' (१९८५), 'युरेका' (१९८६), 'चिरंजीव' (१९८६) 'खिडकीलाही डोळे असतात' हे त्यांचे विज्ञानकथांचे संग्रह गाजलेले आहेत. 'उद्याचे वैद्यक' हे वैद्यकशास्त्रातील नवनवीन शोधांचे महत्त्व समजावून देणारे पुस्तकही महत्त्वपूर्ण आहे.

'दृष्टिभ्रम' या त्यांच्या पुस्तकात 'मायादर्पण' आणि 'नजरबंद' या दोन कादंबरिकांचा समावेश केला गेला आहे.

'दृष्टिभ्रम' हा प्रकार मानवी जीवनात आणि सृष्टीत अनेक प्रकारे प्रत्ययाला येतो. आपण इंद्रधनुष्य बघतो. तानापिहिनिपाजा या सात रंगांच्या कुंपणात अडकलेला एक छोटासा प्रकाशाचा तुकडा. त्याच्या दोन्ही बाजूंना प्रकाश असतोच. परंतु आपल्याला जांभळ्याच्या पलीकडचा जंबुपार प्रकाश दिसत नाही; तांबड्याच्या पलीकडचा अवरक्तही दिसत नाही. हा दृष्टिभ्रमच नाही का? क्ष किरणांना प्रतिसाद देणाऱ्या दुर्बिणीच्या मदतीने डोळ्यांना न दिसणाऱ्या 'अदृश्य' वस्तुमानाचे



दर्शन घडू शकते. 'व्हर्च्युअल रिॲलिटी' आभासी सृष्टी हे देखील दृष्टिभ्रमाचा प्रकार ठरते. मयसभेसारखी ती आपली फसगत करू शकते. दृष्टिभ्रमामुळे युद्धाच्या तंत्रातही आमूलाग्र क्रांती घडू शकेल. एखादे लढाऊ विमान शत्रूच्या रडारच्या पडद्यावर न दिसताही शत्रूप्रदेशात मुसंडी मारू शकेल...

'मायादर्पण' ह्या कादंबरिकेत आरंभीच इन्स्पेक्टर राजेश राणे याला कमिशनरांचा फोन येतो. सेंटर पॉइंटवाल्या जगन्नाथ बसू याचा खून झाल्याची बातमी देऊन ते त्याची चौकशी करण्याचा आदेश देतात आणि चौकशीची चक्रे फिरू लागतात.

सेंटर पॉइंटमध्ये राजेशला डॉ. साळुंखे मृताची तपासणी करून निघालेले दिसतात.

बॉडीची पार दुर्दशा झालेली असते. हा स्वाभाविक मृत्यू नव्हे, हा खूनच आहे अशी त्याची खात्री पटते.

कॉन्स्टेबल देशमुख सांगतो की ''मी रस्त्यावरून गस्त घालत चाललो होतो तेव्हा ठो ठो आवाज आला. मी पोहोचेपर्यंत प्राण गेलेला होता. पाठचा दरवाजा उघडा होता. मी फोननंबर फिरवला तो कमिशनर साहेबांचा निघाला.'' (ही घटना भविष्यकालीन असल्याने बॉडीचे पोस्टमार्टेम हा प्रकार नाही. डॉक्टरांचा रिपोर्ट हेच प्रमाण.) राजेश बुचकळ्यात पडतो.

कॉन्स्टेबल देशमुख पुढे सांगतो, ''बॉडीवर हृदयाच्या जागी डॉलरच्या नाण्याएवढं छिद्र होतं. गोळी आरपार गेली असणार.'' राजेशचे लक्ष हृदयाकडे जाते; पण तेथे त्याला छिद्र दिसत नाही. राजेशला आश्चर्य वाटते. डॉक्टरांनी तपासणीसाठी डोक्याचा छेद घेतला होता– त्याचेही राजेशला नवल वाटते. व्हिजिटफोनवरून डॉक्टरांशी राजेश संपर्क साधतो. ''लेझर गनने बसूला मारण्यात आलेले आहे. सगळा उजवा खांदा आतल्या हाडापर्यंत राख होऊन गेला आहे.'' असे डॉक्टर सांगतात.

राजेशच्या मनात गोंधळ उडतो. लेझर गन वापरली असेल तर ठो ठो आवाज कसा होईल? डॉक्टरांनी सांगितलेल्या खुणाही बॉडीवर दिसत नाहीत. डॉक्टर खोटं बोलताहेत का असा प्रश्न त्याला पडतो.

**राजेशच्या मनात गोंधळ उडतो. लेझर गन वापरली असेल तर ठो ठो आवाज कसा होईल? डॉक्टरांनी सांगितलेल्या खुणाही बॉडीवर दिसत नाहीत. डॉक्टर खोटं बोलताहेत का असा प्रश्न त्याला पडतो.**

“त्याचा खून स्फोट होऊन उडणाऱ्या पिस्तुलाची गोळी छातीत लागून झाला. तसाच तो लेझर गनने उजव्या खांद्याला भेदून झाला. त्याचे डोकेही उभे चिरले गेले होते आणि ते नंतर एनर्जी बीमने किंवा कुऱ्हाडीने किंवा तलवारीने धडावेगळे केले गेले आणि पुन्हा धडाला तसेच जोडण्यातही आले होते.”

राजेश बॉडी उचलणाऱ्या सफाई कामगाराशी संपर्क साधतो. तो सांगतो, “साहेब, मुंडकं धडापासून तोडून टाकलेलं होतं. मग माणूस जिवंत कसा राहणार? बॉडी फार जड झाली होती.”

“मुंडकं कशानं तोडलं असावं असं तुला वाटतं?”

“एनर्जी बीमवाल्या बंदुकीनं तोडल्यासारखं वाटलं. डॉक्टरनं ऑपरेशन केल्यासारखं... पण माझा जोडीदार म्हणाला– मुंडकं कुऱ्हाडीनं नाहीतर तलवारीनं तोडलेलं असावं.”

राजेश वैतागतो. सगळे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार. परंतु प्रत्येकाच्या म्हणण्यात कमालीची तफावत.

मृत्यूचे कारण काय हे त्याला उलगडत नाही. रिपोर्ट कसा लिहायचा हा प्रश्न त्याला पडतो.

राजेशला पत्नीचा, कल्याणीचा फोन येतो, “आज डिनरला नेणार होतास ना मला?”

जगन्नाथ बसूच्या केसमध्ये अडकल्याचे राजेश सांगतो तेव्हा पत्नी म्हणते, “जगन्याचा खून? तो माझ्या वडिलांचा मित्र होता. आमच्या घरी नेहमी यायचा... भलताच बोअर करायचा... स्क्रू ढिला असल्यासारखं बोलायचा. त्याचा खून झाला हे नवलच! कसा झाला खून?”

राजेश सगळा तपशील सांगतो...

“त्याचा खून स्फोट होऊन उडणाऱ्या पिस्तुलाची गोळी छातीत लागून झाला. तसाच तो लेझर गनने उजव्या खांद्याला भेदून झाला. त्याचे डोकेही उभे चिरले गेले होते आणि ते नंतर एनर्जी बीमने किंवा कुऱ्हाडीने किंवा तलवारीने धडावेगळे केले गेले आणि पुन्हा धडाला तसेच जोडण्यातही आले होते.”

ती राजेशला म्हणते, “सकाळपासून तुला कोणी भेटला नाही का फिरकी ताणायला?”

...राजेश घरी येतो. झोपी जातो.

झोपेत त्याला स्वप्न पडते... “मारून टाका...” “ते उपरे आहेत. परकीय आहेत. त्यांना ठार मारायला हवे...” यासारखी वाक्ये त्याला ऐकू येतात. सभोवती कुजबूज. खुसरपुसूर.



राजेशला जाग येते. युनिफॉर्म चढवायला तो जातो. तर तो अस्ताव्यस्त पडलेला. रात्री आपण तो हँगरला अडकवून ठेवला होता ना! मग तो जमिनीवर कसा आला? तो गोंधळतो.

ऑफिसमध्ये येऊन तो बसूच्या मृत्यूचा रिपोर्ट पाठवतो. मृत्यूचे कारण– “लेझर गनने उजवा खांदा जळून शॉकमुळे मृत्यू” असे लिहितो.

जगन्नाथ बसूच्या मित्रांना तपासासाठी राजेश भेटतो.

जगन्नाथचा जानी दोस्त– मधुकर उकिडवे सांगतो, “जगन्नाथ लहानमोठ्या चिजा कौशल्याने बनवायचा. लेथ मशीनवर छोटे पार्टस करायचा. विक्षिप्त होता. एकलकोंडा होता.”

राजेशला ऑफिसमध्ये गेल्यावर डॉक्टर साळुंके सांगतात, “दोघांच्या फिंगर प्रिंट सारख्याच आहेत. आश्चर्य म्हणजे आणखी एका व्यक्तीच्या फिंगर प्रिंट त्या दोघांशी जुळताहेत.”

मधुकर राजेशला एक विचित्र चंद्रकोरीसारखा गॉगल दाखवतो. किरणोत्सर्गी खाणीमध्ये काम करणाऱ्यांसाठी तो बनवलेला असतो. जाता जाता तो आणखी सांगतो, “जगन्याचा एक साइड बिझनेस होता. अश्लील पुस्तके विकण्याचा.”

त्याचवेळी ऑफिसमधून राजेशला फोन येतो. “सर, वाईट बातमी आहे. आणखी एकजण मेलाय. एकाने खिडकीतून उडी मारली. जमिनीवर पडला तेव्हा मेलेला आढळला.”

डॉक्टर साळुंके त्या मुडद्याची तपासणी करतात. “अंगावर कुठलीही खूण नाही. विषप्रयोग नाही. हाड मोडलेले नाही. कातडीवर काळानिळा चट्टा नाही.”

“या माणसाचे नाव काय?” राजेश विचारतो.

“जगन्नाथ बसू.” डॉ. साळुंके म्हणतात तेव्हा राजेश चक्रावतो.

“दोघांपैकी खरा जगन्नाथ कोण?” राजेशचा प्रश्न.

“ते शोधून काढणे हे तुझे काम आहे. मृत्यू कसा झाला हे सांगणे माझे काम. पण या मृत्यूबद्दलही मी नेमके ते कारण सांगू शकत नाही.” डॉ. साळुंके म्हणतात.

“जगन्नाथला जुळा भाऊ होता का? क्लोनिंगचा हा प्रकार असावा का?”

“जेनेटिक फिंगर प्रिंटवरून ते शोधावे लागेल.”

राजेशला ऑफिसमध्ये गेल्यावर डॉक्टर साळुंके सांगतात, “दोघांच्या फिंगर प्रिंट सारख्याच आहेत. आश्चर्य म्हणजे आणखी एका व्यक्तीच्या फिंगर प्रिंट त्या दोघांशी जुळताहेत.”

**राजधानीतून एक व्यक्ती खास यानाने त्या शहरी येऊन दाखल होते. ती इन्स्पेक्टर राजेशला भेटते आणि म्हणते, ''तुम्हाला छळणाऱ्या एका केसची खास चौकशी करण्यासाठी मला डायरेक्टर जनरलनी पाठवले आहे. माझे नाव जगन्नाथ बसू.''**

राजेश कमिशनरना भेटून हा सर्व गुंता स्पष्ट करतो.

एक मृतदेह जाळून टाकल्यावर दुसऱ्या मृतदेहाच्या फिंगरप्रिंट त्याच्यासारख्याच कशा हा प्रश्न त्यांनाही थक्क करतो.

जगन्नाथचे शिक्षक प्रा. रावते यांना राजेश भेटतो. ते कल्याणीचे वडील. त्याचे सासरे. ते सांगतात, ''जगन्नाथ मलाही पुस्तके वाचायला देत असे. नारिंगी व लाल अशा दोन याद्या त्याजकडे होत्या. माइंड कंट्रोल– न्यूरो कंट्रोल व्हर्लिंग मिरर्स, मोहिनीचक्र, संमोहन वगैरेची माहिती देणारी पुस्तके लाल यादीत असतील तर!... जगन्नाथचा खून आणि त्यानंतरचे तुमचे अनुभव हे मेस्मेरव्हीलचे प्रताप असू शकतील...''

त्याचवेळी शहरात अनेकजण चौकाचौकात 'उपऱ्यांना मारा, परक्यांना ठार करा' अशी भाषणे देताना दिसतात आणि हे काम करण्यासाठी त्यांना राजेशनेच नेमले आहे, असेही ते वक्ते सांगतात.

तशात राजधानीतून एक व्यक्ती खास यानाने त्या शहरी येऊन दाखल होते. ती इन्स्पेक्टर राजेशला भेटते आणि म्हणते, ''तुम्हाला छळणाऱ्या एका केसची खास चौकशी करण्यासाठी मला डायरेक्टर जनरलनी पाठवले आहे. माझे नाव जगन्नाथ बसू.''

...आता हा तिढा कसा सुटतो हे 'मायादर्पण' या कथेतच वाचायलाच हवे, नाही का?

'नजरबंद' ही या कादंबरिकेचा निवेदक लेखकच आहे. नाव मनोज मस्तकार. त्याच्या कादंबऱ्यांच्या वीस-पंचवीस हजार प्रती हातोहात खपतात. त्याच्या रहस्यकथाही वाचकांना आवडतात. रहस्यकथांमध्ये शेखर दिवाण हा वैज्ञानिक खासगी गुप्तहेर म्हणून रंगवलेला असतो. विज्ञान आणि रहस्य या दोहोंचा थरार वाचकांना अनुभवता येतो. समीक्षकांच्या मान्यतेची पर्वा त्याला नसते.

त्याला एकदा साहित्य परिषदेचे आमंत्रण येते आणि पुढे सगळे रामायण घडते.

व्याख्यानानंतर त्याची पराडकरांशी ओळख करून देण्यात येते. तेही मान्यवर रहस्यकथा लेखक.



पराडकर मनोजला सरळ फैलावर घेतात.

''खासगी डिटेक्टिव्ह. सायन्स फिक्शन असले शब्द वापरून तू गणंगांना इम्प्रेस कर. पण असलं चटोर लेखन करून मराठी वाचकांचं नुकसान करू नकोस... परत लेखणी हातात घेण्याआधी हात कलम करून टाक... संगणकाच्या की-बोर्डवर बोटं शिवशिवू लागली तर त्यांच्यावर सुरी फिरव. लिहिलेलं चुलीत जाळून टाक.''

**''खासगी डिटेक्टिव्ह. सायन्स फिक्शन असले शब्द वापरून तू गणंगांना इम्प्रेस कर. पण असलं चटोर लेखन करून मराठी वाचकांचं नुकसान करू नकोस... परत लेखणी हातात घेण्याआधी हात कलम करून टाक...''**

पराडकरांच्या तावडीतून मनोज कशीबशी सुटका करून घेतो. त्यावेळी मिताली ही त्याची एक वाचक त्याच्या मदतीला येते.

पराडकरांची व मनोजची पुन्हा एका पार्टीत भेट होते. पुन्हा खटका उडतो. मिताली त्याला म्हणते, ''ही हेटस् युवर गटस. नफरत वाटतेय त्यांना तुझ्याबद्दल.''

पार्टी सोडताना मनोज पराडकरांना म्हणतो, ''तुम्ही बोअर आहात. तुमच्या कथांमुळे वाचक बोअर होतात. तुमचे ते बंद खोलीतले खून नाटकी वाटतात. तुम्ही सायंटिफिक लिहायला लागा.'' तेव्हा मिताली परत मनोजला ओढून पराडकरांपासून दूर नेते.

पराडकर मनोजच्या प्रकाशकाकडे, प्रकाशनाकडे जातात. ''तुम्ही एकतर माझी पुस्तके काढा नाहीतर मनोजची.''

राजमुद्राचे प्रकाशक म्हणाले, ''अहो, पण मनोजची पुस्तके प्रचंड खपतात. तुमच्या पुस्तकाच्या पन्नास प्रतीही खपत नाहीत.''

पराडकर तणतणत बाहेर पडतात. ''पुन्हा तुमच्या ऑफिसची पायरी चढणार नाही.''

मनोज पुढचे पुस्तक लिहायला घेतो. मरणमिठी.

–आणि एके दिवशी पराडकर त्याला भेटायला त्याच्या घरी येतात.

ते आपल्या खिशातून मिड-डेचा अंक काढून मनोजला त्यातील एक बातमी दाखवतात. ''प्रकाशकाचा मदतनीस बंदिस्त खोलीत मृतावस्थेत सापडला.''

''तुला बंद खोलीतले माझ्या कादंबरीतले खून नाटकी वाटतात ना– वाच हे.'' पराडकर मनोजला डिवचतात. मनोज म्हणतो, ''ऑल राइट. तुम्ही तुमचं म्हणणं सिद्ध केलं... पण त्या बिचाऱ्या मृत निनादबद्दल मला वाईट वाटतं...

**पराडकर मनोजकडे येऊन आकांडतांडव करतात. ''तू पोलिसांना माझ्याविरुद्ध पेटवतो आहेस. मी तुला वॉर्निंग देतो. सांभाळून राहा. बी केअरफुल.'' काही दिवस जातात. ...आणि एसीपी पवारांचा मनोजला फोन येतो, ''पराडकरांचा खून झालाय.''**

बिचाऱ्याला उगाच मरण आलं. खून इम्पॉसिबल नाही हे मी मान्य करतो. पण तो कसा झाला असेल– माझं डोकंच चालत नाही.''

''ते माझ्या पुढच्या कादंबरीत वाचायला मिळेल. एका प्रकाशकाचा मृत्यू असे तिचे नाव आहे... रंगतरंग प्रकाशनाशी त्याबद्दल करार केलाय.''

राजमुद्राचा संपादक निनाद याच्या रहस्यमय खुनाचा तपास पूर्ण होण्याआधीच त्याची मैत्रीण चित्रा मुरबाड हिच्या खुनाची घटना घडते... ती एक नटी असते. तिचा खून शेकडो प्रेक्षकांसमोर रंगमंचावर होतो. प्रेक्षक समोर असताना तिच्या पाठीत सुरा कसा खुपसला गेला हे कोणालाच कळत नाही.

मनोज एसीपी पवारांना भेटतो. पराडकरांबद्दल माहिती देतो.

''पराडकरांवर खुनाचा आरोप करायचाय का तुम्हाला?''

''नाही... पण त्यांच्या कादंबऱ्यांत असेच खून दाखवलेले असतात...''

एसीपी पवार पराडकरांना चौकशीसाठी बोलवतात.

पराडकर मनोजकडे येऊन आकांडतांडव करतात. ''तू पोलिसांना माझ्याविरुद्ध पेटवतो आहेस. मी तुला वॉर्निंग देतो. सांभाळून राहा. बी केअरफुल.'' काही दिवस जातात.

...आणि एसीपी पवारांचा मनोजला फोन येतो, ''पराडकरांचा खून झालाय. बंद खोलीत. तुम्ही येऊन प्रत्यक्षच बघा. मी पराडकरांच्या घरातूनच बोलतोय.''

एकाच पद्धतीने झालेला हा तिसरा खून.

''रहस्यकथा लेखक पराडकरांच्या खुन्याला शोधून काढणार'' अशी बातमी वृत्तपत्रात येते. ती मनोजनेच दिलेली असते.

हा 'मरणमिठी' कादंबरीच्या पब्लिसिटीचा स्टंट आहे असे काहीजणांना वाटते.

...आता मनोज ह्या खुन्याचा शोध कसा लावतो हे जाणून घेण्याची उत्सुकता तुम्हा वाचकांना वाटणारच...

पण त्यासाठी 'दृष्टिभ्रम' हे पुस्तक घ्यायला हवेच. नाही का?

**पृष्ठे:१६४ ● किंमत:१३० रु. ● सभासदांना: ९१रु. ● पोस्टेज:२५ रु.**



# नॉर्मन मेलर : अमेरिकेतील एक भन्नाट साहित्यकार



अमेरिकन लेखक-कादंबरीकार नॉर्मन मेलर याचे ११ नोव्हेंबरला वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. एक भन्नाट लेखक आणि त्याचे भन्नाट जीवन संपुष्टात आले. युद्धाच्या पार्श्वभूमीवरील 'दी नेकेड अँड द डेड' या कादंबरीने मला महाविद्यालयात असताना झपाटून टाकले होते. त्यावेळेपासून त्याचे नाव व साहित्य याबद्दल कुतूहल व आकर्षण होते.

'मला अमेरिकन जीवनाचे सर्वंकष दर्शन घडवायचे आहे, अमेरिकेतील राजकारण, अमेरिकेतील मुष्टियुद्धांचे सामने, हॉलीवुडमधील चित्रपटनिर्मीती, अंतरिक्षवीर, कलाक्षेत्र, नाटक-चित्रपट कलावंतांची भन्नाट जीवने (त्यांचे कामजीवन, त्यांच्या महत्वाकांक्षा, त्यांची सत्ताभिलाषा, त्यांचे अवगुण आाणि अतिरेक), अमेरिकेतील उद्योगविश्व आणि गुन्हेगारी, अंडरवर्ल्ड आणि गोंधळ, अमेरिकेतील विकृती आणि व्याभिचार--सर्वांबद्दल मला लिहायचे आहे. अमेरिकन स्वप्नाबद्दल मला लिहायचे आहे. ग्रेट अमेरिकन नॉव्हेल, बिग बुक लिहायचे आहे असे म्हणणारा, तसा ध्यास घेणारा आणि सुमारे साठ वर्षे सातत्याने लेखन करणारा लेखक नॉर्मन मेलर हा ११ नोव्हेंबरला, वयाच्या ८४व्या वर्षी निधन पावला. त्याच्या कल्पना भन्नाट होत्या तसेच त्याचे जीवनही वादळी होते. त्याला डोस्टोवस्की आणि मार्क्स, फ्राईड आणि जेम्स जॉईस, स्टेंधाल आणि टालस्टॉय, प्राउस्ट आणि स्पेंगलर, फॉकनर आणि हेमिंग्वे- या सर्वांना पारायणे करावीशी वाटतील अशी बृहत्कादंबरी लिहायची होती आणि अमेरिकेच्या जीवनव्यवहाराचे स्वरुप आमुलाग्र पालटून टाकायचे होते. एकोणिसशे पन्नास ते सत्तर या काळातल्या अमेरिकेतील सामाजिक वातावरणाचा प्रभाव त्याच्यावर होता. त्यावेळचे राजकारण, व्हिएतनाममधील अमेरिकेचा हस्तक्षेप, बीटनिक्स आणि हिप्पी तरुणपिढीची उद्विग्नता आणि हे

जगच उलथेपालथे करुन टाकायला हवे, हिंसाचार, सत्ताकारण, स्त्रीपुरुष संबंध, अत्याचार, आत्महत्त्या, स्वैराचार, अश्लीलता आणि व्याभिचार या सर्वांचा बंदोबस्त करायला हवा- आणि तो करण्याचे तंत्रमंत्र आपल्याकडे आहे असा त्याचा दावा होता...त्याच्या कादंबऱ्यातील पात्रेच त्याच्या कल्पना प्रकट करीत राहत. ती पात्रे म्हणजे नॉर्मन मेलरचेच प्रवक्ते असत. मेलरच्याच आवडत्या सिद्धांतांचा गजर त्याची मानस-पात्रे करत असत. 'ॲन अमेरिकन ड्रिम' या त्याच्या कादंबरीचा नायक स्टिफन रोजाक हा त्याच्या आदर्श हीरोच्या जवळ जाणारा आहे. तो सद्यकालीन कोंडीतून मार्ग काढण्यासाठी हिंसेकडे मुक्तीचा मार्ग म्हणून बघतो. तो तत्वज्ञाची भाषा बोलणारा आणि मोठेमोठे युक्तीवाद करणारा आहे. लोक त्याला मनोरुग्ण मानत असले तरी आपले चमत्कृतिपूर्ण तर्कशास्त्र तो सिद्धहस्त सफाईने मांडत असतो.

नॉर्मन मेलर हा या नायकासारखाच आक्रस्ताळा, अतिसंवेदनशील, आत्यंतिक विचारांचा होता.

आपल्या स्वत:वरच तो खूष होता. नार्सिससारखा. आपण सर्वज्ञ आहोत, इतरांना काही कळत नाही असा त्याचा आविर्भाव असायचा.

आपल्यावर टीका करणाऱ्यांची तो टवाळी करायचा. हुर्रेवडी उडवायचा. कधी कधी तर धक्काबुक्की ही करायचा; बंदुकीचा नेमही धरायचा. अशावेळी लोक काय म्हणतील याची त्याला पर्वा नसायची.

त्याने एकदा आपल्या बायकोवर एका हॉटेलात पार्टीच्या वेळी सुरी हल्ला केला होता. ती सुरी रामपुरी वगैरे नव्हती टेबलावरच्या डिशवरची होती.

न्यूयॉर्कच्या महापौरपदाची निवडणूकही लढवली होती. ती तो हरला यात नवल नाही. पण ज्या ज्यावेळी जे जे उत्कटतेने वाटे ते तो करी.

दुसऱ्या महायुद्धात तो एक सैनिक म्हणून लढला. आपल्या सहकाऱ्यांना धारातीर्थी पडताना त्याने बघितले. हे सैनिक सर्वच काही शूर होते आणि जीवावर उदार होऊन लढत होते असे नव्हे. ते सामान्य स्तरावरचे तरूण होते. जीवाला जपत होते... पण परिस्थिती पण परिस्थितीच अशी की त्यांना लढण्यासाठी वा शत्रूवर नेम धरण्यासाठी धीर एकवटावे लागत होते. मग समोरचा शत्रूसैनिक तरी मरे किंवा शत्रूची गोळी लागून स्वत:चाच प्राण गमावले तरी भाग पडे. युद्ध संपून घरी आल्यावर नॉर्मन मेलरने या युद्धाचेच चित्रण करणारी कादंबरी लिहिली. 'दि नेकेड अँड दि डेड' ही त्यांची कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर लगेच बेस्टसेलर ठरली. नॉर्मन मेलरने वय त्यावेळी फक्त २५ वर्षे होते. पंचविशीतच त्याला नावलौकिक मिळाला. अमेरिकेच्या प्रमुख शहरात त्याला आपल्या कादंबरीच्या प्रसिद्धीसाठी फिरण्याची संधी मिळाली. आपले तडकभडक विचार ऐकताना लोकांचे डोळे विस्फारतात हे बघून त्याचा आत्मविश्वास दुणावला. प्रक्षोभक भाषेत प्रतिक्रिया व्यक्त केली तर ती पत्रकारांना प्रिय वाटते. हे लक्षात आले. तीच शैली मग



त्याने स्वीकारली. त्याच्या भन्नाट कल्पनांना त्याने भन्नाट जीवनाची जोड दिली. स्वत:कडे एखाद्या पुराणकथेतील नायकाच्या रूपातच तो बघू लागला. आपल्या आयुष्यातील लहानमोठ्या प्रसंगाचीही रोमांचकारक शैलीत तो पेशकश करु लागला. लोकांना, श्रोत्यांना, पत्रकारांना धक्कादायक वाटेल अशा प्रकारची विधाने करण्याची सवयच त्याच्या अंगवळणी पडली.

पहिल्याच कादंबरीच्या यशाने नॉर्मन मेलरला स्वत:चे वेगळे व्यक्तीमत्व गवसले. तो अधिकाधिक आत्मकेंद्रित झाला. 'दि नेकेड अँड द डेड' मध्ये तो रणांगणावर जे जे चालले आहे त्याचा एक साक्षीदार होता. निरीक्षक होता. आता तो इतरांकडे स्वतःच्या विशिष्ट लोलकातूंन बघू लागला. केवळ निरीक्षकाची, साक्षीदाराची तटस्थ वृत्ती आता उरली नाही. आता समोरची व्यक्ती त्याला जशी आहे तशी न्याहाळता येईना; स्वीकारता येईना. त्या व्यक्तीला तो स्वत:च्या कल्पनांच्या, आदर्शाच्या लोलकातून बघू लागला. लोक आपल्याकडे कसे बघतात याकडे तो अधिक लक्ष देवू लागला. त्यानेच म्हटले आहे, ''मला आता मार्लन ब्रँडो ह्या नटाकडे बघण्यात रस उरला नाही; त्याला माझ्यात किती रस आहे हे अधिक महत्वाचे वाटू लागले आहे. तरुण वयात लाभलेल्या यशाने, प्रसिद्धीने, सेलिब्रेटी स्टेटसने स्वत:कडे केंद्रीभूत म्हणून पाहण्याची वृत्ती दृढावली. त्यामुळे टॉलस्टॉयसारखी बृहत्कादंबरी लिहीण्याची कल्पना मागे पडली आणि आपल्या आत्यंतिक, एकांगी, चमत्कृतीपूर्ण क्वचित विकृत अशा कल्पनांच्या मायाजालात वाचकांना हिंडवून आणण्याची उर्मी प्रबळ झाली.''

यापुढच्या काळात 'फिक्शन' ऐवजी 'नॉन फिक्शन' लिहीण्याकडे त्याचा कल राहिला.

१९६७ मध्ये व्हिएटनाम युद्धाच्या विरोधात एक प्रचंड मोर्चा वॉशिंग्टनमध्ये पेंटॅगॉनवर काढण्यात आला. नार्मन मेलर त्यात सामील झाला. त्या मोर्चाचे साग्रसंगीत वर्णन करणारे 'दि आर्मीज् ऑफ द नाईट' हे पुस्तक त्यानी लिहून काढले. एका नवीन प्रकारच्या वृत्तपत्रीय लेखनाचा त्यातून पाया घातला गेला. चटपटीत रंजक रिपोर्टाज, कादंबरीप्रमाणे छोट्या छोट्या घटनांची व्यक्ती-प्रसंग-चित्रणासह उभी केलेली मालिका.....वाचकांना चटकदार वाटणे स्वाभाविकच होते. त्यामुळे 'दि आर्मीज् ऑफ द नाईट'चेही उत्तम स्वागत झाले.

१९७९ मध्ये नॉर्मन मेलरने गॅरी गिलमोर या व्यक्तीच्या चमत्कृतिपूर्ण जीवनाची कहाणी 'दि प्रॅक्झिक्शुनर्स साँग' या नावाने प्रसिद्ध केली. गुन्हेगारी प्रवृत्तीचा हा नायक, त्याची प्रेमप्रकरणे, त्याचा हिंसाचार आणि त्याचा मृत्यू-गॉडफादर'सारख्या थराराकतेची आठवण देतो. अशा भन्नाट, विलक्षण, चढउतारांनी भरलेल्या अफलातून आयुष्याचे आकर्षण नार्मन मेलरला वाटत राहिले.

१९७७ मध्ये उटाहच्या कारागृहात खुनाच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगणाऱ्या ॲबट या कैद्याने नार्मन मेलरला पत्रं पाठण्यास आरंभ केला. त्या पत्रातून तो

आपल्या गुन्याची हकीकत कळवत असे. ती पत्रे वाचून नार्मन मेलरला ती प्रसिद्ध करावीशी वाटली. त्याने त्याचे पुस्तकरुपात प्रकाशन करण्यासाठी मदत केली. ॲबटला पॅरोलवर सोडण्यासाठी तुरुंगाधिकाऱ्यांची मनधरणी केली. जून १९८१ मध्ये ॲबटने एका हॉटेलातल्या वेटरला भोसकून ठार मारले. या घटनेने नार्मन मेलरवर टीकेचा भडीमार झाला. अमेरिकेतील डाव्या विचारसरणीच्या काही लेखककवींनी ॲबटला डोक्यावर चढवले होते. ते सारे अडचणीत आले.

नॉर्मन मेलरने १९८०मध्ये वयाच्या ५६व्या वर्षी मिस चर्च हिच्याशी विवाह केला.  मिस चर्च ही पूर्वाश्रमीची मॉडेल. त्यामुळे वृत्तपत्रात व टीव्हीवर खूप वादळ उठले. परंतु या विवाहानंतर या विवाहानंतर नॉर्मन मेलरचे आयुष्य थोडे स्थिरावले. रुळावर आले. त्याचा आक्रस्ताळेपणा थोडा कमी झाला. तो शांत झाला. १९८४मध्ये पीईएन अमेरिकन सेंटरचा अध्यक्ष म्हणून निवडून आला. 'दि रायटर्स इमॅजिनेशन अँड द इमॅजिनेशन ऑफ द स्टेट' या विषयावर त्याने एक चर्चासत्र घेतले. काही उजव्या विचारसरणीच्या विचारवंतांना त्याने आमंत्रण दिले. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉर्ज शुल्ट्झ यांनाही पाचारण केले. त्यामुळे डावे लोक नाराज झाले. परंतु नॉर्मन मेलरने त्यांची फारशी दखल घेतली नाही.

१९९१ मध्ये हरलॉट्स घोस्ट ही तेराशे पृष्ठांची कादंबरी त्याने प्रसिद्ध केली. ती सीआयए या अमेरिकन गुप्तहेर यंत्रणेवर आधारलेली आहे. हिटलरच्या जीवनावरच्या 'दि कॅसल इन द फॉरेस्ट'(२००७) या कादंबरीचा निवेदक सैतान दाखवणे हा ए कलात्मक अनुभव होता असे त्याने म्हटले आहे. पिकासोचे चरित्र(१९९५), दि गॉस्पेल ॲकॉर्डिंग टू द सन(येशू ख्रिस्ताची आत्मकथनात्मक कादंबरी,१९९७) या पुस्तकांनी नॉमेन मेलरचे वेगळेच व्यक्तीमत्व पुढे येते.

कादंबरी हा वाङ्मय प्रकार आता कालबाह्य होत चालला आहे असे नार्मन मेलरला वाटते. ''कादंबरीकार म्हणून आपण जीवन व्यतीत करणे हे या तंत्रज्ञानाच्या युगात कितपत रास्त आहे, न्याय्य आहे असा प्रश्न मला पडतो. आता वय वाढल्यामुळे त्याबद्दल मला चिंता वाटत नाही; परंतु मी तिशीत, चाळिशीत, पन्नाशीत होतो तेव्हा या विचाराने मी खूप त्रस्त असे. आपला लौकिक आपल्या लेखनावर अवलंबून आहे. हे लेखन त्या लौकिकाला पात्र आहे का असा प्रश्न पिच्छा असे. आपल्या प्रतिभेचा आणि आपल्या लौकिकाचा संबंध आहे की असाही विचार मनात येत असे. शेवटी काळ हे सर्व ठरवत असतो-हे आता मला जाणवते आहे.'' अशा प्रकारचे प्रकट चिंतन अंतिम पर्वात नॉर्मन मेलरचे चालू असे.

'कॉन्व्हरसेशन्स वुईथ नॉर्मन मेलर' हे चारशे पृष्ठांचे पुस्तक मायकेल लेनॉन याने प्रसिद्ध केले आहे. बॅरी लीडस याने 'दि एन्ड्यूअरिंग व्हिजन ऑफ नॉर्मन मेलर' हे पुस्तक लिहिले आहे. 'व्हाय आर वुई ॲट वॉर?' हे पुस्तक अमेरिकेच्या युद्धाच्या खुमखुमीचा समाचार घेणारे आहे. 'व्हाय आर वुई इन व्हिएतनाम?' या पुस्तकाने



एकेकाळी अमेरिकेतील तरूण वर्गाला अस्वस्थ करून सोडले होते.' दि नेकेड अँड दि डेड' मध्ये दुसऱ्या महायुद्धातील भीषण भयंकर अनुभवांचे चित्रण करण्याऱ्या मेलरला युद्धाचे निरर्थकत्व कायम जाणवत राहिले.

नॉर्मन मेलर हा अमेरिकन साहित्यकारांमध्ये 'प्रिन्स' म्हणून गौरवण्यात येत असे. भव्य-अमेरिकन स्वप्न, अमेरिकन जीवनासक्ती रंगवण्याची आकांक्षा बाळगून अमेरिकेतील विविध स्तरांवरील अनुभव कवेत घेण्याची त्याची हौस आणि जिद्द ही पुढच्या पिढ्यांनाही प्रेरणा देत राहील.

**-शंकर सारडा**

www.mehtapublishinghouse.com

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली**
**संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आत्तापर्यंत १,५०,००० वाचकांनी साईटला भेट दिली आहे!**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हॉंगकॉंग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्ट्ये**


- **लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार, पुस्तकाच्या नावानुसार इंग्रजी स्पेलिंगद्वारा 'सर्च'करण्याची सुलभ सुविधा.**
- **पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय**
- **प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परिक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती**
- **नवीन पुस्तकांची माहिती इमेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा**
- **आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती**
- **क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा**

www.mehtapublishinghouse.com

आजच भेट द्या.
व आपली मागणी नोंदवा.

## चार शब्द द्यावे - घ्यावे

**(संभाषणचातुर्यावर उपयुक्त माहिती)**



**संजीव परळीकर**

आपल्या अंगातली हुशारी दाखवायची असेल, तर संभाषण हे करावचं लागतं. चार शब्द देताना आणि घेताना थोडीशी काळजी घ्यायची. ती आपल्याला कशा प्रकारे घ्यायची याबद्दल उपयुक्त माहिती देणारे हे मार्गदर्शक पुस्तक.

**किंमत ७०रु.**
**पोस्टेज २० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## प्रिय वाचकमित्रहो........


आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
दर रविवारी नियमित सुरु राहील.
वेळ - सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**



## द काईट रनर

**बेस्टसेलर**



**मूळ लेखक**
**खालिद हुसैनी**

**अनुवाद**
**वैजयंती पेंडसे**

**किंमत : २७० रु.**
**पोस्टेज : ३० रु.**

आपल्या वडिलांच्या नजरेत भरण्याजोगं, त्यांचं कौतुक मिळवण्याजोगं काहीतरी करण्यासाठी आसुसलेला बारा वर्षांचा आमिर, पतंगांची स्थानिक दंगल जिंकण्याचा निर्धार करतो. त्याचा इमानी दोस्त हसन त्याला मदत करण्याचं वचन देतो. कारण हसन नेहमीच आमिरला मदत करत आलेला असतो. पतंगांच्या त्या दंगलीच्या दिवशी संध्याकाळी घडलेल्या, एका घटनेमुळे दोघांचं भावविश्‍व उध्वस्त होऊन जातं...

१९७०च्या दशकात रशियन फौजांनी अफगाणिस्तानवर कब्जा केल्यानंतर आमिरच्या कुटुंबाला अमेरिकेत गेल्यानंतरही मनात एक जाणीव सतत जागृत होती ती म्हणजे एक ना एक दिवस, कधीतरी त्याला जरूर परतून यावं लागणार आहे. नव्या जगातलं त्याचं समृद्ध आयुष्यही त्याला कधीच देऊ न शकणाऱ्या एका गोष्टीसाठी - ती म्हणजे प्रायश्चित्त!

त्याच्या हातून घडलेल्या अक्षम्य गुन्ह्याचं प्रायश्चित्त!




**तर्कशक्तीला आजही ताण देणाऱ्या घटनांची रेलचेल**

---

## महाभारतातील पितृवंदना

---

**दिनकर जोशी**
अनु. सुषमा शाळिग्राम

'महाभारतातील पितृवंदना' या पुस्तकात महाभारतातील प्रमुख पुरुष पात्रांच्या जीवनकहाण्यांचा मागोवा घेण्यात आला आहे.

पितामह भीष्म, आचार्य द्रोण, राजा धृतराष्ट्र, महामना विदुर, धर्मराज युधिष्ठिर, दुरात्मा दुर्योधन, मृत्युंजय कर्ण, सव्यसाची अर्जुन, अश्वत्थामा, पांचालराज द्रुपद आणि महाभारताचा नायक म्हणता येईल असा पूर्णपुरुष श्रीकृष्ण या सर्वच व्यक्तिरेखांची जीवने विविध घटनांनी आणि संघर्षांनी भरलेली आहेत. विशिष्ट जीवनमूल्ये आणि प्रसंगोत्पात नीतिमूल्यांबाबत घेतलेल्या वैचित्र्यपूर्ण भूमिका यामुळे या व्यक्ती गेली दोन-तीन हजार वर्षे भारतीयांना वीरपुरुषांचे आणि पुरुषार्थाचे सकारात्मक किंवा अनर्थकारक आदर्श वाटत आल्या आहेत. कौरव आणि पांडव यांच्यातील भाऊबंदकीला लाभलेले युद्धाचे स्वरूप या दोहोंच्या वंशसंहाराला कारण ठरते. 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' असे म्हणतात. महाभारतात जे व्यक्तींचे आणि नीतिमूल्यांच्या कसोटीचे प्रसंग आले आहेत, त्यांचीच पुनरावृत्ती मानवी जीवनात पुन: पुन्हा होत असते, तेच चिरंतन संघर्ष आजही आपल्याला भेडसावत असतात असेही म्हणता येते.

महाभारतातील या व्यक्तिरेखांबद्दल अनेक लेखककवींनी आजवर आपापल्या परीने लेखन करून त्यांच्या वर्तनातील संगती-विसंगती, गुण-दोष यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

गुजराती लेखक दिनकर जोषी यांनी महाभारतातील स्त्रियांवर 'महाभारतातील मातृवंदना' आणि पुरुष व्यक्तींवर 'महाभारतातील पितृवंदना' ही दोन पुस्तके लिहिली आहेत. या दोहोंचे मराठी अनुवाद सुषमा शाळिग्राम यांनी मूळ गुजराती



शैलीच्या काही लकबी कायम ठेवून केलेले आहेत.

**महाभारतात जीवनाचे जसे व्यापक व सर्वांगीण दर्शन घडते, तसे ते इलियड व ओडिसी या महाकाव्यातही घडत नाही. मानवनिर्मित असूनही ह्या ग्रंथाचे दैवी रचनांप्रमाणे नित्यनूतन रूप जाणवते.**

दिनकर जोशी यांना दूरदर्शनवर सादर करण्यात आलेल्या 'महाभारता'तील काही प्रसंग हे कपोलकल्पित आहेत, सत्याचा बळी देऊन सजवलेले आहेत असे आढळून आले. त्यामुळे रसिकांनी पडद्यावर दिसणाऱ्या घटनांनाच अंतिम सत्य मानण्याचा मोह सोडावा असे ते म्हणतात. आपल्या लेखनाद्वारे नानाभाई भट्ट यांनी लिहिलेल्या 'महाभारना पात्रो' या पुस्तकाला प्रमाण मानून या व्यक्तिरेखांचा मागोवा घेतला आहे.

''महाभारतातील हे पुरुष महान आहेत, आकाशाला भिडणारे आहेत, त्यांना समजून देण्यात आपणच कुठेतरी उणे पडण्याची शक्यता आहे'' असे ते म्हणतात. परंतु असे असूनही या पुरुषांच्या वर्तनातील विसंगती वा खटकणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष करावे असे नाही, अशी शहामृगी वृत्ती ज्ञानयात्रेला बाधक आहे असे ते मानतात आणि लेखकाचा अधिकार वाचकांनी मान्य करून या सहयात्रेत सामील व्हावे, नितांत निर्मळ चिदाकाश सोबत असू द्यावे असे आवाहन करतात. 'महाभारताचे मर्म' ही त्यांची प्रस्तावना या भूमिकेचे स्पष्टीकरण करते; तसेच महाभारताबद्दल काही मार्मिक निरीक्षणांचीही नोंद करते. महाभारत हा ग्रंथ कृष्णद्वैपायन व्यास नामक एका मानवाचेच सृजन आहे; परंतु ही निर्मिती मानवीय मर्यादांच्या पलीकडे जाऊन पोहोचते. महाभारताशी बरोबरी करील असा एकही ग्रंथ विश्वसाहित्यात नाही.

* महाभारतात जीवनाचे जसे व्यापक व सर्वांगीण दर्शन घडते, तसे ते इलियड व ओडिसी या महाकाव्यातही घडत नाही.

* मानवनिर्मित असूनही ह्या ग्रंथाचे दैवी रचनांप्रमाणे नित्यनूतन रूप जाणवते.

* महाभारताचे प्रत्येक पात्र, प्रत्येक घटना प्रत्येक वाचनाच्या वेळी नव्या रूपाचे, नव्या रंगाचे, नवे स्वच्छ, निरभ्र आकाशासारखे दर्शन घडवते.

* महाभारत हा समग्र जीवनाला सर्वांगाने स्पर्श करणारा ग्रंथ आहे.

* महर्षी व्यासांनी ज्या पात्रांद्वारे, ज्या घटनांद्वारे जितकी जीवनरहस्ये उकलली तेवढेच नवे प्रश्नही उभे केले आहेत.

* कुरुवंशाचे काही राजे किंवा राजघराण्यातील काही लोक यांच्यात झालेल्या

**अंतिम विजय सत्याचा, धर्माचा आणि न्यायाचाच होणार. हे सत्य, धर्म व न्याय म्हणजेच कृष्णत्व. कृष्णत्व ही सर्वोत्तमाची एक भावना, संकल्पना आहे. धर्माची पूर्वअटच कृष्णत्व ही आहे. यतो कृष्णः ततो धर्मः ।**

संघर्षाची गोष्ट एवढाच उद्देश या ग्रंथरचनेमागे नाही.

* ह्या घटना केवळ बाह्य आवरणासारख्या आहेत.

* यतो धर्म: ततो जय: हे वाक्य या ग्रंथात पुन:पुन्हा येते. या विधानाचे समर्थन करण्यासाठी हा महाग्रंथ लिहिला गेला असावा.

* अंतिम विजय सत्याचा, धर्माचा आणि न्यायाचाच होणार. हे सत्य, धर्म व न्याय म्हणजेच कृष्णत्व. कृष्णत्व ही सर्वोत्तमाची एक भावना, संकल्पना आहे. धर्माची पूर्वअटच कृष्णत्व ही आहे. यतो कृष्ण: ततो धर्म: ।

* धर्मविजय एवढाच जर लेखनाचा उद्देश असता तर महायुद्धाच्या अखेरीस व्यासांनी विजेत्यांना करुण रुदन करायला लावले नसते. पांडवांच्या विजयाशीच महाभारताची यात्रा पूर्ण झाली असती. पण तसे झालेले नाही.

* शेवटी जय आणि पराजय हे मनाचेच खेळ असतात. मनाचेच बहाणे असतात.

* जीवन निरर्थक आहे. जय आणि पराजय या दोहोंना काही अर्थ नाही. मानव कितीही महान व लोकोत्तर असो, तो महाकाळापुढे नगण्य आहे.

* जीवन ही एक अनायासे प्राप्त झालेली अवस्था आहे. ही अवस्था व्यर्थच आहे.

* भोग व्यर्थ आहे. क्षणिक आहे. त्याग सार्थ आहे. चिरंतन आहे.

महाभारतातील पात्रांच्या वर्तनातील, आयुष्यातील विसंगती, विसंवादही आपल्याला थक्क करतात.

दिनकर जोषी त्यातील काही ठळक नमुने दाखवतात.

कृष्ण-भीमापासून अश्वत्थामा-अभिमन्यूपर्यंत कुठलीही पात्रे घ्या. त्यांच्या ठिकाणी भव्यता आहे, पण त्याचबरोबर प्रश्नही काही कमी नाहीत.

दुर्योधन हा बदनाम व दुर्जन. पण तोही महायुद्धाच्या भीषण क्षणी सात्यकीला म्हणतो, ''आपण परममित्र. पण परस्परांचे शत्रू बनून जीवावर उठलो. धिक्कार असो आपल्या क्षात्रधर्माचा, आपल्या अहंकाराचा आणि मोहाचा!'' दुर्जनाचाही हा प्रामाणिकपणा व्यासमुनी दाखवतात.



धर्मराज युधिष्ठिर द्यूत खेळून 'मी कौरवांचे राज्य हिरावून घेऊ पाहत होतो' अशी कबुली देतो.

पराक्रमी भीष्म द्रौपदीचे वस्त्रहरण होत असताना 'समर्थ माणूस म्हणेल तोच धर्मज म्हणून अगतिकपणे बघ्याची भूमिका घेतो. आशीर्वाद मागायला आलेल्या युधिष्ठिराला 'आपण दुर्योधनाचे मिंधे आणि नपुंसक आहोत असे दीनपणे म्हणतो.

धर्माचे उत्तुंग शिखर असणारा श्रीकृष्ण निद्रावस्थेतील द्रौपदीच्या पाच पुत्रांची अश्वत्थाम्याकडून होणारी हत्या रोखू शकत नाही.

**पाच पांडवांची पत्नी म्हणून द्रौपदीने जीवन जगणे, नवरा आंधळा म्हणून गांधारीने डोळ्यावर पट्टी बांधून राहणे, धर्मराजाने बायकोला द्यूतात पणाला लावणे वगैरे गोष्टी आजही पचनी पडणे कठीण जाते.**

ही उदाहरणे देऊन दिनकर जोषी आपण या व्यक्तींकडे 'वास्तव' दृष्टीने बघण्याचा प्रयत्न कसा करीत आहोत याकडे वाचकांचे लक्ष वेधतात.

प्रत्येक व्यक्तीच्या विविध घटना-प्रसंगांच्या वेळच्या वर्तनाची ते अशीच चिकित्सा करतात. महाभारतातील बरीच पात्रे पिता म्हणून अवैध जन्म देऊन लगेच अदृश्य होताना दिसतात. पुत्रजन्माचाच काय पुत्रसंगोपनाचा सगळा भार, सगळा संघर्ष हा स्त्रीपात्रांनाच सहन करावा लागतो, असेही विधान ते करतात. धृतराष्ट्र आणि पांडू यांना झालेली संतती ही सर्वसामान्य नाही. सत्यवती पराशराच्या संबंधातून व्यासाला जन्म देते आणि पराशराच्या वरदानाने ती कुमारीच राहते. यासारख्या घटनांतील तर्कसंगती लावणे कठीण जाते.

भीष्म काशी देशाच्या कन्यांच्या स्वयंवरात जाऊन त्यांचे बलपूर्वक हरण करतो. पण जिंकलेल्या अंबालिका व अंबिका यांच्याशी स्वत: लग्न न करता, विचित्रवीर्याशी त्यांचे लग्न लावून देतो. तिसरी राजकन्या अंबा शाल्वावर प्रेम आहे असे म्हणून भीष्माकडून 'मुक्ती' मिळवू पाहते. पण शाल्व तिला स्वीकारत नाही तेव्हा भीष्माने आपल्याशी लग्न करावे असे परशुरामाकरवी भीष्माला सुचवते. परशुराम हे भीष्माचे गुरू. पण ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा भीष्माला गुरूच्या आज्ञेचे पालन करण्याच्या आड येते. त्यांचे युद्ध होते. अंबा तपश्चर्या करून भीष्माचा वध करण्याचा वर मागते. शिखंडीच्या रूपात पुनर्जन्म घेते.

अशा कितीतरी अतर्क्य, अनोख्या घटना या पात्रांच्या जीवनात घडतात. आजही त्या घटनांचे असामान्यत्व आपल्याला थक्क करते.

**वनवासाच्या शेवटच्या टप्प्यातही अर्जुनाची भ्रमरवृत्ती दिसून येते. दैवतक पर्वतावर यादवांचा उत्सव चालू असतो. कृष्णाची बहीण सुभद्रा हिला बघून तो कामविव्हल होतो. कृष्ण त्याला सुभद्रेला पळवून नेण्याचा सल्ला देतो. तशी व्यवस्था करतो.**

पाच पांडवांची पत्नी म्हणून द्रौपदीने जीवन जगणे, नवरा आंधळा म्हणून गांधारीने डोळ्यावर पट्टी बांधून राहणे, धर्मराजाने बायकोला द्यूतात पणाला लावणे वगैरे गोष्टी आजही पचनी पडणे कठीण जाते.

महाभारतातील प्रत्येक स्त्री-पुरुष पात्राच्या बाबतीत अशा तर्कशक्तीला ताण देणाऱ्या घटनांची रेलचेल आहे. तरीही मानवी मनाचे नानाविध पैलू त्यातून प्रकट होतात आणि आजही त्यांचे वास्तव आपल्याला जाणवते.

या पात्रांच्या विवाहांच्या संदर्भातही अनेक विलक्षण गोष्टी आपल्याला वाचायला मिळतात.

द्रौपदीला स्वयंवरात अर्जुन जिंकतो. द्रौपदीलाही तो पती म्हणून स्वीकारार्ह असतो. परंतु कुंतीची आज्ञा होते की पाच भावांचे पत्नीपद तिने स्वीकारावे. त्यामुळे द्रौपदीशी लग्न केल्यावर पाच भावांमध्ये काही संकेत ठरतात. द्रौपदीबरोबर एकजण एकांतात असताना दुसऱ्याने जाऊ नये. एकदा हा संकेत अर्जुनाला पाळणे अशक्य ठरते. तेव्हा ठरल्याप्रमाणे शिक्षा म्हणून अर्जुन ब्रह्मचर्यपालन आणि वनवास स्वीकारतो. युधिष्ठिर धर्माचा सोयीस्कर अर्थ लावू पाहतो तेव्हा अर्जुन धर्माच्या लक्ष्यार्थाला प्रमाण मानतो. परंतु पुढे अर्जुनही सोयीस्कर अर्थ लावतोच! जलकन्या उलुपी व मणिपूरची राजकन्या चित्रांगदा यांच्याशी तो विवाह करतो.

जलकन्या उलुपी अर्जुनावर मोहीत होते. कामतृप्तीसाठी ती लग्नाचा प्रस्ताव मांडते. अर्जुनालाही तिचे आकर्षण वाटते; परंतु तो म्हणतो, ''ब्रह्मचर्यपालनाच्या वचनाने मी बांधला गेलो आहे.'' तेव्हा उलुपी त्याची समजूत काढते, ''हे ब्रह्मचर्यपालन द्रौपदीच्या संदर्भात आहे.'' अर्जुन कामभावनेला शरण जाऊन प्रतिज्ञेला मुरड घालतो. तिच्याशी लग्न करतो. त्या रात्री त्यांचा सहवास घडतो. तिला गर्भ राहतो. पुढे पुत्र होतो. त्याचे नाव इरावान. तो तिच्याजवळच राहतो.

अर्जुनाशी त्या रात्रीनंतर उलुपीचा संबंध येत नाही. परंतु उलुपी मात्र आमरण त्या विवाहाशी एकनिष्ठ राहते. हा पुत्र कुरुक्षेत्रावर पांडवांकडून लढतो.

मणिपूरची राजकन्या चित्रांगदा हिच्यावर अर्जुनाचे मन जाते. तो तिच्या बापाकडे जाऊन मागणी घालतो. राजाला ती एकटीच कन्या. चित्रांगदेला पोटी



होणारे अपत्य आपला वारस म्हणून मणिपूरला राहील अशी अट मणिपूरचा राजा घालतो. अर्जुन मान्य करतो. तीन वर्षे मणिपूरला घरजावई म्हणून अर्जुन राहतो. बभ्रुवाहनचा जन्म होतो. त्यानंतर अर्जुन मणिपूर सोडून वनवासासाठी निघतो.

**''कृष्णाची बहीण म्हणजे माझीही बहीण असा तर्क अर्जुन सुभद्रेच्या वेळी पुढे करीत नाही. उत्तरेच्या वेळी ते ज्ञान त्याला झाले आहे. येथे कृष्णाच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो.''**

वनवासाच्या शेवटच्या टप्प्यातही अर्जुनाची भ्रमरवृत्ती दिसून येते. दैवतक पर्वतावर यादवांचा उत्सव चालू असतो. कृष्णाची बहीण सुभद्रा हिला बघून तो कामविव्हल होतो. कृष्ण त्याला सुभद्रेला पळवून नेण्याचा सल्ला देतो. तशी व्यवस्था करतो.

कृष्ण असे का करतो? अर्जुनावर अंकुश ठेवण्यासाठी तो बहिणीचे निमित्त करतो, असे म्हणणे तर्कसंगत वाटते. अर्जुनाने नंतर अन्य स्त्रीचा विचार केला नाही ही वस्तुस्थिती आहे. दोनदा संधी असूनही अर्जुनाने परस्त्रीचा अंगीकार करण्याचे टाळले. इंद्राच्या दरबारात उर्वशीने त्याच्याशी शारीरिक संबंधाची इच्छा प्रकट केली. तेव्हा अर्जुनाने म्हटले, ''तुम्ही मला मातेसमान आहात. पुरुरवा या आमच्या पूर्वजाची पत्नी आहात. तुम्ही मला वंदनीय आहात.''

तेव्हा उर्वशी त्याला शाप देते, ''कामवश तरुणीच्या मागणीला नाकारणारा तू यापुढे एक वर्षभर नपुंसक होशील.'' त्या शापाच्या काळात अर्जुन नृत्यगायनादी कला शिकतो. विराटनगरीत बृहन्नडा म्हणून अज्ञातवासात राहताना हे नपुंसकपण त्याला फायदेशीर ठरते. विराटनरेश आपली मुलगी उत्तरा हिचे पाणिग्रहण अर्जुनाने करावे अशी विनंती करतो. तेव्हा शिष्या ही मुलीसारखी असते असे म्हणून तो नकार देतो.

दिनकर जोषी अर्जुनाच्या या वर्तनावर टिपणी करतात,

''कृष्णाची बहीण म्हणजे माझीही बहीण असा तर्क अर्जुन सुभद्रेच्या वेळी पुढे करीत नाही. उत्तरेच्या वेळी ते ज्ञान त्याला झाले आहे. येथे कृष्णाच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो.''

अर्जुनाचे कृष्णप्रेम आणि दूरदृष्टी या दोन्हींचे उदाहरण म्हणून युद्धापूर्वी एका बाजूला नि:शस्त्र श्रीकृष्ण आणि दुसऱ्या बाजूला यादवांची सर्व सेना असा पर्याय असताना अर्जुनाने कृष्णाची निवड केली याकडे बोट दाखवायला हवे. युद्ध

**युधिष्ठिराचे द्रौपदी स्वयंवराच्या वेळचे वर्तन, हस्तिनापुरात द्यूत खेळण्याच्या वेळचे वर्तन आणि पत्नीला पणाला लावणे, हे बुचकळ्यात टाकणारे आहे.**

निरर्थक आहे. मला लढायचेच नाही. भाऊबंदांचा संहार करून विजय मिळविण्यात मला गम्य नाही असे अर्जुन म्हणतो तेव्हा त्याचा विचार हा ऊर्ध्वीकरण पावून गीतेचा योग बनतो. युद्धाच्या अखेरीसही श्रीकृष्ण भस्मसात झालेल्या रथातून अर्जुन उतरल्यानंतरच जळू देतो व अर्जुनाला वाचवतो.

दिनकर जोषी या प्रमुख व्यक्तींच्या वर्तनातील अशा विसंगतींचा अन्वयार्थ लावू पाहतात.

लाक्षागृहाला दुर्योधन आग लावून पांडवांना जाळून टाकण्याचा बनाव रचतो तेव्हा युधिष्ठिर भोजनाच्या निमित्ताने लाक्षागृहात आलेल्या स्त्रीला आणि तिच्या पाच पुत्रांना मद्य पाजून झोपायला लावतो आणि लाक्षागृहाला आग लावून पांडवांना भुयारी मार्गाने बाहेर काढतो. ही राजकीय लबाडीच होय असे जोषी स्पष्ट करतात. (६७) सहा निर्दोष अतिथींचा बळी देणे हे तर्कसंगत वाटत नाही. हे कृत्य युधिष्ठिराने केले म्हणून ते मनाला जास्त टोचते. युधिष्ठिराला मग धर्मराज का म्हणायचे? हा त्यांचा प्रश्न.

युधिष्ठिराचे द्रौपदी स्वयंवराच्या वेळचे वर्तन, हस्तिनापुरात द्यूत खेळण्याच्या वेळचे वर्तन आणि पत्नीला पणाला लावणे, हे बुचकळ्यात टाकणारे आहे. 'होय अश्वत्थामा मेला' असे सांगून द्रोणाचार्यांना नामोहरम करण्याच्या वेळचे युधिष्ठिराचे वाक्य त्याच्या सत्यनिष्ठेबाबत साशंकता निर्माण करते. त्याबाबत 'नरो वा कुंजरो वा' असा श्लोक उद्धृत केला जातो. परंतु महाभारतात हा शब्दप्रयोग नाही असा खुलासा दिनकर जोषी करतात. (७७) हे स्पष्टवक्तेपण कधीकधी आपल्याला धक्कादायक वाटते. परंतु सत्य हे सत्यच असते.

अर्थात युधिष्ठिराच्या न्यायशील, सत्यनिष्ठ व धर्मनिष्ठ वर्तनाचेही अनेकविध प्रसंग आहेतच.

असे प्रत्येक व्यक्तीबाबत बारकाईने केलेले विश्लेषण या पुस्तकात आपल्याला आढळते. ते मुळातूनच वाचणे, त्यावर चिंतन करणे, त्यावरून आपले मत बनवणे हे आवश्यक आहे.

**पृष्ठे :१६८ ● किंमत:१३० रु. ● सभासदांना:९१ रु. ● पोस्टेज:२५रु.**






**सत्यवती, गांधारी, कुंती, द्रौपदी वगैरे स्त्रियांचे वर्तन आजही अनोखे, अद्‌भुत वाटते ते का?**

## महाभारतातील मातृवंदना

**दिनकर जोषी**

अनु. सुषमा शाळिग्राम

महाभारत आणि रामायण या महाकाव्यांनी भारतीयांच्या मनोविश्वावर आणि मूल्यधारणेवर पिढ्यानुपिढ्या आघात आणि संस्कार करण्याचे कार्य चालू ठेवले आहे. भारतीयांना आदर्श वाटावेत असे पुरुषार्थाचे उत्तुंग नमुने या महाकाव्यांनी निर्माण केले आहेत. तसेच ज्यांची नावे आपल्या मुलांना कधीही ठेवायला कोणी धजू नये असे बदनाम दुष्प्रवृत्त मानवी नमुनेही उभे केले आहेत.

व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् असे म्हटले जाते. महाभारताच्या एक लाख श्लोकांतून महर्षी व्यासांनी जो विशाल जीवनपट उभा केलेला आहे त्यात मानवी जीवनातील बहुविध बऱ्यावाईट घटनांचे प्रत्यंतर येते. आपल्या जीवनातही आपल्याला महाभारतासारख्या पेचप्रसंगांना तोंड देणे भाग पडते.

सुईच्या अग्रावर राहील एवढीही जमीन मिळणार नाही असे दुर्योधन सिंहासनावर हक्क असणाऱ्या पांडवांना सांगतो, त्याबाबतच्या सामोपचाराच्या प्रयत्नांना धुडकावून लावतो आणि लढाईला आमंत्रण देऊन आपला विनाश ओढवून घेतो. आजही दोन भावाभावात संपत्तीचा वाद होतो, तेव्हा हाच प्रकार घडतो. न्याय मिळवण्यासाठीही संघर्ष करावा लागतो आणि या संघर्षात दोन्ही पक्षांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कौटुंबिक कलहातून सामाजिक, राजकीय वैमनस्य उद्‌भवते आणि प्रतिष्ठेच्या तसेच आत्मसन्मानाच्या अहंकेंद्रित भ्रमजालात वावरणाऱ्यांचे वास्तवाचे भान सुटते, हे आजही पदोपदी प्रत्ययाला येते.

महाभारत आणि रामायण ही दोन्ही महाकाव्ये इतिहासाचे कथन करतात की काल्पनिक कथांद्वारे मानवी जीवनातील पेचप्रसंग रंगवतात याबद्दलही अधूनमधून वाद झडतात. राम, कृष्ण या व्यक्तिरेखा खऱ्या की खोट्या, असाही प्रश्न अनेकांना अजूनही सतावत असतो. त्या दोघांना दशावतारात स्थान दिले गेले,

**भगवद्गीता हा सातशे श्लोकांचा महाभारतातील भाग भारतीयांच्या नीतिशास्त्राच्या आणि जीवन मूल्यप्रणालीच्या केंद्रस्थानी राहिलेला आहे. प्रत्येक पिढीतला नेत्यांना तो कार्यप्रवण करत आला आहे.**

देवत्व बहाल करण्यात आले. त्यांची देवळे उभारली गेली, त्यांच्या जीवनातील घटनांशी निगडित स्थळांना आजही भारतीय मोठ्या प्रमाणावर भेटी देतात, त्यांच्या स्मृती जपतात.

रणांगणावर आपलेच सर्व भाऊबंद प्रतिस्पर्धी म्हणून समोर उभे आहेत हे बघितल्यावर यांच्याशी युद्ध करण्यात काय हशील आहे असा प्रश्न अर्जुनाला पडतो; तेव्हा त्याचे सारथ्य करणारा श्रीकृष्ण त्याला भगवद्गीता सांगून ज्ञान भक्ती कर्ममार्गाचे यथातथ्य विवेचन करून प्राप्त परिस्थितीतील कर्तव्याची जाणीव करून देतो.

भगवद्गीता हा सातशे श्लोकांचा महाभारतातील भाग भारतीयांच्या नीतिशास्त्राच्या आणि जीवन मूल्यप्रणालीच्या केंद्रस्थानी राहिलेला आहे. प्रत्येक पिढीतला नेत्यांना तो कार्यप्रवण करत आला आहे. मानवी मनातही सतत सत् आणि असत् यांचा संघर्ष चालू असतो आणि त्यामुळे मानवी देह ही युद्धभूमीच असते. अशा वेळी उच्च अस्तित्वाची प्रेरणा देण्यासाठी श्रीकृष्ण पुढे येतो आणि आपला अंत:करणातील शुद्ध सात्त्विक भावनांना बळ देतो असे महात्मा गांधी यांनी म्हटले आहे. गीता हा ग्रंथ हिंसेकरता नसून अहिंसेकरता आहे असे ते मानत असत.

लोकमान्य टिळक 'गीतारहस्य'द्वारे कर्ममार्गाचा संदेश देतात...

योगीराज मनोहर हरकरे हे गीतेला आध्यात्मिक योगविज्ञानशास्त्रावरचे रूपक मानतात. आपले शरीर म्हणजे युद्धक्षेत्र. ते पिंडाचे धर्मक्षेत्र आहे तसेच शरीराचे कर्मक्षेत्र हे कुरुक्षेत्रही आहे. पिंडरूप हस्तिनापूरचा नाममात्र राजा अज्ञानांध धृतराष्ट्र. स्वत:च्याच उन्नयनित आध्यात्मिक जीवनाविषयी आंधळेपणा दाखवणारा. दुर्योधनाच्या म्हणजे वाईट, दुष्ट हट्टी भांडखोर वृत्तीच्या सल्ल्याने तो वागतो. धृतराष्ट्राचे शंभर पुत्र म्हणजे आपल्यातील वाईट प्रवृत्ती. (विवेकभ्रष्टशंनां भवति विनीपात: शतमुख:) पाच पांडव म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये. पाच प्राण. युधिष्ठिर हा पिंडधर्मानुसार उत्क्रांतीकडे मार्गक्रमण करणारा श्रेष्ठ साधक... आपल्याच शंभर वाईट प्रवृत्ती पाच ज्ञानेंद्रियांशी, पाच सत्प्रवृत्तींशी वैर करतात. कौरव हे पांडवांचा हेवा, द्वेष, मत्सर करतात... भगवान श्रीकृष्ण म्हणजे कल्पनाकारक बुद्धितत्त्व. श्री म्हणजे श्रेष्ठ. कृष्ण म्हणजे कर्षण करणारी साधकातील अवस्था. विश्वातील अनंत शक्तींचे कर्षण करण्याची अवस्था म्हणजे कृष्ण. तो आठवा पुत्र. अष्टमहासिद्धि



प्राप्त. तो अर्जुनाच्या (अर म्हणजे येणाऱ्या सर्व बाधांना आरिप्रमाणे चिरीत जाणारा, आध्यात्मिक ध्येय गाठणारा साधक) रथाचे सारथ्य करतो. असे हे आध्यात्मिक रूपक महाभारतातील प्रत्येक व्यक्ति-स्थाननामातून हरकरे यांनी श्रीमत् भगवद्गीता या आपल्या ग्रंथात उलगडून दाखवले आहे.

सारांश, महाभारताकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत. आणि प्रत्येक व्यक्तीला महाभारतातील व्यक्तिरेखा आणि घटना वेगवेगळ्या दृष्टींनी आवाहन करतात. महाभारताचे श्रवण-वाचन हा एक विलक्षण अनुभव ठरतो. नवनवी अज्ञात दालने खुली करतो.

**महाभारताकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत. आणि प्रत्येक व्यक्तीला महाभारतातील व्यक्तिरेखा आणि घटना वेगवेगळ्या दृष्टींनी आवाहन करतात. महाभारताचे श्रवण-वाचन हा एक विलक्षण अनुभव ठरतो. नवनवी अज्ञात दालने खुली करतो.**

महाभारतातील अनेकविध व्यक्तिरेखा चिंतनशील वाचकाला अंतर्मुख करतात. त्या व्यक्तींच्या विचारात आणि वर्तनात जे संघर्ष, डावपेच, विरोधाभास दिसतात ते उलगडून बघणे, समजून घेणे हे एक आव्हान वाटते.

'व्यासपर्व'मध्ये दुर्गा भगवत यांनी चार सहा पृष्ठांच्या एकेका लेखात भीष्म, कृष्ण, धर्म, कर्ण, अर्जुन, अश्वत्थामा, कुंती, द्रौपदी, दुर्योधन, धृतराष्ट्र वगैरे व्यक्तिरेखांचे मर्म उलगडून दाखवले आहे ते विस्मयचकित करते.

इरावती कर्वे यांनी 'युगान्त'मध्ये महाभारताच्या काळाविषयी आणि काही प्रमुख व्यक्तींविषयी केलेले विवेचनही मार्मिक आणि विचारांना नवी दिशा देणारे आहे. महाभारतातील समाज कृषि-गोरक्षकांचा होता. घोडे हे त्यावेळचे प्रतिष्ठेचे जनावर पण महाभारतकाली कोणास घोड्यावर बसता येत नसे. महाभारतकाळी मुख्य अन्न जव असावे. यागप्रधान धर्मात पय, पुष्प, फल यांना स्थान नव्हते. तशी पूजा महाभारतात नाही. 'पयं पुष्पं फलं तोयं यो मां भक्त्या' हा गीतेतील उल्लेख नंतरचा प्रक्षिप्त समजला पाहिजे... महाभारतात कोठेही लेखनाचा उल्लेख नाही- लेखन साहित्याचा उल्लेख नाही.. (रुक्मिणीची कथा महाभारतात नाही. भगवतात आहे). अशा सारखी त्यांची, कितीतरी निरीक्षणे महाभारतातील सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकतात.

महाभारतातील व्यक्तिरेखांवर अनेक लेखकांनी पुस्तके लिहिली आहेत. एकेका व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून कादंबऱ्यांचेही उदंड उत्पादन चालू आहे.

'महाभारतातील मातृवंदना' आणि 'महाभारतातील पितृवंदना' ही दोन नवीन पुस्तके मूळ गुजरातीतून मराठीत आलेली आहेत. महाभारताच्या आपल्या आकलनात

**महाभारतातील बहुतेक पुरुष पिता म्हणून बेजबाबदारपणे वागलेले दिसतात. पुत्राला अवैध जन्म देऊन अदृश्य होतात असाही दिनकर जोषींचा आरोप आहे; त्यामुळे आपल्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पार पाडून त्यांना खऱ्या अर्थाने प्रेरित करण्याचे काम स्त्रियांनीच पार पाडलेले आहे.**

या पुस्तकांमुळे निश्चितच भर पडेल.

गुजराती साहित्यकार दिनकर जोषी यांनी चित्रलेखा साप्ताहिकात महाभारतातील सत्यवती, गंगा, कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा उतरा, हिडिंम्बा, आणि चित्रांगदा या प्रमुख स्त्रियांचा मागोवा घेणारी लेखमाला लिहिली. त्या लेखमालेतील लेखांचेच पुस्तक पुढे निघाले. त्याचे हे मराठी भाषांतर सुषमा शाळिग्राम यांनी केले आहे.

“महाभारतातील स्त्रियांनीच काय तो पुत्रजन्म, पुत्रसंगोपन आणि एकूण सर्व संघर्ष यांचा भार सहन केलेला आहे. आणि आपल्या मुलांतून उत्तुंग व्यक्तिमत्त्वे निर्माण करून समाजापुढे सादर केली आहेत,” असे मूळ गुजराती लेखक दिनकर जोषी यांनी प्रास्ताविकात म्हटले आहे.

महाभारतातील बहुतेक पुरुष पिता म्हणून बेजबाबदारपणे वागलेले दिसतात. पुत्राला अवैध जन्म देऊन अदृश्य होतात असाही दिनकर जोषींचा आरोप आहे; त्यामुळे आपल्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पार पाडून त्यांना खऱ्या अर्थाने प्रेरित करण्याचे काम स्त्रियांनीच पार पाडलेले आहे. खुद्द महाभारतकर्त्या वेदव्यासांनीही स्त्रियांच्या या मातृत्वाच्या भूमिकेचे यथार्थ महत्त्व वा मूल्यांकन, करण्याबाबत हात आखडता घेतला आहे असेही जोषी सूचित करतात.

महाभारतकथेच्या नायकपदी सत्यवती, गंगा, कुंती, गांधारी, द्रौपदी या मातांना, त्यांच्या मातृत्वाला स्थान द्यायला हवे असाही विचार ते मांडतात.

आपल्या मुलांना जन्मत:च नदीत सोडून देणारी गंगा, कौमार्यावस्थेत मातृत्व मिळाल्यावर पुत्राचा त्याग करणाऱ्या माता सत्यवती आणि माता कुंती, प्रजोत्पादनास असमर्थ असलेल्या, पतीऐवजी अन्य पुरुषांकडून गर्भ धारण करणाऱ्या कुंती व माद्री, पितृतुल्य व्यासांशी संबंध करून धृतराष्ट्र आणि पांडू यांना जन्म देणाऱ्या अंबिका-अंबालिका या नायिकांच्या वर्तनाचाही विसर जोषींना पडत नाही; परंतु मानवजातीचे समग्र जीवन रंगवणाऱ्या महाभारताकडे निर्मळ मनाने बघू लागले तर मातृत्वाचा प्रभावच जास्त तीव्रतर जाणवेल असे त्यांना वाटते. किंबहुना महाभारतातील या मातांमध्ये जीवनाचे संपूर्ण दर्शन प्रतिबिंबित होते की नाही हे बघण्याचा प्रयत्न म्हणून या पुस्तकाकडे बघावे अशी अपेक्षा ते करतात.

महाभारतातील सर्व स्त्रीपात्रांमध्ये सर्वात ज्येष्ठ आहे ती सत्यवती. कुरुकुळात तिचा प्रवेश होण्यापूर्वीची ती मत्स्यगंधा. देवलोकातील या शापित कन्येला



माशाच्या गर्भात वास करून पृथ्वीवर जन्म घ्यावा लागतो. तिच्या शरीराला माशाचा तीव्र वास येतो... माशाच्या गर्भातून जन्म होऊनही तिला जन्म लाभतो माणसाचा. हे विशेष! उपरिचिर वसूचे स्खलित वीर्य पाण्यातील मासोळीने धारण केले त्यामुळे मासोळीच्या देहात मानवकन्यने जन्म घेतला. कोळ्यांचा नायक दाशराज याने त्या मासोळीला चिरले असता ही बालिका निघाली. त्याने तिचा कन्या म्हणून प्रतिपाल केला.

**चित्रांगद व विचित्रवीर्य हे दोन पुत्र सत्यवतीला होतात. ते कुमारवयाचे असतानाच शांतनूचे निधन होते. चित्रांगदाचा गंधर्वांशी झालेल्या युद्धात मृत्यू होतो. तेव्हा कुरुवंशाचा एकमात्र वारस विचित्रवीर्य उरतो. त्याच्या लग्नाची सत्यवतीला घाई होते.**

यमुना तीरावर नाव चालवणाऱ्या या मत्स्यगंधेवर पराशर ऋषी भाळतात आणि तपोबळाने दाट धुके निर्माण करून मत्स्यगंधेशी रत होतात. पुन्हा तिचे कौमार्य तिच्या देहात पुनर्स्थापित करतता. ‘मत्स्य’ गंधाऐवजी तिच्या शरीराचा गंध मोहक व्हावा असा वर देतात. मत्स्यगंधा योजनगंधा बनते. पुढे तिला श्याम वर्णाचा मुलगा होतो. तो कृष्ण द्वैपायन. पाराशर. तो जन्मतो तो लहान अर्भक म्हणून नव्हे तर कुमार म्हणून! त्याला जन्म देऊन सत्यवती आपल्या पित्याकडे- दाशराजाकडे निघून जाते. पराशरच या मुलाची देखभाल करतात. पुढे त्याला ‘व्यास’ म्हणू लागतात. व्यासांना मातेचे स्तन्य लाभले नाही, मातेची ममता लाभली नाही.

सत्यवतीच्या जीवनात पुढे हस्तिनापूरचा नरेश शांतनू येतो. शांतनूने गंगेबरोबर विवाहसुख उपभोगून आठ पुत्रांचे पितृत्व केले. त्यापैकी सात पुत्र मृत्यू पावले होते. आठवा पुत्र देवव्रत युवराजपदी पोचण्याइतका मोठा होतो. अशा वेळी वीस वर्षांच्या सत्यवतीच्या प्रेमात साठीतला शांतनू पडतो. “सत्यवतीच्या पोटी जन्मणाऱ्या मुलाला हस्तिनापूरचे राज्य देणार असाल तर हा विवाह होईल. अन्यथा नाही.” अशी अट दाशराज घालतो. शांतनूपुढे धर्मसंकट उभे राहते. युवराज देवव्रताला डावलून हे कसे करता येईल? तेव्हा देवव्रतच वडिलांच्या मदतीला येतो. आजन्म ब्रह्मचर्यपालनाचे वचन तो देतो आणि शांतनू-सत्यवतीच्या विवाहाचा मार्ग मोकळा होतो...

चित्रांगद व विचित्रवीर्य हे दोन पुत्र सत्यवतीला होतात. ते कुमारवयाचे असतानाच शांतनूचे निधन होते. चित्रांगदाचा गंधर्वांशी झालेल्या युद्धात मृत्यू होतो. तेव्हा कुरुवंशाचा एकमात्र वारस विचित्रवीर्य उरतो. त्याच्या लग्नाची सत्यवतीला घाई होते. अंबा, अंबालिका आणि अंबिका या तिघी राजकन्यांच्या स्वयंवरासाठी भीष्म जातो. इतर राजांना हरवून तिन्ही कन्यांना हस्तिनापूरला घेऊन येतो आणि भीष्म त्यांचे लग्न विचित्रवीर्याशी लावून देण्याचे ठरवतो. अंबा विरोध करते.

**धृतराष्ट्राच्या पत्नीच्या-गांधारीच्या पोटी मांसाचा गोळा जन्मतो. व्यास त्याचे शंभर तुकडे करतात. त्यातून शंभर पुत्र अवतरतात.**

भीष्माने त्यांना जिंकले आहे तर लग्न भीष्माशी व्हायला हवे; विचित्रवीर्याने स्वयंवरात जाऊन त्या तिघींना जिंकले असते तर हा प्रश्न उद्‌भवत नव्हता. तरीही अंबिका आणि अंबालिका यांचे लग्न विचित्रवीर्याशी होते. परंतु पुत्रप्राप्ती होण्याआधीच विचित्रवीर्याचे निधन होते.

राजमाता सत्यवतीला पेच पडतो. कुरुवंशाचे सिंहासन सुने सुने राहते. भीष्माला ती गादीवर बसण्याची विनंती करते परंतु भीष्म आपल्या प्रतिज्ञेपासून ढळत नाही. तेव्हा पुत्रप्राप्तीसाठी सत्यवती अंबिका व अंबालिका यांच्याशी नियोग पद्धतीने गर्भसंभव करण्याची सूचना भीष्माला करते. भीष्म त्यावर तपस्वी ब्राह्मणाद्वारे हे कर्म व्हावे असे सुचवतो. कृष्ण द्वैपायनाचे नाव समोर येते. सत्यवतीच्या इच्छेनुसार अंबिकेच्या शयनगृहात व्यास प्रवेश करतो. त्याची दाढी वगैरे बघून ती डोळे मिटून 'कर्तव्य' पार पाडते. धृतराष्ट्र जन्माला येतो. परंतु तो जन्मत:च आंधळा असतो. अंध अपंगाला राजसिंहासनाचा अधिकार नसतो. तेव्हा अंबालिकेला अपत्यसंभवासाठी तयार करण्यात येते. व्यासांचे रूप बघून तिचा चेहरा पांढराफटक पडतो. होणारे मूल पंडुरंगी होते... पुन्हा प्रयत्न करण्यासाठी अंबिकेला तयार करण्यात येते पण ऐनवेळी ती आपल्या दासीला पुढे करते. त्या प्रसन्नचित्त दासीला पुत्र होतो तो विदुर. तो दासीपुत्र... सिंहासनाचा अधिकारी ठरत नाही... असे नाना प्रकारचे गुंते आपल्याला आश्चर्याचे धक्के देत राहतात.

चार पुत्रांची माता आणि दोन पुत्रांची आजी असणारी सत्यवती-पांडूला तो 'रोगी' असला तरी राज्याभिषेक करते.. धृतराष्ट्र मत्सराने पेटून उठतो.. तशात पांडूला ऋषीचा शाप मिळतो. स्त्रीसंग वर्ज्य होतो. कुंती आणि माद्री या त्याच्या पत्नी. दोघींना मंत्राद्वारे पुत्र मिळतात.

धृतराष्ट्राच्या पत्नीच्या-गांधारीच्या पोटी मांसाचा गोळा जन्मतो. व्यास त्याचे शंभर तुकडे करतात. त्यातून शंभर पुत्र अवतरतात. कौरव आणि पांडव या दोन्हीतील संघर्षाची बीजे वाढतच राहतात. सत्यवतीला कुरुवंशाचा विनाश समोर दिसतो. सत्यवतीला 'पुत्र' व्यास म्हणतो,"ही वृद्ध धरती आता अधर्माचा भार सहन करू शकणार नाही. तू तिच्यापासून दूर जाऊन आत्मकल्याण साध." अंबिका-अंबालिका यांना घेऊन सत्यवती तपोवनाकडे जाते. सत्यवतीचे जीवन म्हणजे प्रत्येक पावलाला अपेक्षभंगाचे दु:ख ठरते. कुरुवंशाला वारस मिळावा



म्हणून सत्यवतीने केलेले प्रयत्न बघताना आजही आपण चक्रावून जातो. वंशसातत्यासाठी तिने अवलंबिलेले मार्ग विपरीत पर्यवसानाकडे जातात आणि कुरुवंशाच्या अभिवृद्धीपेक्षा विनाशाकडेच ते सर्वांना नेतात.

**दिनकर जोषींनी 'सत्यवती'च्या व्यक्तिरेखेद्वारे कुरुकुलाच्या आरंभीच्या गुंतागुंतीचा पट शक्य तितक्या स्पष्टपणे मांडला आहे. प्रत्येक टप्प्यावर त्यात चमत्कतिपूर्ण घटना आहेत, आणि अपेक्षेपेक्षा काहीतरी भलतेच घडताना दिसते.**

दिनकर जोषींनी 'सत्यवती'च्या व्यक्तिरेखेद्वारे कुरुकुलाच्या आरंभीच्या गुंतागुंतीचा पट शक्य तितक्या स्पष्टपणे मांडला आहे. प्रत्येक टप्प्यावर त्यात चमत्कतिपूर्ण घटना आहेत, आणि अपेक्षेपेक्षा काहीतरी भलतेच घडताना दिसते.

भीष्म हा खरे तर सर्वात ज्येष्ठ पुत्र आणि सर्वात सक्षम योद्धा. परंतु वडिलांच्या कामनेसाठी त्याला ब्रह्मचर्य पाळणे आणि सिंहासनावर बसण्याचे टाळणे हा पर्याय स्वीकारणे भाग पडते. पुढे सत्यवती त्याला सांगते, "ही प्रतिज्ञा तू माझ्यासाठी केली होतीस. मीच तुला त्या प्रतिज्ञेच्या बंधनातून मुक्त करते. तू गादीवर बस. ब्रह्मचर्य सोड. लग्न कर. कुरुकुल अखंड ठेव." परंतु भीष्म प्रतिज्ञाभंगाला तयार होत नाही. त्यामुळे व्यासांना पाचारण करण्यात येतो.. त्यातही प्रत्येक वेळी काहीतरी घोळ होतो. अंबालिका व्यासांचे ऋषिवेशातले रूप पाहून डोळे मिटून समागम करते. तिला होणारे अपत्य अंध असते.. दुसऱ्या वेळी अंबिका डोळे मिटत नाही. पण पांढरीफटक पडते. होणारे अपत्य पंडुरोगी असल्याचे आढळते.. समागमाच्या वेळची मातेची मन:स्थिती अपत्याचे स्वरूप निर्धारित करते हे भारतीयांना प्राचीन काळापासून आढळले असणार.

...अशा नानाविध दुव्यांचा मेळ घालत दिनकर जोषी यांनी महाभारतातील वेगवेगळ्या स्त्री व्यक्तिरेखांचा मागोवा घेतला आहे. एकापेक्षा एक चमत्कृतिपूर्ण किंवा विचित्र घटना त्यामुळे समोर येतात.

भीष्माला जन्म देणारी गंगा- ही शांतनूची पत्नी. कुरुवंशाची सर्वप्रथम माता; परंतु तो मान तिला मिळालेला नाही. गंगा ही खरे तर देवकन्या. देवलोकातील स्त्रिया कधीच माता होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्या स्त्रियांना कधीच पूर्ण स्त्री मानले जात नाही. मातृत्वहीन स्त्रीत्व हे अपूर्ण मानले जाते. शापामुळे पृथ्वीवर वास्तव्यास आलेल्या गंगेच्या पोटी जन्म घेण्याची इच्छा अष्टवसू प्रकट करतात. ती इच्छा गंगा मान्य करते. राजा प्रतीपाशीच्या उजव्या मांडीवर बसून लग्नाचा प्रस्ताव देवकन्या गंगा मांडते. पण प्रतीप तिला सांगतो, "तू चुकीच्या मांडीवर

**त्या प्रत्येकीच्या वर्तनातले व जगण्यातले अनेकविध अतर्क्य प्रसंग आजही आपल्याला दिङ्मूढ करतात. त्यांच्या कृतींची संगती लावणे वा बुद्धिप्रामाण्यता शोधणे अवघड ठरते.**

बसलीस. उजवी मांडी ही कन्येची वा सुनेची असते. डावी मांडी पत्नीची... तेव्हा तू माझ्या मुलाशी- शांतनूशी- लग्न करू शकशील...'' पुढे शांतनू तिला मागणी घालतो तेव्हा ती एक अट घालते. ''आपल्या दांपत्यजीवनाच्या काळात मी जे काही करीन त्याबद्दल मला काही विचारायचे नाही. विचारले तर आपला सहवास संपुष्टात येईल.'' तिला एकामागून एक सात पुत्र होतात... त्या प्रत्येकाला ती जन्मानंतर नदीत सोडते... आठव्या पुत्राच्या वेळी शांतनू तिला अडवतो आणि म्हणतो, ''हे पापकर्म होता कामा नये.'' तेव्हा गंगा आपली पूर्वकथा सांगून म्हणते, ''तुम्ही मला अडवलेत, मी आता स्वगृही जाते. भीष्माला बरोबर घेऊन जाते. मात्र पुढे हा पुत्र तुमच्याकडे येईल'' असे आश्वासन देऊन जाते. त्याप्रमाणे ती तरुण देवव्रत भीष्माला शांतनूकडे आणून पोचवते. ''याला हस्तिनापूरला न्या. युवराजपद द्या...'' असे सांगते. पुढे सत्यवतीवर लुब्ध झालेल्या शांतनूसाठी देवव्रत आजन्म ब्रह्मचर्यपालन आणि सिंहासनाचा त्याग यांची प्रतिज्ञा करतो... गंगा त्याला नंतर एकदा भेटते... त्याचा मृत्यू होतो तेव्हा...

...अशाच कथाच कथा कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा, हिडिम्बा वगैरेंच्या या पुस्तकात आल्या आहेत.

त्या प्रत्येकीच्या वर्तनातले व जगण्यातले अनेकविध अतर्क्य प्रसंग आजही आपल्याला दिङ्मूढ करतात. त्यांच्या कृतींची संगती लावणे वा बुद्धिप्रामाण्यता शोधणे अवघड ठरते.

द्रौपदीला स्वयंवरात अर्जुनाने जिंकून आणले असतानाही कुंतीने पाचही पांडवांना ती वाटून घ्या असे सांगणे आणि पाच पांडवांची पत्नी होण्याचे द्रौपदीने मान्य करणे.. हे आजही आपल्याला विचित्र व तर्कदुष्ट वाटते. नियोग पद्धतीने कुंती व माद्री यांनी माद्री यांनी पुत्रांस जन्म देणे हे नैतिकतेच्या आपल्या कल्पनांना पचवणे जड जाते... कुंतीने कौमार्यावस्थेत झालेल्या पुत्राला- कर्णाला- नदीत सोडून देणे... पांडवांना जय झाल्यावर सासूसासऱ्यांची धृतराष्ट्र-गांधारीची सेवा करण्यासाठी अरण्यात जाणे... सदैव दुःख असावे असे वरदान मागणे.. हे सर्व आजही अनाकलनीय वाटावे असे आहे.

**पृष्ठे: १०४ ● किंमत : ९० रु. ● सभासदांना: ६३ रु. ● पोस्टेज: २० रु.**



**दखल**

# डॉ. भा. ल. भोळे

## महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्काराचे मानकरी



महाराष्ट्र फाऊंडेशनचा गौरव पुरस्कार म्हणजे मराठीतील वैचारिक बुद्धिप्रामाण्यवादी परंपरेचा पुरोगामी वारसदार असल्याच्या मान्यतेची मोहर.

ही मोहर यंदा प्र. भा.ल.भोळे यांच्या कार्यकर्तृत्वावर उमटली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायलाच हवे.

डॉ. भा. ल. भोळे हे नागपूर विद्यापीठात राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ कार्यरत होते. १९४२ सालचा त्यांचा जन्म. त्यामुळे ते निवृत्त होऊनही पाचसहा वर्षे झाली. परंतु त्यांच्या लेखनवाचनाचे व्रत अजूनही तेवढ्याच उत्कटतेने चालू आहे. १९८२ साली ते पी.एच.डी. झाले. भारतीय शेतकरी कामगार पक्ष हा त्यांच्या डॉक्टरेटच्या प्रबंधाचा विषय होता. आणीबाणीच्या काळातील घटना दुरुस्तीवर त्यांनी लिहिलेले पुस्तक १९७७ मध्ये प्रसिद्ध झाले आणि आपली सैद्धांत्तिक भूमिका परखडपणे मांडण्याचे त्यांचे कौशल्य मराठी विचारवंतांना विस्मयचकित करून गेले. त्यानंतरही दुसरे स्वातंत्र्य ( १९७९), सत्तांतर आणि प्रकट करणारी ठरली. भारतीय स्वातंत्र्योत्तर राजकारणाची दिशा आणि दशा एका व्यापक भूमिकेतून तसेच सर्वसामान्य पुरोगामी दृष्ठिकोनातून डॉ. भास्कर भोळे कायम मांडत राहिले आणि त्यांच्या या भूमिकेचे अनेक जाणकारांना अगत्यही वाटले. राज्यकर्ते गेंड्याच्या कातडीचे असतात. त्यांना आपल्या ध्येयधोरणाची कोणी उलटतपासणी घेणे आवडत नाही. लेख-पुस्तकांना ते दाद देत नाहीत. आंदोलने, मोर्चे, दंगली, जाळपोळ यांची भाषा त्यांना कळते. त्यामुळे वैचारिक पातळीवरच आपली विश्लेषणप्रणाली राबवणाऱ्या विचारवंतांच्या मतमतान्तांराकडे सत्ताधीशांचे लक्ष जात नाही. आणीबाणीच्या काळात जे व्यापक सैद्धांत्तिक विचारमंथन झाले त्याचे पडसाद जनमानसात तीव्रपणे उमटले, मतदानाच्या माध्यमातून ते प्रकटही झाले. त्या काळात डॉ. भोळे यांनी आपली मतप्रदर्शनाची भूमिका न डगमगता बजावला, उत्तम प्रकारे पार पाडली. राज्यशास्त्राचे केवळ पुस्तकी अध्यापन पोटापाण्यासाठी करून न थांबता, येथील जनसामान्यांच्या भवितव्याविषयी त्याचा संबंध आहे की बांधिलकी डॉ. भोळे आरंभापासून प्रमाण मानून जगत आले आहेत आणि त्याच भावनेने लेखन-विश्लेषण करीत आले आहेत. त्यामुळे त्यांची

वैचारिक बैठक संकुचित राहिलेली नाही. ती सामाजिक जनआंदोलने, जातीपातीचे राजकारण, विसाव्या शतकातील समता विचार, नवहिंदुत्वाची व्याघ्रमुद्रा (शिवसेनेचा उदय), सामाजिक चळवळींचे राजकियीकरण, डॉ.आंबेडकर-महात्मा फुले यांचा वारसा, शिक्षण आणि संस्कृती, इस्लामचा मूलतत्त्ववाद आणि नवसुधारणावाद अशा विविध त्यांनी ग्रंथलेखन केलेले आहे. गेली तीसपस्तीस वर्षे त्यांचे हे वैचारिक उन्मेष चोखंदळ वाचक आत्मीयतेने बघत आले आहेत. सत्ताधीशांना त्याकडे लक्ष द्यावेसे वाटले की नाही हा मुद्दा अलाहिदा! पुरोगामी विचारांची पताका घेऊन डॉ. भोळे विदर्भात एकाकी चालत राहिले आहेत हे विशेष!

डॉ. भोळे यांची वाङ्मयीन भूमिकाही त्यांच्या राज्यशास्त्रीय भूमिकेशी मिळती जुळती आहे. कलावादी पठडीतल्या लेखनाला आणि समीक्षेला मराठीतील नवाहित्याच्या प्रवाहाचे आकलन आणि आकर्षण असणे अशक्यप्राय आहे; तथाकथित सौंदर्यवादी कलात्मक निकष लावून जनजीवनाचा अस्सल अकृत्रिम अविष्कार करणाऱ्या कलाकृतींना फडतूस ठरवण्याचा उपद्व्याप त्यांना निरर्थक व निरूपयोग वाटतो. समाजाभिमुख साहित्यिकांनी आपल्या साहित्याचे नवे मापदंड, नवे समाजशास्त्रीय समीक्षाव्यूह उभे करण्याची गरज त्यांना वाटते. असे समाजसापेक्ष साहित्यप्रवाह मराठीत अनिर्बंध अवखळपणे खेळू लागले तर सामाजिक राजकिय परिवर्तनाशी त्यांचा संगम होईल आणि सरंजामशाहीकडून लोकशाहीकडे, भांडवलदारी अर्थव्यवस्थेकडून समाजवादाकडे, मूलतत्ववादाकडून धर्मनिरपेक्षतेकडे आपली खऱ्या अर्थाने वाटचाल सुरु होईल असा विश्वास त्यांना वाटतो. साहित्यकारांनी या सर्व परिवर्तनाचा मागोवा घेण्याची जागरूकता दाखवायला हवी अशी त्यांची अपेक्षा आहे.

त्यासाठी खरा समाज आणि लेखक-कलावंत यांच्यातील सांस्कृतिक दरी कमी होण्याची निकड त्यांना वाटते.

ही दरी कमी करण्याची मानसिकता ज्यांना जमली अशा लेखकांच्या लेखनाची डॉ. भोळे यांनी स्वागतार्ह पाठराखण केली आहे. हे साहित्य सकस आणि समजाभिमुख होत जाईल असा आशावाद ते प्रकट करतात. ग्रामीण-जनवादी, स्त्रीवादी साहित्याचे ते स्वागत करतात. परंतु हे स्वागत करताना ते सरसकट एकाच भावाने साहित्यकृतींचे मोल करीत नाहीत वा घाऊक भलावण करीत नाहीत. या प्रवाहांमध्येही साचेबंदपणा दिसतो; आणि लेखनामध्ये निवेदन-वर्णनाच्याच पातळीवर भर आढळतो; आत्मकथनापलीकडे हा प्रवाह दुसरी वळणे घेत नाही, अशा आत्मकथनात्मक किंवा अनुभवकथनात्मक लेखनातून समाजवास्तवातील समस्यांचे आत्मनिष्ठ चित्रण तेवढे होते, त्या वास्तवाच्या मुळाशी असणाऱ्या शक्तींचा वेध घेण्याचे किंवा त्या शक्तींच्या पराभवासाठी मनोधारणा दृढ करण्याचे प्रयत्न फारसे होत नाहीत असे ते नमूद करतात. साहित्य हे समाजप्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून वापरावे असाच हा काळ आहे. त्याबाबत संकोच बाळगण्याचे कारण नाही. राज्यघटनेतील समाजवादी समाजरचनेचा उदो उदो करणारे सरंजामी मनोवृत्तींचे लोक हे नव्या मूल्यव्यवस्थेचे



पुरस्कर्ते होऊच शकत नाहीत; ते धर्मनिरपेक्षतेचे गोडवे गात असले तरी धर्माच्या नावाने सुरू असलेल्या कर्मठ अंधश्रध्दांना, बुवाबाजीला खतपाणीच घालत असतात. त्यांच्या दांभिकपणाचे मुखवटे ओरबाडून काढण्याचे काम नव्या प्रवाहातील साहित्यिकांनी करायला हवे असे प्रतिपादन डॉ. भोळे करतात.

नव्या प्रवाहातील साहित्यिकांनाही ते धोक्याचा इशारा देतात.

हा धोका कशापासून आहे?

काही नव्या लेखनांना बक्षीसे, पुरस्कार, प्रसिद्धी, आमदारकी वगैरेंचा मारा करून राज्यकर्ते आणि प्रस्थापित वर्ग त्यांना दीपवून टाकतात. त्या झगमगाटाच्या झोतात या लेखकांमधील क्रांतीची ठिणगी क्षीण होते. संघर्षाची उर्मी सुखासीनतेच्या आकर्षणाखाली गुदमरून जाते. या नव्या प्रवाहातील लेखनांची मुळे छाटून टाकली जातात आणि त्यांचे बोन्सायीकरण केले जाते. एका परीने समता, समरसता वगैरे नावाखाली प्रस्थापित वर्ग या नव्या उर्मींना निष्प्रभ, निस्तेज करण्याचे कारस्थान रचतो आहे.

तसे पाहता आजच्या आपल्या मराठी लेखनांचा स्थायीभाव काय आहे? डॉ. भोळे यांच्या मते, मूल्यमुक्त राहणे किंवा मूल्यसंदिग्धता गोंजारत राहणे हा आपला लेखकांचा स्थायीभाव आहे. या लेखकांच्या धारणांवर पाश्चात्याच्या सांस्कृतिक आक्रमणाचा प्रभाव दिसतो. परंतु पाश्चात्य मूल्यव्यवस्थाही पूर्णपणे पचवणे त्यांना जमत नाही किंवा परवडत नाही. तिच्यातले सोयीचे व सवंग भागच तेवढे स्वीकाराले जातात; पुरोगामी तत्त्वांना नकार देणे वा जुना आशयच नव्या आकृतिबंधात पेश करणे एवढ्या पुरतेच या लोकांचे पाश्चात्यीकरण संकुचित, सीमित राहते असे डॉ. भोळे यांना वाटते. साखर कारखान्यांच्या आरामशीर गेस्ट हाऊसवर राहून तिथल्या काही माणसांची स्टाइल भाषावैचित्र्यासह टिपून किस्से सांगून करमणूक करण्याची, नाटके सिनेमे करण्याची आणि सामाजिक बांधिलकीचे ढोल बडवत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सन्मान पदरात पाडून घेणाऱ्यांची हजेरी डॉ. भोळे घेतात.. अशा लेखकाचा तूर्त सुकाळ आहे याबद्दल त्यांना खेद वाटतो. एकांगी, पूर्वग्रहदूषिक आणि फॅशनेबल बांधिलकीचा त्यांना तिटकारा वाटतो. अशा लेखकांच्या आकलनक्षमतेचे थिटेपण त्यांना भयावह वाटते. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनासारख्या संबंध महाराष्ट्र हलवून सोडणाऱ्या घटनेवर मराठीत अजूनही एखादी वॉर अँड पीस सारखी कसदार कादंबरी का निर्माण होऊ शकत नाही असा प्रश्न त्यांना पडतो...पत्रकारांनी लिहिलेल्या राजकीय कादंबऱ्याही उथळ आणि वृत्तपत्रीय स्वरूपाच्या आढळतात असेही ते म्हणतात.

महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारामुळे डॉ. भोळे यांनी गेल्या तीन चार दशकात अविरत केलेल्या लेखनसाधनेला मान्यता मिळाली आहे. त्यांच्या संपूर्णच विचारव्यहाराची मांडणी समजावून घेण्याची प्रेरणा या पुरस्कारामुळे बुद्धिमान तरूणतरूणींना झाली तर पुरोगामीपणाचे कालसंगत स्वरूप स्पष्ट होऊ शकेल.

❐

## सार्धसुधं...

# छबीदार छबी...

**प्रमोदिनी वडके-कवळे**

भाऊबीजेला यायला मिळालं नाही म्हणून नंतरच्या आठवड्यात रविवारला जोडून एक दिवसाची रजा घेऊन रवीमामा मुंबईहून आला.

आमच्या शाळेची दिवाळीची सुटी संपल्यावर तो आला म्हणून आम्ही भावंड जरा नाराजच होतो. कारण रवीमामाचं येणं म्हणजे काहीतरी नवं बघायला मिळणं. निळ्या चौकडीच्या गुळगुळीत कागदात बांधलेले ब्रिटानिया पावाचे मऊसूत पातळ चतकोर... नाहीतर वेगवेगळ्या स्वादारंगाची क्रीम बिस्कीटं. . किंवा कॅडबरी चॉकलेटची पोस्टकार्डाच्या आकाराची 'मोठ्ठी' लादी! अगदी त्याची एका दिवसाच्या प्रवासासाठीची खांद्याला अडकवायची लहानशी बॅगसुद्धा आम्ही नवलाईने हाताळून पहायचो. (तेवढ्या भांडवलावर पुढले कितीतरी दिवस आम्हाला वाड्यातल्या मुलांवर भाव मारता यायचा.)

चीनमधल्या औद्योगिक क्रांतीने आपले हातपाय पसरलेले नसल्यामुळे आता असल्या अगदी साध्या वाटणाऱ्या वस्तू तेव्हा आम्हाला अपूर्वाईच्या वाटायच्या. कारण रोह्यासारख्या तालुक्याच्या गावात आम्हाला त्या कधीच पाहायला मिळायच्या नाहीत. गावातल्या एकुलत्या एका बेकरीत फक्त मंगळवारी आणि शुक्रवारी तयार होणारा गुबगुबीत पाव, पांढऱ्या पारदर्शक कागदात गुंडाळलेलं रावळगाव चॉकलेट आणि भलाभक्कम कडीकोयंडा असलेली पत्र्याची ट्रंक असल्या वस्तूंच्या पार्श्वभूमीवर आम्हाला मामाने आणलेल्या मुंबईच्या या चीजांचं फार अप्रूप वाटायचं आणि आमचं हे कौतुक मामालाही मान्य असल्याने 'असल्या महागामोलाच्या वस्तू पोराटोरांच्या हाती देत जाऊ नकोस रे. कशाचीही वाट लावण्यात पटाईत आहेत माझी मुलं.' या आईच्या खात्रीदायक सल्ल्यानंतरही तो आमच्यावर 'याला हात लावू नका, ते खाऊ नका' असले निर्बंध लादायचा नाही. पण यावेळी मात्र मामाने आणलेल्या वस्तूला आम्ही कोणीच हात लावू शकत नव्हतो. कारण यावेळी मामाने आणलेली वस्तू खरोखरच महागामोलाची आणि खुद्द त्याच्यासाठीही अपूर्वाईची होती.

अग्फाक्लिकचा कॅमेरा!

चामड्याच्या ऐटबाज वेष्टनातून आपला भलामोठा डोळा बाहेर काढून जगाकडे बघणारी ती चौकोनी चीज भलतीच करामती होती. आल्यापासूनच्या दीड दिवसात



त्या भिंग नामक डोळ्यावरचं झाकण काढून मामाने आमचे बरेच फोटो काढले होते. दरवेळी अंगणात किंवा माडीवरच्या खिडकीपाशी भरपूर उजेडात आम्हाला उभं करून विचारपूर्वक वेगवेगळ्या पोझेस देऊन आमची छबी चितारण्यात आली होती. कारण मामाला आमची हौस पुरवायची असली तरी केवळ चोवीसच फोटो काढणारा 'रोल' हावरटासारखा एकाच वेळी संपवून टाकायचा नाही हा धाक होताच.

खरोखरीच गोष्टीतल्या जादूच्या पेटीइतकीच नवलाईची वाटणारी ती अजब चीज एकदा तरी जवळून हाताळायला मिळावी म्हणून आम्ही भावंडं अक्षरश: टपून होतो. पण नाही. यावेळी रवीमामाचा निर्धार कठोर होता. आम्हाला कुणालाच त्याने कॅमेऱ्याला बोटसुद्धा लावू दिलं नाही. डोळ्यात तेल घालून त्याच्या कॅमेऱ्यावर (आणि आमच्यावरही) लक्ष ठेवलं होतं.

पण शेवटी आई आम्हाला मामापेक्षा जास्त ओळखत होती. आमच्या पल्याने एक दिवस उद्योग केलाच. रवीमामा आंघोळीला गेलेला असताना त्याने खुंटीला अडकवलेल्या कॅमेऱ्याच्या भिंगाचं टोपण काढलं आणि पटकन 'क्लिक' करून समोर अंगणात उभ्या असलेल्या म्हशीच्या तुटक्या शिंगाचा बिनबुडाचा फोटो काढला. त्याबद्दल पल्याला घरातल्या प्रत्येक मोठ्या माणसाकडून वेगवेगळं 'बक्षीस' मिळालं हे खरं. पण पल्या मात्र जाम आनंदात होता. 'मार काय! नेहमीचाच आहे. त्यासारख्या क्षुल्लक गोष्टीच्या बदल्यात कॅमेऱ्याला हात तर लावायला मिळाला.' असा बेफिकिर क्रांतिकारी भाव पुढले कित्येक दिवस त्याच्या चेहऱ्यावर तरळत होता.

कॉलेजच्या पहिल्या वर्षाला असताना आमची रायगडावर सहल गेली होती. चाळीस जणाच्या ग्रुपमधे फक्त नंदिनीकडेच कॅमेरा होता. (बडे बापकी बेटी.) अर्थातच तो फक्त तिलाच हाताळता येत असल्याने सहलीतले उन्मुक्त स्वातंत्र्याचे क्षण संस्मरणीय करण्याचा तिचा प्रयत्न चालला होता. आणि आम्ही सगळेही तिच्या हातातल्या कॅमेऱ्यावर डोळा ठेवून वावरत होतो. रायगडावरची ऐतिहासिक ठिकाणं बघताना अभिमानाने उर भरून येण्याऐवजी आपण कॅमेऱ्याच्या टप्प्यात येतोय ना हीच काळजी आमच्या उरात दाटत होती. आमच्याही नकळत! सहलीच्या आनंदापेक्षा कॅमेरामहोदयच वरचढ होते.

आपल्या दृश्य प्रतिमेवर माणसाचं किती प्रेम असतं, नाही? मला वाटतं आदिमानवालाही अन्नवस्त्रनिवाऱ्याइतकीच तीव्रपणे आपुलीच छबी पहावी या डोळा अशी गरज वाटली म्हणूनच त्याने आरशाचा शोध लावला असेल. त्यासाठी पाऱ्यासारखी चंचल काचेसारखी नाजूक आणि अक्षरश: क्षणभंगुर वस्तू हाताळण्याचा धोका पत्करला असेल. पण आरशातली छबी सावलीसारखीच! कालनिष्ठ आणि सडेतोड. ती निर्बुद्धपणे सुंदर चेहऱ्याला(च) सुंदर म्हणणार. इतरेजन आपल्या आरशातल्या छबीला सुंदर मानून घेत असले तरी कोणतेही सौंदर्य जपून ठेवण्याशी

मात्र आरशाला काहीच मतलब नाही. एखाद्या कृतघ्न माणसासारखा तो फक्त समोर येणाऱ्यालाच त्याचं प्रतिबिंब दाखवणार. तुम्ही त्याच्यासमोरून बाजूला झालात की पुन्हा त्याची पाटी कोरी.

जगातल्या इतर कोणत्याही गोष्टीगुणांपेक्षा आपल्या प्रतिमेवरच जास्त प्रेम करणाऱ्या मानवाचं केवळ आरशातल्या अशा क्षणभंगुर छायेने समाधान होणं शक्यच नव्हतं. खूप बुद्धी वापरून आणि आटापिटा करून त्याने कॅमेऱ्याचा शोध लावला असणार. मला खात्री आहे कॅमेरा आणि कागदाच्या सहाय्याने आपली प्रतिमा टिकवून ठेवता येते हा शोध लागल्याक्षणी मानवाला विमानाचा शोध लागल्या क्षणाइतकाच आनंद झाला असेल. कारण आता त्याला कोणत्याही क्षणाची स्मृती चिरंतनरूपात जपता येणार होती.

अमितचा जन्म. आई होण्याची माझी पहिलीच वेळ. प्रत्येक पहिलटकरीण आईसारखंच माझ्या पोराच्या जगावेगळ्या देखणेपणाचं(!) मला अपार कौतुक वाटत होतं. जगातल्या प्रत्येक सुखाचा सर्वोत्तम अनुभव त्याला मिळावा अशी प्रत्येक आईच्या मनातली इच्छा माझ्याही मनात होती. ती इतकी तीव्र होती की त्यापुढे काही अनुभवण्याचं त्याचं वय अजून झालेलं नाही या वास्तवाचाही मला विसर पडला होता.) त्यावेळी रंगीत फोटो ही अतिशय महागडी पण तेवढीच अपूर्वाईची गोष्ट होती. मुळात फोटो हीच तेव्हा अशी घरच्याघरी उठसूट काढण्याची गोष्ट नव्हती. त्यासाठी फार मोठी तयारी लागायची. चांगला फोटोग्राफर शोधायचा.. एका वेळी पूर्ण रोल वापरण्याचं आश्वासन देऊन त्याला स्पेशल फोटोंसाठी तयार करायचं. ..(बारसं, डोहाळजेवण अशा दुय्यम समारंभाचे फोटो काढून ठेवणारं कुटुंब 'गुलहौशी' याच सदरात मोडायचं.) माझ्या बाळाच्या काजळमाखल्या डोळ्यांचे आणि तीटेचा काळा फराटा उठलेल्या गाबऱ्या गालाचे रंगीत फोटो काढून ठेवण्याचं माझं स्वप्न होतं. माझी ही हौस माझ्या आर्थिक कुवतीला न पेलण्याइतकी महागडी तर होतीच; पण ती पुरी करण्यात आणखी एक अडचण होती. लहान मुलांचे फोटो काढले तर त्यांना दृष्ट लागते आणि त्यांचं आरोग्य बिघडतं. बाळसं जातं.. असले ठाम समज घरातल्या ज्येष्ठवर्गात रुजलेले होते. त्यामुळे सहा महिन्याच्या अमितचे वेगवेगळ्या पोझमधले फोटो काढायला घरातून परवानगी मिळणं शक्यच नव्हतं.

पण (आईच्या) हौसेला मोल नसतं हेच खरं. मी नाना खटपटी करून जास्तीतजास्त किफायतशीर दरात (एका कॉपीचे फक्त सदतीस रुपये) अमितचे रंगीत फोटो काढून देणारा फोटोग्राफर शोधला. एकाच वेळी त्याचा पूर्ण रोल संपण्यासाठी माझ्यासारख्याच आणखी दोनतीन हौशी आयांना गाठलं. माझ्यातलं सगळं जाहिरातकौशल्यपणाला लावून त्यांना बागेतल्या हिरवळीवर आमच्या मुलांचे फोटो काढण्यातलं सौंदर्य (आणि मातृकर्तव्यही) पटवून दिलं.

फोटो काढायची बाग आणि वेळ ठरली. मी घरात थाप मारून अमितला घेऊन



बाहेर पडले. बरोबर त्याच्या वेगवेगळ्या कपड्यांनी भरलेली पिशवी होतीच. (कारण वेगवेगळ्या रंगाच्या कपड्यात फोटो काढायचे होते ना)

ठरलेल्या ठिकाणी आम्ही चौघी आपापल्या बाळांना घेऊन दाखल झालो तेव्हा आभाळ गच्च भरून आलेलं होतं. फोटोग्राफर आला तेव्हा पावसाचे बारीक थेंब पडायला सुरुवात झाली होती.

आम्ही मुलांना फुगे, घोडा पिपाणी असली आमिषं दाखवून फोटोला सज्ज करेपर्यंत जोरदार सरी कोसळायला लागल्या होत्या. भरीस भर म्हणून थोड्या वेळात सूर्यानेही लपंडावाचा खेळ मांडला.

एवढ्या सगळ्या अडचणींवर मात करूनसुद्धा आम्ही मुलांचे फोटो काढलेच. पण चार दिवसांनी ते बघितल्यावर आमचेच चेहरे फोटो काढण्यासारखे झाले... चिंब भिजलेले कपडे. रडून रडून सुजलेले झोपाळू डोळे. रागानाईलाजाने पसरलेलं भोकाड आणि पावसाच्या धारांची पार्श्वभूमी यामुळे चारही मुलं फोटोत एकसारखीच दिसत होती. हॉस्पिटलमधल्या नवजात बाळांसारखीच. आजही अमितचा तो पहिलावहिला फोटो माझ्या संग्रहात आहे.

हो! संग्रहच म्हणायला हवंय. कारण आता घरात नाना प्रकारचे कॅमेरे आणि ढीगभर आल्बम्स झालेत. फोटोंसाठी खास वेगळं कपाट केलं गेलंय. पण आता तिकडे कुणी ढुंकूनही पहात नाही. कारण मधल्या काळात कितीतरी पाणी वाहून गेलंय. आता डिजिटलचा जमाना आलाय. फोटो काढले की थेट टी. व्ही. ला वायर जोडून कुठच्याही वस्तूव्यक्तीची एकोणतीस इंची छबी पहायची नाहीतर संगणकावर फोटो न्याहाळायची नवी सवय सगळ्यांना जडलीय. घरातल्या कुत्रीमांजरांचेच काय पण बागेतल्या रंगीबेरंगी सुरवंटाचेही आता फटाफट फोटो काढले जातात.

आता काही दिवसांनी अमितच्या मुलाचा फोटो काढायची वेळ आलीय. त्यासाठी रावसाहेबांची तयारी चालू झालीय. जन्मलेल्या क्षणाचा फोटो. पहिलं रडणं. पहिलं हसणं. झोपेत आळस देतानाची गोऽड पोझ... बाळाच्या जन्माअगोदरच त्याचे कसेकसे फोटो काढायचे याबद्दलचे आईबाबांचे बेत चालू असतात आणि ते ऐकताना मी गालातल्या गालात हसून तथास्तु म्हणत असते..

..काळ बदलतो. कॅमेरा बदलतो. पण आईवडिलांच्या नजरेतलं आपल्या बाळाचं कौतुक थोडंच बदलतं?

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

**आगामी**

# प्लँचेट

**स्नेहल जोशी**

---

**किंमत : १६०रु.**
**पोस्टेज : २५रु.**




जन्म आणि मृत्यू यामधील प्रवास माणूस करतच असतो. पण या प्रवासातही काही वेळा त्याला गूढत्व जाणवते. पण खरा गूढ आणि अनाकलनीय प्रवास आहे जन्मापूर्वीचा आणि नंतरचा...
या गूढाचे माणसाला विलक्षण आकर्षण वाटते. त्याला आणखी आकर्षण वाटते ते भविष्याचे.
आणि एकदा या गूढाचे किंवा भविष्याचे वेध लागले की...
आणि यातूनच जन्म घेतात गूढकथा, संदेहकथा, रहस्यकथा, फॅन्टसीज, कूटकथा आणि भयकथा.... आणि इतर अशाच अनेक...
माणसांच्या या मनोव्यापारांचे रहस्य उलगडत टिपलेल्या या कथा वाचकाला नक्कीच भुरळ घालतील.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# नवीन प्रकाशने

शालेय जीवनात अनेक सिद्धांत, उपकरणे, प्रयोग अशा वैज्ञानिक गोष्टी अभ्यासल्या जातात.
या साऱ्या वैज्ञानिक शब्दांची मांडणी, विवेचन सोप्या पद्धतीने या पुस्तकात आहे...

**डी. एस्. इटोकर**

## A to Z विज्ञान

**८०रु.**
**पोस्टेज २०रु.**

जपानमधील चियोचान नामक मुलीचा आयुष्यातील प्रखर संघर्ष चितारणारी रोमहर्षक कहाणी....

**Memoirs of a Geisha**

## 'मी सायुरी'

**आर्थर गोल्डन**
अनु. सुनंदा अमरापूरकर

**४००रु.**
**पोस्टेज ३०रु.**

मानवी भावभावनांचा सुंदर गोफ विणणाऱ्या रवींद्रनाथ ठाकूर यांच्या आशयघन कथा...

**अनु. मृणालिनी गडकरी**

## पोस्टमास्तर आणि इतर कथा

**१४०रु.**
**पोस्टेज २५रु.**

जगाच्या पाठीवर एकही 'ज्यू' जिवंत राहत कामा नये, या एकाच महत्त्वाकांक्षेपोटी हिटलर आणि त्याच्या साथीदाराने केलेला हा कल्पनातीत संहार....

**उमेश कदम**

## संहार

**९०रु.**
**पोस्टेज २०रु.**

# २००७ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **उल्का** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **मंद्र : डॉ. एस्. एल्. भैरप्पा** | अनु. उमा कुलकर्णी | ४००/- |
| **फाईव्ह पॉइंट समवन** : चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| **साम्राज्य बुरख्यामागचे :** कारमेन बिन लादेन | अनु. अविनाश दर्प | १५०/- |
| **गोल्डफिंगर : इयान फ्लेमिंग** | अनु. माधव कर्वे | १८०/- |
| **सीजर :** रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३००/- |
| **ब्लॅकबर्ड** | मनोहर धोत्रे | ८०/- |
| **टारफुला** | शंकर पाटील | २४०/- |
| **सोनेरी स्वप्नं भंगलेली** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **द लास्ट फ्रन्टियर** : ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २८०/- |
| **द नेमसेक** : झुंपा लाहिरी | अनु. उल्का राऊत | २००/- |
| **द मॅन विथ द गोल्डन गन** : इयान फ्लेमिंग | अनु. डॉ. देवदत्त केतकर | ८०/- |
| **यू ओन्ली लिव्ह ट्वाइस** : इयान फ्लेमिंग | अनु. जयवंत चुनेकर | १६०/- |
| **थंडरबॉल :** इयान फ्लेमिंग | अनु. जयंत कर्णिक | १६०/- |
| **द स्पाय हू लव्ह्ड मी :** इयान फ्लेमिंग | अनु. अजित ठाकूर | ११०/- |
| **लिव्ह अँड लेट डाय :** इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १६०/- |
| **टू सर विथ लव्ह** : ई. आर. ब्रेथवेट | अनु. लीना सोहोनी | १५०/- |
| **सॉफ्टवेअर** | ह. मो. मराठे | २००/- |
| **इतिवृत्त** | ह. मो. मराठे | २००/- |
| **दृष्टिभ्रम** | डॉ. बाळ फोंडके | १३०/- |
| **द काइट रनर :** खालिद हुसैनी | अनु. वैजयंती पेंडसे | २७०/- |
| **अलाइव्ह :** पिअर्स पॉल रीड | अनु. अशोक पाथरकर | १५०/- |
| **मी सायूरी :** आर्थर गोल्डन | अनु. सुनंदा अमरापूरकर | ४००/- |
| **संहार** | उमेश कदम | ९०/- |



| | | |
|---|---|---|
| **संशोधनपर लेखन** | | |
| **फॉर हिअर, ऑर टू गो?** | अपर्णा वेलणकर | २२५/- |
| **कथासंग्रह** | | |
| **पाटलांची चंची** | शंकर पाटील | १३०/- |
| **खुळ्याची चावडी** | शंकर पाटील | १२०/- |
| **धिंड** | शंकर पाटील | १००/- |
| **जुगलबंदी** | शंकर पाटील | ९०/- |
| **बंधारा** | शंकर पाटील | १००/- |
| **इल्लम** | शंकर पाटील | ९०/- |
| **ताजमहालमध्ये सरपंच** | शंकर पाटील | ९०/- |
| **स्पॉटलाईट :** तारिक असलम ‘तस्नीम’ | अनु. उज्ज्वला केळकर | १२०/- |
| **थर्ड पर्सन** | यशोधरा काटकर | १६०/- |
| **संवेदना :** डॉ. कमल चोपडा | अनु. उज्ज्वला केळकर | १३०/- |
| **विमुक्त** | दादासाहेब मोरे | १३०/- |
| **झोपाळा** | व. पु. काळे | १००/- |
| **मायाबाजार** | व. पु. काळे | ११०/- |
| **पोस्टमास्तर आणि इतर कथा :** रवीन्द्रनाथ ठाकूर | अनु. मृणालिनी गडकरी | १४०/- |
| **प्रेरणादायक कथा** | | |
| **चिकन सूप फॉर द सोल :** जॅक कॅनफिल्ड/मार्क व्हिक्टर हॅन्सन | अनु. उषा महाजन | १६०/- |
| **चिकन सूप फॉर द वुमन्स सोल :** जॅक कॅनफिल्ड/मार्क व्हिक्टर हॅन्सन जेनिफर रीड हॉथॉर्न/मार्सी शिमॉफ | अनु. श्यामला घारपुरे | १६०/- |
| **गूढकथा** | | |
| **स्वप्नातील चांदणे** | रत्नाकर मतकरी | ७०/- |
| **मांजराची सावली** | जयश्री कुलकर्णी | १३०/- |
| **विषवल्ली** | जयश्री कुलकर्णी | १२०/- |
| **चरित्रे** | | |
| **वपु** | स्वाती चांदोरकर | १२०/- |
| **अंतराळवीर सुनीता विल्यम्स :** कॅप्टन एस. शेषाद्री/अराधिका शर्मा | अनु. चित्रा वाळिंबे | ८०/- |

| | | |
|---|---|---|
| **भारतीय साहित्यिक** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १२०/- |
| **ललित** | | |
| **मैत्र जिवाचे** | डॉ. भवान महाजन | १००/- |
| **समीक्षा** | | |
| **महाभारतातील पितृवंदना :** दिनकर जोषी | अनु. सुषमा शाळिग्राम | १३०/- |
| **महाभारतातील मातृवंदना :** दिनकर जोषी | अनु. सुषमा शाळिग्राम | ९०/- |
| **विज्ञानविषयक** | | |
| **तंत्रज्ञानाची मुळाक्षरे** | कविता भालेराव | २३०/- |
| **प्रेमाचा रेणू** | डॉ. संजय ढोले | १८०/- |
| **ए टू झेड विज्ञान** | डी. एस्. इटोकर | ८०/- |
| **राजकीय** | | |
| **न जलसा, न जल्लोष :** जे. बी.डिसूझा | अनु. एस्. ए. वीरकर | १५०/- |
| **आयएसआयच्या कारवाया** : पदम शर्मा | अनु. अरुण मांडे | १५०/- |
| **व्यक्तिमत्वविकसन** | | |
| **झटपट व्यक्तिमत्वविकास :** स्वपरिवर्तनाचे नवीन तंत्र | संजीव परळीकर | ५०/- |
| **सुंदर मन : एडवर्ड डी बोनो** | सुभाष जोशी | १२०/- |
| **आत्मकथन** | | |
| **ए कॉल टू ऑनर : जसवंत सिंग** | अनु. अशोक पाध्ये | ४००/- |
| **पहिली पावलं : वि. स. खांडेकर** | संपा. डॉ. सुनीलकुमार लवटे | ९०/- |
| **सेक्स वर्कर : नलिनी जमीला** | अनु. सुप्रिया वकील | १२०/- |
| **आरोग्य माहितीपर** | | |
| **एड्स** | डॉ. दिलीप बावचकर | १५०/- |
| **पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना :** बिजयालक्ष्मी होता | अनु. प्रशांत तळणीकर | ७०/- |
| **सर्व वयोगटासाठी योगसाधना** : बिजयालक्ष्मी होता | अनु. प्रशांत तळणीकर | ७०/- |
| **सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी योगसाधना :** बिजयालक्ष्मी होता | अनु. प्रशांत तळणीकर | ७०/- |
| **संदर्भ ग्रंथ** | | |
| **भाषाशास्त्र परिचय** | डॉ. राजशेखर हिरेमठ | ८०/- |



| | | |
|---|---|---|
| **संकीर्ण** | | |
| **जागतिक अर्थव्यवस्था** | मधुसूदन दत्तात्रय साठे | २२०/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| **गाऊन्स** | हेमा कळके | १६०/- |
| **चला जाणून घेऊ या! उपयुक्त कानमंत्र** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! सौंदर्याचे रहस्य** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! डोकेदुखी :** डॉ. सावित्री रामैया | अनु. ज्योतिका चितळे | ३०/- |
| **डिझाईन युअर करिअर :** श्रीनिवास पंडित | अनु. सुप्रिया वकील | १२०/- |
| **चला जाणून घेऊ या! परमार्थ :** आर. एन. लखोटिया | अनु. डॉ. वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! ध्यानसाधना :** विकास मलकानी | अनु. साधना सराफ | ३०/- |
| **माहितीपर** | | |
| **चार शब्द द्यावे-घ्यावे** | संजीव परळीकर | ७०/- |
| **वास्तुशास्त्र** | | |
| **वास्तु-अजित** | अजित राजाराम जाधव | ३००/- |
| **काव्य** | | |
| **ब्लॅक ॲण्ड व्हाईट** | संजय चुरमुरे | ९०/- |
| **नाटक** | | |
| **जादू तेरी नजर** | रत्नाकर मतकरी | ६०/- |
| **बिझनेस ॲन्ड मॅनेजमेंट** | | |
| Business Economics - I | डॉ. ए. बी. कलकुंद्रीकर | १४०/- |
| Principles Of Management | डॉ. प्रकाश एम. हेरेकर | १६०/- |
| Business Environment | डॉ. सी. एन. सोनटक्के, डॉ. प्रकाश एम. हेरेकर | १६०/- |
| Foundation of Human Skills | डॉ. सी. एन. सोनटक्के | १३०/- |
| Business Communication | डॉ. प्रकाश एम. हेरेकर | १९०/- |
| Financial & Cost Accounting | प्रा. व्ही. ए. पाटील | २३०/- |

**भूगोल**

| | | |
|---|---|---|
| **१२वी भूगोल** | प्रा. के. ए. खतीब | ७०/- |
| **आर्थिक भूगोल** | प्रा. के. ए. खतीब | १४०/- |
| **वसाहती भूगोल** | प्रा. के. ए. खतीब | १००/- |

**बाल वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| **घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **खेळ खेळा चित्र रंगवा** | रमेश मुधोळकर | ३०/- |
| **रंगांची रंगीत गोष्ट वाचा, रंगवा, प्रयोग करून पहा.** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३०/- |
| **ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३०/- |
| **रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३०/- |
| **पंचरंगी खार आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **इमानी मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **डूंगनचं घर आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे | ३०/- |
| **गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे | ३०/- |
| **जादूचं तळं आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **जादूचं बटणं आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३०/- |
| **जादूचं रबर आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३०/- |
| **हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३०/- |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**नामवंत लेखक श्री. महादेव मोरे यांना नुकताच महाराष्ट्र फाऊंडेशन साहित्यविशेष पुरस्कार मिळाला, त्यांची मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित पुस्तके**




## मत्तीर

मनुष्यातील आदिम प्रवृत्तींचा वेध घेत मिश्किल मात्र गंभीर कथालेखनाद्वारे श्री. मोरे यांनी पांढरपेशी परिघाबाहेर जगणाऱ्या समाजाचे मनोज्ञ चित्रण

**२००रु. पोस्टेज : २५रु.**

## झोंबड




**१००रु.**
**पोस्टेज : २०रु.**

मराठी साहित्यातील रुढ चाकोरीतून काहीवेगळं लिहिण्याचा वेगळे प्रयोग करण्याचा माझा सतत प्रयत्न असतो. 'झोंबड' मध्येही मराठी कादंबरीतील रुढ संकेत व ठोकताळ्यांना बगल देऊन कादंबरीच्या फॉर्ममध्येच काही वेगळं देण्याचा हा प्रयत्न. भारतात अनेक वेळा, अनेक ठिकाणी व अनेक काळांनी नित्य चळवळी व आंदोलने होत असतात. हा काल म्हणजे एक गरगर फिरणारा, नदीच्या महापुरातील पाण्यातला भोवरा असतो. त्यात सापडणारे लोक, लोकनेते व लोकांचे प्रश्न नि लोकांनीच निवडून दिसले सरकार, सरकारी अधिकारी या साऱ्यांचे समूहचित्रण 'झोंबड' मध्ये करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**- महादेव मोरे**

## चेहऱ्यामागचे चेहरे





काही व्यक्तिचित्रांचा हा संग्रह. ही बहुतांशी समाजातील तळागाळाच्या वर्गातल्या, नगण्य ठरणाऱ्या, परंतु वैशिष्ट्यपूर्ण अशा व्यक्तींची शब्दचित्रं आहेत. लेखकाच्या सिद्धहस्त लेखणीनं जगाला दिसणाऱ्या यांच्या चेहऱ्यामागील चेहऱ्यांचं दर्शन यात घडवलं आहे. मोजक्या घटना-प्रसंगांच्या व व्यक्तिनुरूप भाषिक अभिव्यक्तीच्या फटकाऱ्यांनी रेखाटलेली ही व्यक्तिचित्रं वाचकाच्या मनाचा ठाव घेतात. यात जसं माणसांचं दु:ख, वेदना, त्यांची जगण्याची धडपड, परिस्थितीनं होणारी होरपळ यांच्या विविध छटांचं दर्शन घडतं, तसाच माणसांचा बेरकीपणा, इरसालपणा, परिस्थितीपोटी आलेला खोटेपणा यांचाही प्रत्यय येतो.

लेखकाच्या, सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोणामुळे, पुस्तक वाचून संपलं, तरी ही माणसं वाचकाच्या मनात रेंगाळत राहतात....

**१५०रु.**
**पोस्टेज : २५रु.**

## एकोणिसावी जात




श्री. महादेव मोरे यांची ही अत्यंत लोकप्रिय ठरलेली ग्रामीण कादंबरी.


अठरापगड जातींच्या पंक्तीत 'मोटार लायनी'तल्या माणसांची आगळी एकोणिसावी जात बसवून, लेखकानं एक वेगळंच जग साऱ्या तपशिलांनिशी वाचकांसमोर उभं केलं आहे. मुळात हे धगधगीत जीवनानुभवांचं चित्रण आहे.

अनुभव घेण्यातील उत्स्फूर्तपणा, रोमॅन्टिक वृत्ती, अभिव्यक्तीतील ताजेपणा आणि अत्यंत ओघवती, चित्रदर्शी शैली यांमुळे या कादंबरीतील वास्तव काळजाला भिडतं ....

**१२०रु.**
**पोस्टेज : २५रु.**



## ईगीन




'ईगीन' या कथा संग्रहातील कथा समाजातील तळागाळातील लोकांचे जीवन अधोरेखित करतात. काही गंभीर, तर काही गंमतीदार अशा या कथा आहेत. दलित-पददलितांचे, कष्टकऱ्यांचे एक विशाल जग आहे, या जगातील लोकांच्या हर्ष-खेदाच्या, व्यथा-विवंचनांच्या ह्या कथा आहेत. विषय वैविध्य हे ह्या कथांचे वैशिष्ट्य आहे. रानामाळात मजुरांसह घाम गाळणे, मोटार वर्कशॉपमध्ये काम करणे, टॅक्सी ड्रायव्हींग करणे, पिठाच्या गिरणीत राबणे आदी विविध कष्टाची कामे करीत आयुष्य घालविलेल्या लेखकाला आपल्या खडतर जीवनप्रवाहात जी कथाबिजं हाती लागली ती पूर्ण नजाकतीसह त्याने इथे फुलविलेली आढळतात. वाचनीयतेच्या अंगाने जाणाऱ्या ह्या कथा केवळ रंजकच नाहीत तर त्यापलीकडे जाऊन त्या आपला सकस व दर्जेदारपणाही सिद्ध करतात. वाचकाला गुंगविणाऱ्या, विचार करायला लावणाऱ्या व काही वेळा त्याच्या गालांवर स्मित हास्याची रेषा फुलविणाऱ्या ह्या कथांनी मराठी कथेचे दालन समृद्ध केले आहे. मराठी सीमा भागातील मातीचा गंध घेऊन आलेली खास भाषा व तीतून उमटलेली ठसठशीत व्यक्तिचित्रे हेही ह्या कथांचे सामर्थ्य आहे. उपमा, अलंकार, प्रतिमा आदींच्या जंजाळात न अडकता साध्या, सरळ व प्रवाही निवेदन शैलीने वाचकाला शेवटपर्यंत बांधून ठेवण्याचे लेखकाचे कसबही दाद देण्यासारखे आहे.

**१५०रु. पोस्टेज : २५रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

## वि. स. खांडेकर राज्य पुरस्कार २००७ विजेती दर्जेदार साहित्यकृती..




### कॉलेज

**डॉ. छाया महाजन**

महाविद्यालयीन वातावरणातील मूल्यहीनतेचा सर्वंकष वेध घेणारी सामर्थ्यशाली कादंबरी

**२००रु. पोस्टेज : २५रु.**

---

## नुकताच महाराष्ट्र फाऊंडेशन विशेष साहित्य पुरस्कार मिळालेले आत्मकथन...




### खाली जमीन वर आकाश

**डॉ.सुनीलकुमार लवटे**

'नेम नॉट नोन' पासून 'वेलनोन' पर्यंतचा संघर्ष कथन करणारे, अनेक प्रतिष्ठाप्राप्त पुरस्कार मिळालेले डॉ.सुनीलकुमार लवटे यांचे गाजणारे आत्मकथन

**१५०रु. पोस्टेज : २५रु.**



## पुरस्कार

*** राज्य सरकारचे साहित्य पुरस्कार वर्ष २००६ - २००७**

| **पुरस्कार** | **पुस्तकाचे नाव** | **लेखक** |
|---|---|---|
| **काव्य** | | |
| केशवसुत पुरस्कार | पाढा | केशव सखाराम देशमुख |
| बालकवी पुरस्कार | गावाच्या आकाभोवती | प्रकाश किनगावकर |
| बहिणाबाई पुरस्कार | स्वधा | रंजन कंधारकर |
| **नाटक** | | |
| गडकरी पुरस्कार | सावल्या | चेतन दातार |
| किर्लोस्कर पुरस्कार | ...आणि मकरंद राजाध्यक्ष | अरविंद औंधे |
| **कादंबरी** | | |
| वि.वा.शिरवाडकर | अधांतर | महेंद्र सुके |
| ह. ना.आपटे पुरस्कार | त्रैराशिक | राजेंद्र बनहट्टी |
| वि. स.खांडेकर | कॉलेज | डॉ. छाया महाजन |
| साठे पुरस्कार | रहबर | रफिक सूरज |
| उद्धव शेळके पुरस्कार | यू कॅन ऑल्सो विन | महेश केळुस्कर |
| **कथा** | | |
| दिवाकर कृष्ण | परिघाबाहेर | उषा तांबे |
| पु.भा.भावे | ओल हरवलेली माती | नीरजा |
| ग. ल. ठोकळ | तुंबण | अर्जुन व्हटकर |
| बी. रघुनाथ पुरस्कार | आभाळ फाटलं तेव्हाची गोष्ट | चंद्रकुमार नलगे |
| **ललित गद्य** | | |
| अनंत काणेकर | ग्रीकांजली | मीना प्रभु |
| वि.द. घाटे पुरस्कार | नि:शब्द झुंज | रेणू गावस्कर |
| ताराबाई शिंदे | प्रार्थनेची घंटा | अशोक कोतवाल |
| मधुकर केचे | उन्हातलं चांदणं | जयंत पाटील |

**चरित्र, आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| लक्ष्मीबाई टिळक | तोच मी | प्रभाकर पणशीकर |
| न. चिं. केळकर | मूठभर माती | जर्नादन वाघमारे |
| धनंजय कीर | रातवा | चंद्रकुमार नलगे |

**समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| श्री. के. क्षीरसागर | ज्ञानेश्वरीचा काव्यबंध | डॉ.म.सु.पाटील |
| कुरुंदकर पुरस्कार | विनोद: तत्व आणि स्वरुप | डॉ. गो.मा.पवार |
| कुसुमावती देशपांडे | दलित कादंबरी: स्वरुप व समीक्षा | डॉ. नंदा मेश्राम |
| वा. ल. कुलकर्णी | अर्वाचीन मराठी कवयित्री | डॉ.अलका चिडगोपकर |

**इतिहास- अर्थशास्त्र- राज्यशास्त्र- समाजशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| म. ज्योतिराव फुले | लोकमान्य ते महात्मा खंड १ व २ | डॉ. सदानंद मोरे |
| डॉ. आंबेडकर | उत्तर कोकण दलित मुक्ती चळवळ परिवर्तनाचे संदर्भ १९००-१९६० | आत्माराम काळीजकर |

**तत्त्वज्ञान मानसशास्त्र आणि शिक्षणशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| नाना पाटील | इतिहासाचे साक्षीदार | मुकुंद कुळे |
| भाऊराव पाटील | मुख्याध्यापक आणि शालेय व्यवस्थापन, यशस्वी व्हायचंय मला | डॉ. लक्ष्मण महामने व श्री. प्रकाश सस्तेपाटील |
| यशवंतराव चव्हाण | शोध! अलौकिक विचारांचा नवनिर्मितीचा, समर्थाचा व्यवस्थापन बोध | डॉ.प.म.आलेगावकर व डॉ.संजय कप्तान |
| बॅ. नाथ पै | श्री गुरु ग्रंथसाहिब-एक अवलोकन | दिलीप गोगटे |

**भाषाशास्त्र व व्याकरण**

| | | |
|---|---|---|
| ना. गो. कालेलकर | शब्दनर त्रैभाषिक | सत्वशीला विठ्ठल सामंत |
| दादोबा पांडुरंग | कवितेची शैली | डॉ. महेंद्र सुदाम कदम |
| ना. गो. नांदापूरकर | मराठीशब्दलेखनकोश | प्रा. यास्मिन शेख |



**एकांकिका**

| | | |
|---|---|---|
| जयवंत दळवी | आज अचानक | डॉ. प्रमोद संभूस |

**विनोद**

| | | |
|---|---|---|
| कोल्हटकर/आचार्य अत्रे | बिननावाचा माणूस | अवधूत परळकर |
| दत्तू बांदेकर | नवलाई | सुधीर सुखटणकर |

**ललित विज्ञान**

| | | |
|---|---|---|
| र.धो. कर्वे | झिरो स्पेस क्राफ्ट | धर्मराज माहूलकर |
| संत तुकडोजी महाराज | ऑर्गन फॉर्मिंग | श्रीकांत वर्तक |

**संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| भाई बागल | सखा नागझिरा | किरण पुरंदरे |
| कृष्णराव भालेकर | भारतीय जलसंस्कृती : स्वरुप आणि व्याप्ती | डॉ. रा. श्री. मोरवंचीकर |

**क्रीडाशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| राजर्षी शाहू महाराज | किस्से धोनीचे | संजीव पाध्ये |

**अनुवादित**

| | | |
|---|---|---|
| लक्ष्मणशास्त्री जोशी | अनंतमूर्ती यांच्या कथा | उमा कुलकर्णी |
| वा. रा. कांत | बहिष्कृत भारत | विद्याधर दाते |

**संपादित**

| | | |
|---|---|---|
| डॉ.व्ही.बी.कोलते | अंतरिक्ष फिरला पण | श्याम माधव धोंड द. भि. कुलकर्णी |

**आधारित**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेमहाराज | मनोवांच्छित संपत्ती | हिंमतदादा मोरे |

**संशोधन**

| | | |
|---|---|---|
| ग. त्र्यं. माडखोलकर | स्वातंत्र्योत्तर सामाजिक नाट्यसृष्टी | डॉ.श्रीकांत श्रीपती पाटील |

**ललितकला आस्वादपर लेखन**

| | | |
|---|---|---|
| पु. ल. देशपांडे | आदिवासी नाटक | डॉ. रमेश कुबल |

**शेती व शेतीपूरक लेखन**

| | | |
|---|---|---|
| वसंतराव नाईक | शेती शेतीपूरक लेखन | ना. धों. महानोर |

**दलित, पददलित साहित्य**

| | | |
|---|---|---|
| अण्णाभाऊ साठे | पालातील माणसे | विमल दादासाहेब मोरे |

**संगणक, इंटरनेट, पर्यावरण व संरक्षणशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| रँग्लर परांजपे | सायबर झंझावात | दीपक शिकारपूर |

**बृहन्महाराष्ट्र पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| वि. रा. शिंदे | गर्भनाळ-कादंबरी | रोहिणी कुलकर्णी |
| सयाजी गायकवाड | स्वत:तील अवकाश | ज्ञानेश्वर मुळे |

**बालवाङ्मय नाटक**

| | | |
|---|---|---|
| राम गणेश गडकरी | चिंट्या द ग्रेट | डॉ. गणेशकुमार वडोदकर |
| शाहीर अमरशेख | आई तुझं लेकरु | सय्यद अल्लाउद्दिन |

**बालवाङ्मय कादंबरी**

| | | |
|---|---|---|
| गोपीनाथ तळवलकर | छोटा कमांडो | अशोक कोळी |

**बालवाङ्मय छोट्या गोष्टी**

| | | |
|---|---|---|
| सानेगुरुजी | किल्ले शास्त्रज्ञांचे | संजय पाठक |

**बालवाङ्मय लोककथा**

| | | |
|---|---|---|
| ना. धो. ताम्हणकर | खरा निवाडा | प्रतिमा इंगोले |

**बालवाङ्मय एकांकिका**

| | | |
|---|---|---|
| वा. गो. आपटे | दोन बाल एकांकिका | चंद्रकांत भोसले |

**बालवाङ्मय चरित्रे**

| | | |
|---|---|---|
| वि. को. ओक | राजर्षि शाहूंच्या स्फूर्तिकथा | राजेंद्र घाडगे |
| ग. ह. पाटील | कथा ज्ञानदेवांची | वसू भारद्वाज |

**बालवाङ्मय ललित गद्य**

| | | |
|---|---|---|
| ना. वा. टिळक | गमतीदार झंपेराव | निर्मला मठपती |

**बालवाङ्मय सर्वसामान्यज्ञान छंद व शास्त्रे**

| | | |
|---|---|---|
| यदुनाथ थत्ते | कागदाची करामत | माधव खरे |
| राजा केळकर (विभागून) | जगावेगळे छांदिष्ट | श्रीकांत कुलकर्णी |

**बालवाङ्मय परीकथा**

| | | |
|---|---|---|
| कवी दत्त | बोरंवाली बाई | प्रतिमा इंगोले |



## * निशिकांत ठकार यांना अनुवादाचा एक लाखाचा पुरस्कार

ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक प्रा. निशिकांत ठकार यांना केंद्रिय हिंदी संचालनालयाच्या वतीने एक लाख रुपयांचा अनुवाद पुरस्कार जाहीर झाला आहे. दलित लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या 'उपल्या'या कादंबरीच्या 'नरवानर'या हिंदी अनुवादाबद्दल हा पुरस्कार मिळाला आहे.

दिल्लीच्या राधाकृष्ण प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. हिंदीशिवाय अन्य भाषेत लेखन करणाऱ्या आणि हिंदीत अनुवादाचे काम करणाऱ्या अनुवादक-लेखकांना मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे हा पुरस्कार देण्यात येतो.

प्रा. निशिकांत ठकार म्हणाले, ''निरपेक्षपणे माझे हे हिंदी अनुवादाचे काम सुरू आहे. त्याची दखल घेतली गेली याचे समाधान आहे. या पुरस्कारामुळे काम करायला आणखी उत्साह आला आहे.''

## * डॉ. यशवंत गुप्ता यांना शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार

पुणे येथील 'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ अॅस्ट्रोफिजिक्स' (एनसीआरए) या संस्थेतील वरिष्ठ संशोधक डॉ. यशवंत गुप्ता यांना विज्ञान संशोधनासाठी शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर झाला आहे.

खोडद येथील महाकाय दुर्बीण प्रकल्प उभारणीत (जीएमआरटी) त्यांचे योगदान आहे. त्यांनी केलेल्या 'पल्सार'च्या संशोधनाचा फायदा खोडद येथील दुर्बीण उभारताना झाला आहे. अमेरिका, फ्रान्स जर्मनी, जपान या सुमारे सहा डझनभर देशांना त्यांच्या संशोधनातून या क्षेत्रात मोठे काम करणे शक्य झाले आहे. डॉ. गुप्ता सध्या खोडद येथे मुख्य संशोधन म्हणून काम पाहत आहेत. डॉ. गुप्ता यांच्यामुळे तब्बल १४ वर्षांनंतर 'एनसीआरए'ला या पुरस्काराचा मान मिळाला आहे.

'या पुरस्काराने माझाच नव्हे, तर 'एनसीआरए'चा सन्मान झाला आहे. खोडद येथे आम्ही करीत असलेले काम मुख्यत: प्रयोगात्मक आहे. त्याची दखल निवड समितीने घेतल्याने मनापासून आनंद वाटला.' असे ते म्हणाले.

## * प्रा. रंगनाथ तिवारी यांना 'भाषाभारती' पुरस्कार

प्रसिद्ध साहित्यिक प्रा. रंगनाथ तिवारी यांना 'सेंट्रल इन्स्यिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस' तर्फे 'भाषाभारती' पुरस्कार (२००४-०५) जाहीर झाला आहे. ता.२५ऑक्टोबर रोजी म्हैसूर येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठी लेखन करणाऱ्या अमराठी लेखकाला हा पुरस्कार दिला जातो. त्यांच्या 'बेगम

समरू' या कादंबरीची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. 'बिढार' या भालचंद्र नेमाडे लिखित कादंबरीचे हिंदीत भाषांतर केल्याबद्दल त्यांना 'हिंदीतर भाषी हिंदी लेखक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### * साधना आमटे यांना 'चतुरंग' चा 'जीवनगौरव' पुरस्कार

बाबा आमटे यांच्या खांद्याला खांदा लावून 'आनंदवन' साकारणाऱ्या, कित्येक कुष्ठरुग्णांना पुनर्जन्म देणाऱ्या साधना आमटे यांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन चतुरंग प्रतिष्ठानने त्यांची या वर्षीच्या 'जीवनगौरव' पुरस्कारासाठी निवड केली आहे. प्रतिष्ठानकडून दिला जाणारा हा १७ वा पुरस्कार असून, एक लाख रुपये रोख, सन्मचिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डिसेंबर अखेरीस मुंबईत होणाऱ्या रंगसंमेलनात हा पुरस्कार देण्यात येईल.

डॉ. अरुण टिकेकर, डॉ. नरेंद्र जाधव, विजय कुवळेकर, विनय सहस्त्रबुद्धे, अविनाश धर्माधिकारी, रवींद्र पिंगे, प्रफुल्ला डहाणूकर हे निवड समितीवर होते.

### * य. दि. फडके यांना 'नाथ पै' पुरस्कार

ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक य. दि. फडके यांना बॅरिस्टर नाथ पै सेवांगणांच्या वतीने दिला जाणारा बॅरिस्टर नाथ पै साहित्यिक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्काराचे वितरण श्री. फडके यांच्या सोयीनुसार मुंबई येथे करण्यात येणार आहे. य. दि. फडके यांनी आधुनिक काळातील साहित्यनिर्मितीची मीमांसा केली आहे. त्याचबरोबर भारतीय घटनेच्या वाटचालीवर लेखन केले आहे. 'भारतीय घटनेची ५० वर्षे' हा त्यांचा टीकात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहे.

### * चित्तरंजन कोल्हटकर यांना पहिला 'जयवंत पुरस्कार'

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने जयंतराव टिळक स्मृतीनिमित्त या वर्षीपासून 'जयवंत पुरस्कार' दिला जाणार आहे. ज्येष्ठ रंगकर्मी चित्तरंजन कोल्हटकर या पुरस्काराचे पहिले मानकरी आहेत. २५ हजार रुपये रोख आणि जयवंतराव टिळक यांची प्रतिमा, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ५ नोव्हेंबर रोजी टिळक स्मारक मंदिर येथे डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले.

मराठी रंगभूमीशी प्रदीर्घ काळ संबंधित असणाऱ्या आणि सातत्याने ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी नाट्यलेखन, दिग्दर्शन, अभिनय, नाट्यनिर्मिती, नेपथ्य, संगीत आणि प्रकाश योजना असे मराठी रंगभूमीशी संबंधित कार्यक्षेत्र



असणारी व्यक्ती, असे या पुरस्काराचे निकष असल्याचे डॉ. टिळक म्हणाले.

### * केळकर पुरस्कारांचे वितरण

''मराठी माणूस मातृभाषेबाबत आत्मसमाधानी राहिला; तर आपली भाषा फक्त पाच-सहा पिढ्याच टिकेल. हे टाळायचे असेल तर मराठीला जाणीवपूर्वक सक्षम केले पाहिजे,'' असे मत साहित्य संमेलनाध्यक्ष अरुण साधू यांनी व्यक्त केले.

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे दिल्या जाणाऱ्या 'न. चिं. केळकर पुरस्कार' चे वितरण प्रा. साधू यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध कांदबरीकर विश्वास पाटील, कवीगीतकार जगदीश खेबुडकर, सूर्यकांत कुलकर्णी आणि विनीता ऐनापुरे यांना पुरस्कार देण्यात आले. व्यासपीठावर ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश फडके, कार्याध्यक्ष चारुदत्त निमकर, कार्यवाह मुकुंद अनगळ आदी होते. पाच हजार रुपये आणि मानचिन्ह असे पुरस्कारांचे स्वरूप होते.

प्रा. साधू म्हणाले, ''जागतिकीकरणात मराठीला टिकून राहायचे; तर भाषेत नव्याने येणारे शब्द तिने रिचवले पाहिजेत. संगणकासाठी मराठी आज्ञावली तयार करून ज्ञानाची मक्तेदारी मोडून काढली पाहिजे. त्यानेच संगणक सर्वांपर्यंत पोहोचू शकेल. जागतिकीकरणाच्या धबडग्यात अन्य भाषांचे काय होतेय, हेसुद्धा मराठीजनांनी पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी राज्यातील ग्रंथालयांकडे जो अवाढव्य संग्रह आहे, त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. थिल्लर आणि सवंग विषयात पीएच. डी. करण्याऐवजी विद्यार्थी आणि त्यांचे प्राध्यापक अशा ग्रंथालयांचा उपयोग का करून घेत नाहीत? मराठी माणसात स्पर्धेसाठी आवश्यक असलेले 'किलर इन्स्टिंक्ट' नाही.'' विश्वास पाटील म्हणाले, 'माझे ऐतिहासिक लेखन हा अपघात होता. माझा पिंड हा 'झाडाझडती'चाच आहे. तूर्त मी लेखनास अर्धविराम दिला असता, तरी तो काही काळापुरताच आहे.'

### * कलाम यांना 'किंग चार्लस्' पदक प्रदान

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना प्रतिष्ठेचे मानले जाणारे 'किंग चार्लस' पदक प्रदान करण्यास आले. भारतात विज्ञानाचा प्रसार आणि सार्वत्रिकीकरणाबाबत बजावलेल्या लक्षणीय कामगिरीबद्दल २३ ऑक्टोबर रोजी लंडन येथे नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या सुमारे ६० शास्त्रज्ञांची कर्मभूमी असलेल्या 'रॉयल सोसायटी' तर्फे कलाम हा सन्मान करण्यात आला. सोसायटीचे अध्यक्ष लॉर्ड रीस यांच्या हस्ते त्यांना पदक प्रदान करण्यात आले. या वेळी सुप्रसिद्ध उद्योगपती लॉर्ड स्वराज पॉल, लॉर्ड मेघनाद देसाई, लॉर्ड करण बिलिमोरिया,

भारताचे इंग्लंडमधील कार्यकारी उच्चायुक्त अशोक मुखर्जी आदी मंडळी उपस्थित होती. जपानचे सम्राट अकिहितो यांच्यानंतर हा पुरस्कार मिळवणारे डॉ. कलाम हे दुसरे 'नेते' आहेत. भारताचे 'ऊर्जा स्वातंत्र्य' आणि 'माहितीचे जागतिक व्यासपीठ' या दोन महत्त्वपूर्ण प्रकल्पांवर आपण सध्या काम करीत असल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली.

*** फ्रेंच व जर्मन शास्त्रज्ञांना भौतिकशास्त्रातील 'नोबेल'**

माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील डिस्कसंदर्भातील संशोधनाबद्दल फ्रेंच व जर्मन शास्त्रज्ञांना भौतिकशास्त्रातील 'नोबेल' पुरस्काराने गौरविण्यात आले. फ्रान्सचे अल्बर्ट फर्ट व जर्मनीचे पीटर ग्रुएनबर्ग यांनी 'महाकाय गुरुत्वरोधा'मागील (जायंट मॅग्नेटोरेझिस्टन्स- जीएमआर) तत्त्व शोधून काढल्याबद्दल त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला. या तत्त्वामुळे नॅनो तंत्रज्ञानाचा व्यवहारात प्रत्यक्ष वापर करण्याची शक्यता निर्माण झाली आहे, असे रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसने आपल्या मानपत्रात म्हटले आहे. जीएमआर यंत्रणेतील सूक्ष्म गुरुत्वीय बदलांमुळे विजेच्या अवरोधावर प्रचंड परिणाम होतो आणि 'एक' आणि 'शून्य' स्वरूपात हार्ड डिस्कमधील साठविलेली माहिती वाचणाऱ्या स्कॅनरमध्ये बदल घडून येतो.

*** लघुपटास इंटरनॅशनल ज्यूरी ॲवॉर्ड**


पुणेकर चित्रपट दिग्दर्शक वीरेंद्र वळसंगकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'द अन्फोल्डिंग व्हाईट' या लघुपटाला स्लोव्हाकिया येथील 'इकोटॉप फिल्म फेस्टिव्हल'मध्ये 'इंटरनॅशनल ज्यूरी ॲवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले आहे.

हा लघुपट बारा मिनिटांचा असून, 'इको फ्रेंडली' वास्तुरचनांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या शिरीष बेरी यांचे कार्य आणि त्यामागील त्यांची विचारधारा त्यात चित्रित करण्यात आली आहे. लघुपटात बेरी यांनी जगभरात विविध ठिकाणी केलेल्या पर्यावरणपूरक वास्तुरचनांचा मागोवा घेतला आहे. लघुपटाचे संकलन आणि दिग्दर्शन वीरेंद्र वळसंगकर यांचे आहे. 'पर्यावरण आणि शाश्वत विकास'या संकल्पनेवर आधारित स्लोव्हाकियात झालेला हा ३४ वा महोत्सव आहे. महोत्सवासाठी २६ देशांतील सुमारे शंभर फिल्म्स आल्या होत्या.

❒



## वाचकांचा प्रतिसाद




**दक्षिणायन**

केप हॉर्न ते कॅरिबियन

डॉ. रणजित मिरजे.

**२५०रु. पोस्टेज : २५रु.**

**य**थार्थ शीर्षक असलेले हे प्रवासवर्णन मराठी ललित वाङ्मयात एक अभिजात कलाकृती म्हणून मान्यता पावल्याशिवाय राहणार नाही.

**- दै. पुढारी**

**मा**झे एक स्नेही कौतुकाने सांगत होते की, आम्ही ऊटी कोडाईकॅनॉल फिरून आलो आहोत, म्हणून जेव्हा मी त्यांना सुनावले ''आम्ही तर दक्षिण अमेरिका फिरून आलो आहोत.'' अर्थात आपल्या दक्षिणायनच्या माध्यमातून. **- सु. म. भावसार, नंदुरबार**

**पु.ल.**नंतर इतके सुरेख प्रवासवर्णन वाचनात आले नव्हते.

**- अंबादास टाकेकर, निफाड**

**व**र्डस्वर्थने म्हटले होते, ''निसर्ग कवीचे घरटे आहे.'' पण दक्षिणायनच्या वाचनानंतर ते ललित लेखकाचेही आहे असे वाटू लागले आहे.

**- द्वारकाभाई पटेल, औरंगाबाद**

मा. संपादक,

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा दिवाळी अंक संपूर्ण वाचून काढला. अंक सर्वोत्कृष्ट झाला आहे. विषयांची विविधता, साहित्य-संस्कृती, जीवनविषयक मूलभूत धारणा, विचार, त्यांना विशिष्ट उंचीवर नेऊन केलेले प्रकट चिंतन, बुजुर्गाविषयींचा आदरभाव यांना प्राधान्य देऊन विद्वान विचारवंतांनी आपले चिंतनच रसिकांपर्यंत पोचवले आहे. एवढा प्रगल्भ, परिपक्व, विचार संपन्न दृष्टिकोन ठेवून बहुतांशी दिवाळी अंक काढताना ठेवला जातोच असे नाही. अंकाची सुरुवात दभिंच्या खुसखुशीत लेखाने झाली आहे. पुढे रंगत वाढतच गेली आहे.

**माधव पिटके, सातारा**


T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादीत पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

**टी बुक क्लब १६**
**सभासद फी ५०रु.**

**सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा !**
**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक**

**टी बुक क्लब १६ मधून प्रकाशित पुस्तके**

| | | | |
|---|---|---|---|
| टू सर विथ लव्ह | ई. आर. ब्रेथवेट | अनु. लीना सोहोनी | १५० |
| अलाइव्ह | पिअर्स पॉल रीड | अनु. अशोक पाथरकर | १५० |
| मी सायूरी | आर्थर गोल्डन | अनु. सुनंदा अमरापूरकर | ४०० |
| (Memoirs of a Geisha) | | | |

**आगामी -**

| | | |
|---|---|---|
| द टेस्टामेंट | जॉन ग्रिशॅम | अनु. विश्वनाथ केळकर |
| पपेट ऑन अ चेन | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. माधव कर्वे |
| बॉर्न कन्फ्युज्ड | तनुजा देसाई | अनु. सुधा नरवणे |







*** प्रमोद नवलकर**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, फर्डे वक्ते, सव्यसाची पत्रकार, माजी मंत्री व आमदार प्रमोद नवलकर यांचे २० नोव्हेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात अभिनेत्री शिल्पा नवलकर यांच्यासह दोन कन्या, जावई, नातू असा परिवार आहे.

प्रमोद सच्चिदानंद नवलकर यांचा जन्म २३ जानेवारी १९३५ रोजी मुंबईत झाला. रुपारेल महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी संपादन केलेल्या नवलकर यांना तरुणपणापासून लेखनाची आवड होती. वयाच्या १८व्या वर्षापासून त्यांनी 'नवशक्ति' दैनिकातून 'भटक्याची भ्रमंती' हे स्तंभलेखन सुरू केले. रात्रीच्या मुंबईचे वास्तव, विदारक आणि तितकेच धक्कादायक चित्रण नवलकर यांनी आपल्या लेखणीतून साकार केले. त्यामुळे सत्ताधारी काँग्रेस पक्षातील अनेक नेतेही नवलकर यांचा राजकीय उदय होण्यापासून त्यांचे फॅन झाले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रभावित झालेल्या नवकलकर यांनी प्रजा समाजवादी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर 'मार्मिक'मधून 'बोरीबंदरचा बेरड'या नावाने स्तंभलेखन सुरू केले.

मुंबई, मुंबईकर, मुंबईतील माणसांच्या तऱ्हा, जुन्या मुंबईतील वैशिष्ट्ये लोप पावणे हेच नवलकर यांच्या लेखनाचे केंद्रस्थान ठरले असले तरी गिरगावकर असल्याचा त्यांना अभिमान होता. दादरकर मनोहर जोशी यांच्याशी त्यांची 'गिरगावकर विरुद्ध दादरकर' म्हणून होणारी शाब्दिक जुगलबंदी नेहमीच रसिकांना पर्वणीच ठरायची.

युतीचे सरकार असताना नवलकर यांनी परिवहन, सांस्कृतिक कार्य, बंदरे, राजशिष्टाचार, दारुबंदी प्रचार कार्य, माहिती व जनसंपर्क यांसारख्या खात्यांचा कार्यभार सांभाळला होता. शिवसेनेच्या यंदाच्या दसरा मेळाव्याला नवलकर उपस्थित राहिले व त्यांनी भाषणही केले. यावेळी माझ्याकडे आता कोणतेही पद नाही. परंतु शिवसैनिक हे माझे पद कोणीही हिरावून घेऊ शकरणार नाही, अशा शब्दांत त्यांनी शिवसैनिकांची उमेद वाढविली होती. शिवसैनिकपदावर असतानाच नवलकर यांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली आणि भटक्याची भ्रमंती थांबली. ❐

# बालनगरी

अनुक्रमणिका

**शंकराचे वाहन** ९९



## शंकराचे वाहन



गोष्ट खूप जुन्या काळातली आहे. त्यावेळी भगवान शंकराकडे वाहनच नव्हतें. ते पायीच जंगलातून पर्वतावरून हिंडत असत.

एक दिवस पार्वती त्यांना म्हणाली, ''आपण तर सर्व जगाचे स्वामी! अशी पायी यात्रा करणं आपल्याला शोभतं का?''

शंकर हसून म्हणाले, ''मी तर भटक बैरागी आहे. बैरागी कधी वाहनातून हिंडतो का? मला वाहन कशाला हवं?''

पार्वती म्हणाली, ''तुम्ही सर्वांगावर भस्म फासून, केसांच्या जटा मस्तकावर बांधून, काट्या-कुट्यांच्या रस्त्यानं अनवाणी हिंडता ते पाहून मला फार वाईट वाटतं.''

शंकरांनी हरप्रकारे पटवून देण्याचा प्रयत्न केला की मला वाहनाची गरज नाही. पण पार्वती आपल्या मतावर ठाम होती. कुठल्याही सुखसोयी नसलेल्या त्या जंगलात राहायला पार्वती तयार होती; पण शंकराला वाहन हवंच असा तिचा हट्ट होता.

आता मात्र शंकर चिंतीत झाले.

वाहन कसं मिळवायचं हे विचारण्यासाठी त्यांनी सर्व देवदेवतांना बोलवायचे ठरवले. नारद मुनींबरोबर तसा निरोप पाठवला.

सर्व देवदेवतांना काळजी वाटू लागली. 'शंकरांनी आपलंच वाहन मागितलं तर?' मग काही ना काही सबब काढून ते येणं टाळू लागले. आपापल्या महालातच बसून राहिले.

हे सर्व पाहून पार्वती उदास झाली.शंकरांनी मग जंगलातील प्राण्यांना बोलावणे पाठवले.

जंगलातून सर्व प्राणी भराभर गोळा झाले.

शंकरांनी त्यांना सांगितले. ''तुमची माता पार्वती मला आग्रह करत आहे की मी वाहनातून फिरावं. बोला, तुमच्यापैकी कोण माझं वाहन होण्यास तयार आहे?''

शंकरांनी आपल्याला एवढा मान दिलेला पाहून प्राणी खूप आनंदित झाले.

छोटा ससा टुणटुण उड्या मारत म्हणाला, ''देवा, मला तुमचं वाहन बनवा. माझी पाठ बघा कशी छान





मऊ-मुलायम आहे! तुम्हाला बसायला किती छान वाटेल. शिवाय मी एकदम भरभर पळू शकतो.''

तितक्याच सिंहाने गर्जना केली, ''मूर्ख सशा, मी इथे असताना तुझी पुढे येण्याची हिंमतच कशी झाली? हो माग.''

ससा बिचारा हिरमुसून मागे गेला आणि कोपऱ्यात जाऊन बसला. ''हे देवा, मी जंगलचा राजा आहे. सर्वात शक्तिमान आहे. मलाच तुमचं वाहन बनवा.''

तेवढ्यात हत्ती पुढे झाला.

'' मी सोडून कोणीच या कामाला लायक नाही. माझ्या उंचीमुळे जंगलात फिरताना तुम्हाला त्रास होणार नाही. शिवाय उन्हाळ्याच्या दिवसात मी सोंडेत पाणी भरून तुमच्यावर फवारा सोडीन आणि तुम्हाला छान आंघोळ घालेन.''

जंगली डुक्करही मागे राहिले नाही. मान हलवत म्हणाले, ''शंकरदेवा, मलाच तुमचं वाहन बनवा. मी अगदी उत्तमप्रकारे तुमचं वाहन म्हणून काम करीन. आणि मी वचन देतो, मी अगदी स्वच्छ आणि नीटनेटका राहीन.'' आणि ते अंगावरचा चिखल साफ .करू लागले. कस्तुरीमृग नाकावर हात ठेवत म्हणाले, ''शीऽकिती घाण येतेय, चल पळ तू इथून! शिवजी माझ्या पाठीवर बसतील.''



यापकारे सर्वच प्राणी भगवान शंकरांचे वाहन बनण्यास आपणच कसे योग्य हे सांगू लागले.

शेवटी शंकराने सर्वांना शांत केले आणि म्हटले,'' काही दिवसांनी मी तुम्हा सर्वांकडे एक वस्तू मागेन. जो ती वस्तू माझ्यासाठी आणेल तो माझ वाहन बनेल.''

त्या सर्व प्राण्यांमध्ये नंदीबैलही होता. त्याने मनातल्या





मनात निश्चय केला की आपणच शंकराचं वाहन व्हायचे.

त्याला एक युक्ती सुचली. त्या दिवसापासून तो लपून-छपून शंकर-पार्वतीचे बोलणे ऐकू लागला. तहान-भूकेची पर्वा न करता आजूबाजूला लपून राहू लागला

अखेरीस एक दिवस त्याला पत्ता लागला. भगवान शंकर पार्वतीशी बोलताना म्हणाले, 'ऐन पावसाळ्यात प्राण्यांकडे कोरड्या लाकडांची मागणी करणार आहे.'

नंदीबैलाने जंगलभर फिरून चांगली लाकडं गोळा केली आपल्या गुहेत नीट ठेवून दिली.

मग तो निश्चिंत झाला.

पावसाळा सुरू झाला. सगळे जंगल पाण्याने चिंब भिजलं. एक कणही कोरडी जागा उरली नाही एके दिवशी सर्वांना बोलावून आपली कोरड्या लाकडांची मागणी सर्वांपुढे ठेवली.''या ऋतूत कोरडी लाकडं?'' सर्व प्राणी टकमक एकमेकांकडे पाहू लागले. नंदीबैल मात्र ऐटीत गुहेत गेला



आणि लाकडांची मोळी घेऊन आला.


भगवान शंकर प्रसन्न झाले. त्यांना कळले लपून छपून नंदीबैलाने आपले बोलणे ऐकले आहे परंतु त्याच्या चतुराईवर आणि मेहनतीवर ते खूष झाले. त्यांनी नंदीबैलालाच आपले वाहन बनवले.

सर्व प्राणी शंकर पार्वतीचा जयजयकार करत परत गेले.

**(सौ. रश्मी खानवेलकर)**



## ठिपके जोडून चित्र तयार करा



# वाचलेच पाहिजे असे काही...




## ६००० खिस्तपूर्व

माणूस प्रथम टोळ्या बनवून काम खिस्तपूर्व २०,०००च्या सुमारास करू लागला. या टोळ्यातील होते. ही लोकं ऋतू बदलेल तसा व अन्नाच्या शोधात स्थलांतर करीत.

८००० च्या सुमाराला मध्य पूर्वेकडील लोक वृक्ष संवर्धनाची आणि पशुपालनाची कला शिकली अशा प्रकारे शेती व पशुपालन सुरू झाले माणसे एका जागी स्थिर होऊ लागली. 'युफ्रेटस' व टायग्रिस या नद्यांच्या आसपास वस्ती वाढली.







त्यामुळे हा भाग 'सुपीक चंद्रकोर' या नावाने ओळखू जाऊ लागला ! मेसोपोटेमिया देशातला मेसोपोटेमिया याचा अर्थ आहे नद्यांच्या मधील जागा.

या भागात पहिल्यांदा घरं बांधून राहू लागला.

इ.स.पूर्व ६००० च्या सुमाराला नवीन समाजाचा आणि 'सरकार' या संकल्पनेचा उदय झाला!

इ.स.पूर्व ३५००.

**'ब्रॉन्झ' या धातूचा शोध कधी लागला?**

ब्रॉन्झ धातूचा शोध हे माणसाच्या प्रगतीतील एक महत्त्वाचे पाऊल आहे. इजिप्तच्या पिरॅमिड्समध्ये ब्रॉन्झपासून बनवलेली हत्यारे सापडली आहेत. ती इ.स.पूर्व २५०० च्या काळातली होती. पण हा धातू त्याही आधी १००० वर्षांपासून वापरण्यात येत होता.



ब्रॉन्झ हे दोन किंवा अधिक धातूंचे मिश्रण आहे. कित्येक शतके माणूस तांबे शुद्ध स्वरूपात वापरत होता. 'तांबे' व 'कथील' यांचे योगायोगाने मिश्रण होऊन ब्रॉन्झ हा मिश्रधातू तयार झाला.

❐

## फटाफट उत्तरं सांगा.

पुढे दिलेल्या समीकरणात अंकांच्या दरम्यान अधिक (+), उणे (-), गुणिले (x) आणि भागिले (÷) आणि कंसाची चिन्हे लिहून उत्तरे नेमकी १० मिळवा! चला, सुरू करा.

७,५,३,८,४ --१०

## जरा मेंदूला खाऊ....

* दोन मित्रांना एकावेळी चित्रपट पाहायला नेणे परवडेल की एकालाच दोन वेळा चित्रपट पाह्यला नेणे परवडेल? की दोन्ही सारखेच?





'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे मुलांसाठी

# धू म ध डा का

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या सत्यघटना खास **चित्रकथा** रुपात



अमेरिका आणि जपान यांच्यात झालेली 'मिडवेची लढाई' हा दुसऱ्या महायुद्धाचा एक भाग. अमेरिकेला बुद्धी, युद्धकौशल्य आणि अमाप लढाऊ साधने यामुळे मिळालेला जबरदस्त विजय! तर साम्राज्यवादी जपानचा दारुण पराभव

## साम्राज्याचा पाडाव

**मिडवेची लढाई**

अनुवाद - निर्मला मोने



अमेरिका आणि जपान यांच्यात झालेली 'इवो जिमची लढाई' ही दुसऱ्या महायुद्धात इतिहास घडविणारी ठरली. आधुनिक शस्त्रास्त्रे, रणगाडे यांचा अहोरात्र वापर केला गेला. अशा या थरारक लढाईच्या वाक्यागणिक उत्कंठा वाढवणाऱ्या घटना...

## दहशतीचे बेट


**इवो जिमाची लढाई**



अनुवाद - प्रा. प्रसाद बर्वे

# आपल्याला मोहात पाडणारे जाहिरातींचे जग

**कल्पना कुलकर्णी**



सुटीत प्रत्येकाने काही ना काही छंद जोपासायचे, असे सरांनी सांगितले. शिवाय काही वस्तू गोळा करायच्या आणि त्या का आवडतात तेव्हा सांगायचे जास्तीत जास्त वैशिष्ट्यपूर्ण वस्तू कोण जमवतो,'ते सर बघणार होते.




मग काय, मुलांनी वस्तू जमवायचा चंगच बांधला. त्यासाठी मुले कुठेकुठे समुद्रकिनारी, डोंगराच्या पायथ्याला तर कुठे गर्द झाडीत भटकू लागले. वेगवेगळ्या प्रकारचे दगड, वृक्षांची पाने, पुले, चित्रविचित्र प्रकारच्या रबराच्या आणि प्लॅस्टिकच्या वस्तू, भेटपत्रे, काही मातीच्या वस्तू, बूट, आरसे. काय ना काय मुलांनी जमवले होते.



विक्रमला मात्र फार वेगळी आणि भन्नाट





कल्पना सुचली होती. तो टी.व्ही. वरच्या जाहिराती नेहमीच बघत असे. विविध प्रकारच्या टूथपेस्ट, साबण, शाम्पू, मलमं, खेळणी, नूडल्स, चॉकलेटस, बिस्किटे, फर्निचर, कपडे, दागिने एक ना दोन. त्या जाहिरातींची गाणीही त्याला पाठ होती. त्याने अलीबाबाच्या खजिन्यातल्या



चित्रविचित्र वस्तू असाव्यात अशा त्या वस्तू दाखवून तो अगदी चकित करून सोडणार होता.

आणि तो दिवस लवकरच उजाडला.

सर रोज ५-६ मुलांचे संग्रह बघत होते. लाकडाच्या दुर्मिळ वस्तू, कलाकुसर केलेल्या वस्तू बघून ते मुलांना शाबासकी देत होते. विक्रमचा नंबर आला. तेव्हा त्याने आपल्याजवळच्या एक पसरट बास्केट मधून अनेक प्रकारचे



साबण, टूथपेस्ट, काही मलमे , चॉकलेटस् ,सरबते, बिस्कीटं, पेन औषधे काही भपकेबाज घरांची मॉडेल्स आणि सरांना दाखवली. सगळे कसे छान, चकाचक आणि वैशिष्ट्यपूर्ण दिसत होते.

''वा विक्रम, तू तर अगदी नामी कल्पना लढवलीस! ही मॉडेल्सही अगदी कौशल्यपूर्ण तयार केलीस. या तुझ्या कल्पकतेचे आणि कलेचे मी कौतुक करतो.''



साऱ्या मुलांनी टाळया वाजवल्या.

सर पुढे म्हणाले.''विक्रम, आता या सर्व वस्तू तुला का आवडतात हे मी विचारणार नाही. कारण टी.व्ही. च्या साऱ्या ॲडस् तुम्हाला आवडतात हे मला माहित आहे. पण मुलांनो, या सर्व वस्तू बघून किंवा एकूणच सगळया जाहिराती बघताना तुमच्या मनात काही वेगळे विचार येतात का?''

मुले एकदम खूष झाली. जाहिराती बघताना एंजॉय करायचे, त्यांचे शब्द, ओळी पाठ करायच्या एवढेच त्यांना माहित होते. पण यावर वेगळा विचार? खूप कौशल्याने चित्रीत केलेल्या असतात फक्त १-१।। मिनिटात ते किती छान दाखवतात! परवा आमच्या मूल्यशिक्षणाच्या मॅडम म्हणाल्या होत्या की, जाहिरातीत भरपूर पाण्याच्या



शॉवरखाली बायका आंघोळ करताना दाखवतात. आपल्याकडे पाण्याची टंचाई असताना हे शक्य आहे का?

मग इतर मुलांनीही काहीकाही सूचायला लागले,''हो ना सर आपल्या खेड्यांमध्ये किती वाईट अवस्था आहे! कित्येकांना पोटभर खायला मिळत नाही. मग टी.व्ही. वरची ती घरं, पॉश फर्निचर. उंची कपड्यातली माणसं, आकर्षक खेळणी. रंगीबेरंगी मिठाई, दिमाखदार वेगवान वहानं हे सारं बघून त्यांना काय वाटत असेल? असं असू शकतं यावर त्यांचा विश्वास बसत नसेल.''

या जाहिराती फसव्या असतात आपल्याला परवडणाऱ्या आणि खरोखरच दर्जेदार असलेल्या, शिवाय आपल्याला त्याचा खरोखर उपयोग आहे का याचा विचार करणार ना तू?



सरांनी सांगतलेले विचार मंदाला खरंच पटले होते.

''हो सर, मी तर विचार करून निर्णय घेईनच. पण इतरांनाही सांगेन आणि ए विक्रम, तू पण लक्षात ठेव हं. उगाच भंकस जमवायचं नाही.''

तेवढ्यात घंटा झाली आणि मुलं वर्गाबाहेर पडली ती एका वेगळ्या विचाराने भारवूनच...

## ओळखा पाहू



अमेरिकेचे माजी उपराष्ट्राध्यक्ष.

पर्यावरण-संरक्षण जागृतीसाठी यांनी विशेष प्रयत्न केले. 'ग्लोबल वॉर्मिंग' वरील यांच्या माहितीपटाला ऑस्कर पुरस्काराने गौरवण्यात आले.

हे कोण आणि यांनी दिग्दर्शित केलेला माहितीपट कोणता हे आम्हाला कळवा.

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

ऑक्टोबर अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर
ख्यातनाम कायदेपंडित **नानी पालखीवाला**

**स्पर्धेचे विजेते - ग. ना. कापडी, गोवा.**

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक**

विनायक हावळ, प्रतिक्षा हावळ, पांडुरंग भोसले, श्रीनिवास कुरणे, एकनाथ कांबळे,- **कोल्हापूर**. मालती धर्माधिकारी, सारंगा धर्माधिकारी, मेधा धर्माधिकारी, प्रगती जिरवणकर, गिरीजा कंठे, सुशील पाटील, उषा गोकुळ, वैशाली कुऱ्हेकर-**अमरावती**. चिन्मय कुलकर्णी, एन.एच.कुलकर्णी, सुजाता केळकर, उषा बोकील, नेहा आरवाडे,-**सांगली**. अनिल शेळके, व्यंकटेश माणेकरी, संतोष भोसेकर-**सोलापूर**. माधवी काळे, मृणाल शिदोरे, अनिता जवंजाळ, मनाजी गावडे, सोमनाथ सलगर, अ.को.भागवत, रा.द.ढुमणे-**पुणे.** भगवान बनसोडे-**कंधार**, श्रीनिवास जोशी-**औरंगाबाद.** चंद्रकांत अंबाडे-भुसावळ. डॉ.प्रमोद शिवगुंडे-**धुळे.** विनायक करंदीकर-**सिंधुदुर्ग.** मिलिंद चिंधडे-**नासिक**.

**प्रायोजक**

श्री राजू जगदीशचंद्र मेहता, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.